Regd-No-N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख ६ माहे नोव्हेंबर सन १९१६ ई० [ अंक ४३



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं व दां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.



## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हे इंगजच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेवि- जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एका अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयत्‍ने मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुप- यप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट

नो. नं १

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं रु ३ ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ता:- मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.

## सावंतवाडी येथील.

दशावतारी गंजिफा— उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ·।॥·, १, १।, १॥ [illegible] २॥ ते ५ रु. प. बुद्धीबळ जोड लाकडी— किंमत ·।॥· १, १॥, २ ते ४ रु. प. सोंगट्या जोड— किंमत ·।·, ·॥·, ·।॥·, १, १॥, रु. प. खडावा जोड— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट.

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३४९

### खात्रीचा तयार केलेला.
### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी
मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्य दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. यु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H. L. Batliwala
Sons & Co. Ltd.

N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे- खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा- जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साखी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्या- चें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन- साची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबा- बदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

# काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १८५ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ३९४

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमर्शियल अशूअरन्स कंपनी लिमीटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कार्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ३६९


### नोटीस

मनेका गुलाम मुस्फा उर्फ गबरूमियां ईनामदार कौम मुसलमान साकीन कसबे मंगरूलपीर तालूके मजकूर जिल्हा आकोला— जोके मय आपने फरजन्द मुसम्मी नसीरो- दिनसे बसबब उसके अफआल कबीहव नाजायज हरकात और अतवार नालायक ओर मुन्तेहा मरतबाके गुस्ताखीयों ओर हुक्म उदुलीयोंसे आजीज आकर नामबुरदा को मयने आपने फरजन्दीसे आक किया लिहाजा मुसम्मी मजकूर को मेरी मिलकीयत मनकूला वगैर मनकूलासे मेरे पसेमर्ग [illegible] किसमका तर्का या वेर्सा न पहूंचे इस

स्मर- व या तत्कालीन [illegible]र आक- सर्व कांहीं

ये आकनामा अत्रा मुननासकी आगाहीके लिये छपवाया हय और ये चंद कल्मे बतरीक आकनामेके लिख दिये हंये के इंदुल्हाजत काम आवें ओर सनद रहे. तहरीर तारीख १६ माहे जिल्हेज सन१३३४ हिजरी मुताबीक तारीख १९ आक्टोबर सन १९१६ इसवी रोज इतवार

साक्ष

१ सय्यद महमद इनायतुल्ला काजी दकलम खुद

१ शमशेरखा वा दाऊदखा इनामदार मंगरूळपीर द. खु.

१ शेकबन्नू वा शेकचांद पाटील दस्तुर खुद

सही.

अलअब्द गुलाममुस्तफा उर्फ गबरूमियां यांचे डाव्याहातचा आंगठा निशानी असे.

नो. नं. ३८७

## नोटीस

बेशमी मे. (१) शेख महिबूब वा॥ शेख मलंग
( २ ) नुरुल्लाखा वल्लद हिमतखान
( ३ ) शेख माहिबूब वल्लद नजरमहमद
( ४ ) आमिनोद्दीन वल्लद अजिमोद्दिन
( ५ ) हाजी इब्राख शहा महमद कच्छी
( ६ ) मुनातखां वल्लद छोटेखां
( ७ ) शेख गुलाब वल्लद शेखचांद
( ८ ) हुसेनखां वल्लद मेहराबखान
( ९ ) सपदलाल वल्लद सपदबदर
सर्वजण राहणार मंगरूळपीर

यांसः—

नोटीस देणार खाली सही करणार हेड मेंबर व म्यानेजर मस्जित जुम्मामजीतकमिटी, मंगरूळपीर यांजकडून कळविण्यांत येते कीं वरील कमिटीचा हेडमेंबर व वहिवाटदार असून तुम्हा लोकांस कमिटींत शेरीख केलें होतें. परंतु तुम्ही आमचे विरुद्ध होऊन वक्फनाम्याचे शर्तीप्रमाणें काम बरोबर करीत नसून आमचे संमतीशिवाय कामें करितां सबब वक्फनाम्यांत मेंबर लोकांस रद्द करण्याचा अधिकार आह्मास दिला आहे त्या प्रमाणें आह्मी तुह्मास वरील कमिटीतून रद्द केलें आहे आणि दुसरे मेंबर कमिटींत मुकरर करून आह्मी जुम्मा मजतीची व्यवस्था करून घेऊं. तुह्मास या नोटिशी अन्वयें त्या कमिटींत काम करण्याचा अधिकार राहिलेला नाहीं. तुह्मी दुकान वगैरेचे किराये वसूल करूं नये; आणि आमच्या महजती संबंधाचे जे कांहीं कागदपत्र मिटींग बुक व हिशोब वह्या वगैरे तुह्मा जवळ असतील ते सर्व आमच्या हवालें करून आमची लेखी पावती घ्यावी. असें करण्याला तुह्मांस १५ दिवसांची मुदत दिली आहे. या मुदतींत जर तुह्मी वर प्रार्णे संपूर्ण व्यवस्था न अंमलांत आणाल तर योग्य तजवीज केली जाईल. कळावें ता० २४ आक्टोबर सन १९१६ इ.

सही (उर्दूत)

सयद इनायतुल्ला वल्लद सयद कुदरतुल्ला काजी सर वहिवाटदार जुम्मा मसजिद कामिटी मंगरूळपीर दस्तुर खुद.

नो. नं. ३८८

## नोटीस

मथुरा मर्द दगडू उर्फ रंगनाथ लाड सोनार राहणार नांदखेड तालुका बाळापूर

हिसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं आपल्या आईबापाच्या छंदानें वागू लागलीस इतकेंच नाहीं तर तुला माझ्या बरोबर राहून संसार करूं देण्याचा तुझ्या आईबापाचा विचार दिसत नाहीं. पुष्कळशा फुटाफूट होण्यासारख्या गोष्टी विनाकारण दुसऱ्या लोकांच्या चिथावणीनें होत आहेत. आणि त्या मानानें अधिकाधीक बिघाड होत चालला आहे तुझ्या अंगावर दागदागिना ह्मणजे सोन्याची सरी २ तोळे

| | |
|---|---|
| गोट १८ तोळे | सोन्याचे झुरे पके |
| जोडवे १३ तोळे | १०४ मोत्या मुद्रां |
| | तोडे ६० तोळे |
| | पैंजण ७ तोळे |
| | दंडवाळ्या १२ तोळे |

५० रुपये रोख ( पैठणी साठीं )

इतक्या जिनसा तुझ्या जवळ दिल्या आहेत. या वस्तु परत माझ्या घरीं आल्या पाहिजेत. त्यांच्या बद्दल तुमच्या आईबापास जबाबदार धरले जाईल. ही नोटीस पोचल्या नंतर ८ दिवसाच्या आंत तुह्मी सलक्सपूर तालुका नेवासें जिल्हा नगर येथें पूर्वी प्रमाणें संसार करण्यास यावें. असें करण्यास चुकाल तर कोर्ट मार्फत तुह्मावर दावा करून योग्य ती दाद मिळविली जाईल. माझ्या सर्व नुकसानीबद्दल तुझे आईबाप जबाबदार आहेत कळावें ता० २१।१०।१६ इ.

सही

दगडू उर्फ रंगनाथ गणपत सोनार हल्ली मुक्काम आकोला निशाणी रेघ

नो. नं. ३८९

## नोटीस

नोटीस बेशमी आपाराव वा॥ लिंगोजी पाहाटकर रा. थेरबंद ता. हादगांव जिल्हां नांदेड

यांसः—

खालीं सही करणार धुरपताबाई रा० बोरगांव ता० पुसद हिचेकडून नोटीस करण्यांत येते कीं मला वयात येऊन चार ४ वर्षे झाली आहे त्या वेळेपासून बरेच वेळ तुह्मास नेण्याबद्दल निरोप दिले परंतु तुह्मी मला नेऊन मुळीच वागवित नाहीं व पुढें वागवाल असेबद्दल भंरवसा नाहीं. तुमचा भाऊ व चुलता यांनीं करारनामा दिला आहे कीं तूं आपले खुषीनें वाटेल तसी व्यवस्था करावी. या वरून तुह्मास माझी जरूरी दिसत नाहीं. व तुह्मी आपला नवरेपणाचा हक्क सोडला आहे. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आपले जातीचे पंच घेऊन येऊन मला चांगले रितीनें वागविण्या बद्दलचा पंचाचा जिम्मा देऊन मला घेऊन जावे. असें न केलें तर मला आपले अन्नवस्त्राचे सोईसाठीं वाटेल तशी व्यवस्था करणें भाग आहे. पुढें तुमची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० १४ १०-१६ इ.

द० गोविंद सटवाजी अर्जनवीस पुसद

सही

नि. धुरपता बाई मर्द आपाराव हिची बांगडी असे.

नो नं. ३९०

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार पुंजी मर्द नारायणसा तेली रा० दर्यापूर ता० मजकूर जि० उमरावती इजकडून सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं, माझा गंधर्वाचा नवरा नामें नारायणसा वल्द श्रावणसा रा० दर्यापूर हा लोकांचें कर्ज काढीतो असें माझें ऐकण्यांत आलें आहे त्याजजवळ स्थावर जंगम मिळकत कांहीं नाहीं तरी त्याजबद्दलचें कर्जाबद्दल माझे स्वतःचें मिळकतीवर कोणी त्याचा सावकार अंमलबारी करूं इच्छील तर मजला मी अबला असल्या संबधानें सरकार दरबारीं काम चालविण्यास जो खर्च लागेल तो व मजला सदर्हू संबधानें जा त्रास पडेल त्याबद्दल नुकसानी अशी एकंदर रकम मी सदर्हू सावकाराकडून कायदेशीर रितीनें वसूल करीन माझे नवऱ्यास त्याचे सावकारांनीं कैदेची दरखास्त वगैरे दिल्यास माझी कोणतेच प्रकारची हरकत नाहीं ही नोटीस दिली कळावे तारीख २२ माहे आक्टोबर सन १९१६ इसवी

द० [illegible] वार मुक्काम दर्यापूर.

सही

नि० पुंजी मर्द नारायणसा आंबळकार तेली रा० दर्यापूर हिचा आंगठा

नो. नं. ३९१

## नोटीस

रा. कृष्णाजी आन्याजी रा. दर्यापूर

यास;—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं. तुमची वऱ्हाडसमाचारचे तारीख ९-१०-१६ चे अंकामधून आलेली नोटीस पावली. सदर्हू नोटीशींत, तुह्मी, दर्यापूर जैन मंदिराचे आह्मी पीढीजात महाजन असून मंदीराची सर्व प्रकारे वहिवाट कैक वर्षापासून करित आहो असें ह्मणता; हे आह्मास कबूल नाहीं. तारीख २७-८-१६ रोजीं रात्रीं रा. कुलवंतराय ओहरशिअर यांचे अध्यक्षतेखाली जी सभा झाली व त्या सभेंत मंदीरा संबधानें, व पुजे संबंधाने वगैरे नियम ठरले गेले ते नियम तुह्मी स्वतः व बाकीचे सर्व सभासदांनीं ऐकून घेऊन ते सर्वांनीं कबूल केल्याबद्दल त्यावर सर्वांनीं सह्या केल्या. तुह्मी ह्मणता कीं दोन वाजले सभा बंद होण्याचा रंग दिसेना ही गोष्ट खोटी आहे. सभा सरासरी रात्रीचे चार वाजेपर्यंत होती. त्यात सही करण्याची गडबड बिलकूल झाली नाहीं. सर्वांनीं शांतपणानें विचार करून नियम ठरविले व ठरल्याप्रमाणें ते अर्जनवीसकडून लिहून घेतले, व लिहिल्या नंतर अर्जनवीसांनीच ते नियम वाचून दाखविले. व ते सर्वांनीं ऐकून घेऊन त्यावर सह्या केल्या तुह्मी आपले निराळें नियम सभेपुढें सभा बंद होई पावेतों मुळींच आणले नाहींत वरील नियम करण्यांत चूक मुळींच झाली नाहीं. कुलवंतराय यांनी काय पत्र दिलें हेंही आह्मास माहित नाहीं. तसेच तीन चार सभासदांनीं नाकबुली बद्दल काय पत्र दिलें हेंही आह्मास महित नाहीं. सर्व सभेंतील लोकांसमोर तुह्मी तुमच्या संमतीनें ठरलेल्या नियमावर तुह्मी सही केली त्यामुळें आतां तुह्माला ते नियम नाकबुल करितां येत नाहींत. तारीख ९-१०-१६ चे वऱ्हाडसमाचाराचे अंकांत दिलेली नोटीस विनाकारण दिलेली आहे व पुढे जैन मंदिराचे व्यवस्थेंत कांहीं ढवळा ढवळ तुह्मी केल्यास त्याबद्दलची सर्व जबाबदारी तुमचेवर राहील कळवे तारीख २५-१०-१६

सह्या

१ रुखोबा केशव रा दर्यापूर द० खुद

१ { वरील मजकुर वाचून पाहून सही केली / हरी नारायण सैतवाळ दर्यापूर द खु.

१ { वरील मजकुर वाचुन पाहून सही केली / बाबन गवजी रा दर्यापूर द खुद

१ { वरील मजकूर वाचून पाहून सही केली / अंबादास कडतुजी सैतवाळ द. खुद

१ मारोती पांडुरंग

१ { वरील मजकुर वाचून पाहून सही केली / विश्वनाथ कृष्णाजी गुळकरी द खुद

१ [illegible]राम सोनाजी सैतवाळ द खुद वरील मजकूर वाचून लिहीले.

नो. नं. ३९२


मुदाम कॉन्करन्सकरितां!

॥श्रीदत्तप्रसन्न॥

कै. बाबाजीराव दौलतराव राणे यांचे

# राजापुरकर ना. मं.

उमरावती येथील इंद्रभुवन थिएटरांत सोमवार ता. ६-११ १६ रात्रौ नवा खेळ

# महासती अनसूया.

मंगळवार ता. ७ ११-१६ रात्रौ लोकप्रिय

# संत तुकाराम.

याप्रमाणें खेळ करील. मुक्काम थोडा आहे.

मालक— महादेव बाबाजीराव राणे

नो. नं. ३९३


## पत्रव्यवहार

# "गोखले वैद्यक शाळा" सातारा.

हिंदुस्थान देशांत दयाळू इंग्रज सरकारनें एतद्देशीय राजे लोकांनीं पुष्कळ धर्मार्थ दवाखाने स्थापन केले आहेत. तरी पण

त्यांची संख्या फार अपुरी आहे. शहरें सोडून हिंदुस्थानच्या इतर भागांत जनतेचे औषधोपचाराच्या कामीं किती हाल आहेत, याची कल्पना शहरी लोकांना होणार नाहीं. लोकसंख्येच्या मानानें या देशांत तर वीस हजार माणसांस एक रजिस्टर्ड (नोंदीव) डाक्टर पडतो, असें असतां आपल्या मुलांना काय उद्योग धंदा शोधावा अशा किती तरी असंख्य लोक आहेत. माझें मतें हल्लीं एकदम दहा हजार वैद्य निर्माण झाले तरी त्यांचा खप या देशांत आहे. त्यांचा चरितार्थ यथास्थित चालेल. अखिल भारतभूमींत फक्त पांच सरकारी मेडिकल कॉलेजें व पंधरा स्कूल्स आहेत! वैद्य व डाक्टर लोकांची उणीव तर अत्यंत आहे. व ते तयार करण्याच्या शाळांचा संख्या वरप्रमाणें आहे. तीस कोटी प्रजेला वीसच सरकारी शाळा! परंतु समाधानाची गोष्ट ही कीं, सरकारनें या कामीं अलीकडे पुष्कळ लक्ष घातलें आहे. मार्च १९१६ मध्यें वरिष्ट कायदेकौन्सिलांत ऑन. डॉ. बॅनर्जी व ऑन. मीरअसद अलीखान यांचे पास झालेल्या ठरावाप्रमाणें सरकारनें डॉक्टरी व देशी वैद्यकाचे शिक्षणाचा प्रसार करण्याचें मनांत आणलें आहे. हा स्तुत्य हेतू साध्य होण्यास सरकारास जनतेची मदत पाहिजे; प्रजेनें या कामास हातभार लाविला पाहिजे.

सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत ॲलोपाथी नामक पाश्चिमात्य वैद्यक सुरू आहे. आयुर्वेदात नाहींत असें पुष्कळ, नवीन, उपयुक्त व जरूरीचे विषय त्या वैद्यकांत आहेत. आयुर्वेदाचा अभ्यास करणाऱ्यांना अशा उपयुक्त पाश्चिमात्य वैद्यकाचे ज्ञान असणें अगत्याचें आहे आयुर्वेद म्हणजे टाकाऊ असें मी म्हणत नाहीं. आयुर्वेदापैकीं औषधी-गुणधर्मशास्त्र, बहुतेक रोगांची चिकित्सा (म्हणजे आजार व औषधोपाय) व आरोग्य शास्त्राचा कांहीं भाग ह्यांची माहिती पाश्चिमात्य वैद्यकापैकीं त्या त्या विषयापेक्षां अधिक व सरस आहे. आयुर्वेदापैकीं बाकीचे विषयांची भारूडकथा जवळ जवळ निरुपयोगी आहे. आयुर्वेदापैकीं वरील तीन विषय डॉक्टर लोकांना नवीन शास्त्राप्रमाणें आहेत व ज्यांचे अंगी कर्तव्यपरायणता असेल अशा डाक्टर लोकांनीं हे विषय शिकले पाहिजेत व सरकारनेंहि आपल्या जुन्या व भावी शाळांतून शिकविले पाहिजेत. वैद्यांना ॲलोपाथीपैकीं रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, शरिर, शस्त्रविद्या मरणोत्तर परिक्षा, सूतिकाशास्त्र, न्यायवैद्यक इ. विषय बहुतेक नवीन शोधाप्रमाणेंच आहेत. म्हणून देशी वैद्यकाचें कॉलेजांतून व शाळांतून हे विषय शिकविले पाहिजेत. ज्यांनीं फक्त आयुर्वेद पाहिला आहे, त्यांनीं अंधपणें आयुर्वेदाची पाहिजे तेवढी स्तुति करावी परंतु दोन वैद्यक पाहाणाऱ्याला असें सांगणे प्राप्त आहे कीं, बाबानों आयुर्वेद चांगला, उपयुक्त व सोईचा आहे खरा, पण तो पुष्कळ भ्रामक कल्पना व योजनांनीं भरलेला आहे असला भाग छाटून टाकला पाहिजे. पाश्चिमात्य वैद्यकांतील अनेक नवीन विषयांची त्यांत भर घातली पाहिजे. आयुर्वेदांत सर्व कांहीं आहे, पाश्चिमात्य वैद्यक त्यापुढें तुच्छ असें म्हणणारे लोक तुमच्या डोळ्यांत समजून उमजून किंवा अंधपणें धूळ फेंकीत आहेत. देशी वैद्यांना हिंदु लोकांना व डाक्टर लोकांना जागें केलें पाहिजे म्हणून मी हें जरा विस्तारानें लिहिलें आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून पौर्वात्य व पाश्चिमात्य वैद्यक शिकण्यासाठीं मी १ जून १९१६ रोजीं "गोखले वैद्यक शाळ" या नांवाची संस्था स्थापन केली. ॲलोपाथी व आयुर्वेद ह्या दोहोंचा थोडाबहुत अभ्यास करून, ह्या दोन्हीं वैद्यकांप्रमाणें मी आज बावीस वर्षे चिकित्सा करीत आहे. म्हणून वरील कार्य हातीं घेण्याचें धाडस केलें आहे.

या शाळेतील शिक्षणाविषयीं माहिती देतो. चरक, सुश्रुत, वाग्भट, भावप्रकाश, योगरत्नाकर, रसरत्नसमुच्चय, शार्ङ्गधर, मदनपालनिघंट इ. महत्वाचे ग्रंथांतून औषधिगुणधर्मविद्या. चिकित्सा व आरोग्य शास्त्राचे कांहीं भाग व औषधांच्या कृति या विषयांचीं वर्णनें जुळवून एकत्र करून ते विषय शिकविले जातात. ॲलोपाथीपैकीं शारीर, इंद्रियविज्ञानशास्त्र व शस्त्रविद्या ह्यापैकीं महत्वाचा भाग शिकविला जातो आयुर्वेदांत रोगांच्या कारणांचें व लक्षणांचें वर्णन अपुरें आहे. म्हणून ह्या भागांत पाश्चिमात्य वैद्यकापैकीं वर्णनांची भर घालून ते शिकविले जातात. चिकित्सा पौर्वात्य वैद्यकाप्रमाणें सांगून जेथें जेथें पाश्चिमात्य वैद्यकांतील अचुक गुणकारी औषधें किंवा अधीक उपयोगी वाटतील तेथें तेथें त्यांचीहि माहिती सांगितली जाते. आयुर्वेदांत ज्याचा नामनिर्देश देखील नाहीं अशा सुमारें शंभर आजारांची माहिती ॲलोपाथीप्रमाणें दिली जाते. ॲलोपाथीचे मटेरिआमेडिकापैकीं फार उपयोगी १०० औषधांचीं वर्णनें शिकविलीं जातात. छाती, ज्वर, मूत्र इ. परिक्षा करण्याचें शिकवून लहान शस्त्रक्रिया जसें:— भग्नास्थि सांधणें, सांधे बसाविणें, मूत्रशलक चालविणें, विद्रधी फोडणें, जखमाचे उपाय करणें इ० क्रिया शिकविल्या जातात. वरील विषय निवळ मराठी भाषेंत शिकविले जातात. संस्कृत अगर इंग्रजी भाषेचा लोढणा विद्यार्थ्यांचे गळ्यांत नसल्यानें त्यांची गती सुलभतेनें व वेगानें होते शास्त्रीवैद्याकडे नुसता आयुर्वेद शिकावयास बारा वर्षें लागतात! इतका काळ लागून रोगी तपासणें व चिकित्सा करणें यांचे प्रत्यक्ष ज्ञान थोडें मिळतें. सरकारी मेडिकल कालेजांत १२ विषय उत्तम रीतीनें शिकण्यास पांच वर्षें बस्स होतात. आमचे वैद्यबुवांना वर लिहिलेले दोन अडीच विषय शिकावयास १२ वर्षें लागावी हें आश्चर्य नव्हे काय? संस्कृत भाषेंतून आळमटाळम करून व आयुर्वेदापैकीं उपयुक्त भागाबरोबर भारूड व भ्रामक भाग घोकून घेण्यामुळें इतका काळ लागतो. शिक्षण मराठी भाषेंत दिल्यानें व घोकंपट्टीची घातुक चाल बहुतेक बंद करून, दोन्ही वैद्यकांची एकवाक्यता करीत गेल्यानें व कोणते वैद्यकांत कोणता ग्राह्य भाग आहे हें सांगत गेल्यानें मी योजलेला सर्व शिक्षणक्रम दोन वर्षांत पुरा होईल. याची आणखींही कारणें आहेत. माझा धमार्थ दवाखाना, खाजगी दवाखाना, देशी औषधें तयार करण्याचा कारखाना, वैद्यकीय पुस्तकालय व वनस्पती संग्रहालय यांमध्यें विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षण दिलें जातें. रानांत धाडून त्यांना वनस्पती दाखविल्या जातात, अस्थि, नकाशे, मृत जनावरांचीं अवयवें यांवरून त्यांना शरीराची माहिती दिली जाते. देशी औषधें त्यांचे हातून तयार करवून घेण्यात येतात. रोगी समोर उभे करून रोगांची कारणें, निदानें व चिकित्सा समजावून दिलीं जातात. विद्यार्थ्यांना रोज पांच पन्नास आजारी पहावयास सांपडतात

तर वैद्य लोकांचीं मुलें, मराठी ट्रेनिंग कॉलेजांत प्रवेश होत नसणारे लोक, ज्यांचीं इंग्रजी सातवाचा परिक्षा होण्याची आशा नाहीं असले लोक. बेरोजगार कुळकर्णी नोकरी न मिळणाऱ्या किंवा ती नको असणाऱ्या लोकांनीं "गोखले वैद्यकशाळे" चा फायदा घ्यावा. येथें शिकून गेल्यावर त्यांनीं परोपकाराचा, थोडाबहुत मानाचा व स्वतंत्र धंदा प्राप्त होऊन कोणाचे नोकर बनण्याचें कारण राहणार नाहीं.

शाळेचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे, मुख्या फार फार कमी ठेविल्यानें तीन वर्षांइतका अभ्यास होईल. प्रत्यक्ष व पुस्तकी शिक्षण मिळून रोज तीन तास दिलें जातें.

### शाळेचा शिक्षण क्रम.

| | |
|---|---|
| **पहिलें वर्ष पहिली सहामाही**<br>शारिर, निघंट, आरोग्यशास्त्र | **पहिलें वर्ष दुसरी सहामाही**<br>फिजिऑलजी (इंद्रिय विज्ञानशास्त्र)<br>औषधविद्या, आरोग्यशास्त्र |
| **दुसरें वर्ष पहिली सहामाही**<br>आयुर्वेद व आलोपाथीपैकीं मेडिसिन (म्हणजे रोगांची निदान, रूप, चिकित्सा इ.) व शस्त्रविद्या | **दुसरें वर्ष दुसरी सहामाही**<br>मागल्या सहामाहीचे अभ्यास चालू व प्रसूति विद्या. |

फी दरमहा दोन रुपये असते. निराश्रित विद्यार्थ्यांना नादार घेण्यांत येऊन अवश्य लागणारीं पुस्तकें त्यांना मिळतील. त्यांची रहाण्याची सोय मोफत होईल. इकडे शिकावयास येऊं इच्छिणाराचें वय सोळा वर्षांचें वर असावें. अभ्यास निदान मराठी सातवे इयत्तेपर्यंत झालेला असावा. सातारा शहरांत जेवण, फी, राहण्याची जागा इत्यादी बाबतींत विद्यार्थ्यांना दरमहा सुमारें दहा रुपये खर्च येईल. त्यांना परके ठिकाणीं आलों असें न वाटूं देण्याजोगी शक्य तितकी मदत मजकडून होईल. त्यांचा अभ्यास, वर्तन व प्रकृती यांजवर माझी नजर राहील. पालकांना या बाबतींत दर पंधरा दिवसांनीं खबर मिळेल.

या शाळेचा नवीन वर्ग १ नवेंबर १९१६ रोजीं सुरू करण्यांत येईल; तर इकडे येऊ इच्छिणारांनीं २० आक्टोबर १९१६ चे आंत आपले पालकांमार्फत वय सद्वर्तन व शिक्षण यांचें दाखल्यासह खाली सही करणाराकडे अर्ज पाठवावे.

सदाशिव रामचंद्र गोखले.
वैद्य व सब असिस्टंट सर्जन
सातारा.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति कार्तिक शुद्ध १२ शके १८३८

## प्राच्य सुधारणा विरूद्ध पाश्चात्य सुधारणा.

पाश्चात्य शिक्षणरूपी यक्षिणीच्या कांडीनें भारत वर्षाचें स्वरूप पूर्णपणें पालटून टाकिलें आहे या विषयीं वाद नाहीं. आमच्या विद्या विषयक, धर्मविषयक, समाज विषयक, सर्वच प्रकारच्या समजुतीवर कुठाराघात करून त्या समजुतींतला गर्भ-प्राच्य सुधारणेचें हृदय-हरण करून नेला आहे. आमचा पोषाख, भाषा, चालीरीति, राजनीतिमूलक समजुती सर्वांचा रंगच पालटला आहे असें नाहीं, तर त्यांच्या मूलभूत तत्वांत फरक पडला आहे. आमची साधी राहणी व उन्नत विचार जाऊन त्या ठिकाणीं पाश्चात्य तऱ्हेवरचें खर्चिकपणाचें आणि व्यावहारिक अहमहमिकेचें जीवन प्रचारांत आलें आहे; अविभक्त कुटुंब पद्धति जाऊन विभक्त कुटुंबपद्धति प्रचारांत आली आहे. जातिभेद व त्याचे निर्बंध जाऊन त्या ठिकाणीं व्यक्तिसमता व व्यक्तिस्वातंत्र्य स्थापित होऊं पाहत आहेत. श्रद्धेचें स्थान चिकित्सा पटकावीत आहे. मि. बोस यांच्या म्हणण्या प्रमाणें आमच्या श्रद्धेनें केवळ स्थानांतर केलें आहे. म्हणजे आमची आमच्या ऋषिप्रणीत ग्रंथांवरची श्रद्धा नष्ट होऊन पाश्चात्य तत्वज्ञ व लेखक यांचीं वचनें आम्ही पूर्वींच्या इतक्याच अंधश्रद्धेनें प्रमाणभूत मानूं लागलों आहों. आमची बुद्धिविषयक, औद्योगिक, सामाजिक, कोणतीच खरोखर प्रगति होत नाहीं. प्रगति होत आहे असें जें सरकारी रिपोर्टा वरून वगैरे दिसतें तो सगळा भ्रम आहे, असें मि. बोस यांचें म्हणणें आहे. मि. बोस यांचें एकट्यांचेंच हें मत असतें तर त्याचें निरसन करण्याची यातायात करण्याचें कारण नव्हतें. कारण 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' पण ज्यांचीं मनें विचारोन्मुख झालीं आहेत, तथापि दृष्टि साफ झालेली नाहीं अशा बऱ्याच मोठ्या अर्ध शिक्षीत समाजाची अशाच प्रकारचीं मतें बनलेलीं असल्यामुळें व ही मंडळी वरील स्थितीला 'भ्रम' अशी संज्ञा देत असल्यामुळें हा भ्रम कोणाचा आहे हें दाखविणें अगत्याचें आहे.

गतकालांत किंबहुना गतकालाच्या स्मरणांत एक प्रकारची मोहकता असते व या मोहकतेमुळेंच मनुष्याचें मन गतकालीन स्थितीच्या पुनरुज्जीवनाकडे वारंवार आकर्षिलें जातें. प्राच्य सुधारणेंत सर्व कांहीं

मधुरतेचें व सौख्याचें रहस्य साठविलें आहे व ती सुधारणा काय ती सात्विक आणि पाश्चात्य सुधारणा तामसी–राक्षसी स्वरूपाची– असा भेद करणारे अर्थात् केवळ गत कालीन प्राच्य संस्कृतीच्या या मोहकतेला वश होऊनच करतात. खरें पाहिलें तर गतकालामध्यें सात्विक अंश मनुष्यजातींत– विशेषतः प्राच्य देशामध्यें— ज्यास्त होता, व आधुनिक पाश्चात्य संस्कृतींत सर्वत्र तामस भाव भरला आहे याला ऐतिहासिक प्रमाण कांहीं दिसत नाहीं. हल्लींच्या युद्धांत होणाऱ्या प्रचंड संहारामुळें वरील भ्रामक समजुतीला विशेष जोर आला आहे. पण पूर्वींचे भारतादि इतिहास निर्विकार दृष्टीनें पाहिले तर पूर्वींच्या काळीं शठता, युद्धें, मनुष्यजातीचा संहार, कुटिल राजनीति, असद् व्यवहार, अधर्म, वगैरे गोष्टी नव्हत्या काय? त्या नसत्या तर 'परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम् संभवामि युगे युगे' असें आश्वासन देण्याचें भगवंताला काय कारण होतें? पूर्वी च्याकाळीं आमच्या पोषाखांत, चाली रीतींत, भाषेंत, कशांतच फेरबदल घडले नाहींत, आणि पाश्चात्यांच्या संसर्गाबरोबरच या अनिष्ट गोष्टी आल्या असें ह्मणणें हा निवळ वावदूकपणा नव्हे तर काय? इंग्रजी शिक्षण इकडे सुरू होण्यापूर्वीं आमचा देश, आमचा समाज, आमच्या रीतीभाती, आमची भाषा, सगळे कांहीं आदर्श स्थितींत होते असें ह्मणणारांना असें विचारतां येईल कीं इतकी तुमची उन्नत स्थिति होती तर तुमचा अधःपात कां झाला? तुमच्यांत उन्नतीला पोषक अशीं सगळीं तत्वें होतीं तर तुह्मी परतंत्रतेच्या जाळ्यांत कसे फसलां? तुमच्या संस्कृतींत कांहीं न्युन नव्हतें तर तुमच्यांत निरनिराळे स्मृतिकार कां झाले व मागच्या स्मृतिकारांनीं घालून दिलेल्या मार्गांतले दोष पुढच्या स्मृतिकारांनीं काढून टाकण्याचा प्रयत्न केला हें कसें घडलें? जर दोषच नव्हते तर त्यांनीं काय काढून टाकिलें? पुढचे स्मृतिकार चुकले असले तर तुमच्या अधःपाताला प्रारंभ तेव्हांच पुढच्या स्मृतिकारांच्या काळीं–पाश्चात्य शिक्षणाचा प्रवेश हिंदुस्थानांत झाल्यावेळीं नव्हे–झाला असें तुह्मीच आपल्या तोंडानें कबूल केल्यासारखें होत नाहीं काय? सारांश, पाश्चात्यांच्या संसर्गाचा काळ हा आमच्या अधःपाताचा प्रारंभ असें ह्मणणारांना ऐतिहासिक दृष्टीच नाहीं असें कबूल केलें पाहिजे. त्यांना वैदिक काळ, पुराण काळ, बौद्धकाळ, मुसलमानांचा काळ व नंतर पाश्चात्य शिक्षणाचा काळ असे जे हिंदुस्थानच्या इतिहासाचे स्थूलमानानें काळ पाडण्यांत येतात त्यापैकीं एकाची ही खरी माहिती नाहीं, ते केवळ गतकालच्या मोहकतेला बळी पडून कांहीं तरी स्वैरपणें बरळणारे आहेत असें ह्मणण्यास काय हरकत आहे? प्राच्य संस्कृतींतलाही चांगुलपणा त्यांना ठाऊक नाहीं व पाश्चात्य संस्कृतीशी ही त्यांचा खरा परिचय नाहीं असेंच ह्मणणें अशा वेळीं भाग पडतें. अशांनीं भिन्न मत धारण करणाराला भ्रमांध ह्मणावें हें मात्र आश्चर्य आहे.

## न्यू इंडिया प्रकरणाचा निकाल.

मद्रासच्या न्यू इंडिया पत्रा जवळ तेथील चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेटानें मागितलेल्या जामीनकीच्या प्रश्नासंबंधानें मद्रास हायकोर्टानें मिसेस बिझांट बाईच्या विरुद्ध निकाल दिला. तथापि या खटल्यांत प्रेस आक्टाची रचना व त्या कायद्याची अंमलबजावणी यांच्या संबंधानें हायकोर्ट जजांनीं काढलेल्या उद्गारांनी सदर आक्ट रद्द करण्याविषयींची मागणी करणारास प्रोत्साहनच मिळेल. या आक्टाच्या तावडींत कोणते लेख येतील व कोणते येणार नाहीं हें सांगतां येणें फार कठीण असल्यामुळें या आक्टामुळें हिंदुस्थानांत कोणाला ही वर्तमान पत्र चालविणें किंवा छापखाना ठेवणें फार धोक्याचें आहे या मताला नामदार चीफ जस्टिस यांच्या मताचा दुजोरा मिळाला आहे प्रेस आक्ट बंगाल्यांतली राजद्रोही चळवळ नाहींशी करण्यासाठीं निर्माण झाला असतां त्याच्या लोकांचें लेखनस्वातंत्र्य हिरावून घेण्याकडे होत असलेल्या दुरुपयोगा विरुद्ध ही चीफ जस्टिस साहेबांनीं आपला अभिप्राय सूचित केला आहे. येत्या जानेवारींत प्रेस असोसिएशनकडून व्हाईसराय साहेबांकडे डेप्युटेशन जावयाचें आहे त्यावेळीं डेप्युटेशन कलकत्ता हायकोर्टाच्या जजांच्या या उद्गारांचा नजराणा लाट साहेबांस करतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

एखाद्या कायद्या अन्वयें केलेलें कृत्य बेकायदेशीर कसें ठरलें हें मोठें गूढ आहे पण मद्रास हायकोर्टाच्या निकालांत याचा खुलासा सापडेल. प्रेस आक्टाच्या आधारानें म्याजिस्ट्रेटानें केलेलीं कांहीं कृत्यें बेकायदेशीर ठरतात, पण या बेकायदेशीर कृत्यावद्दलचे इलाज मात्र त्या कायद्यानें सांगितलेले नाहींत, ते इलाज करूं इच्छिणारांनीं सामान्य कायद्याचा आश्रय केला पाहिजे, असा हायकोर्टाचा अभिप्राय दिसतो पण दाद सांगण्याचें तेंही द्वार सरकारानें बंद केलें आहे. प्रेस आक्ट सरकारनें आपल्या अधिकाराबाहेर पास केला आहे हा मिसेस बिझांट बाईचा आक्षेप हायकोर्टानें मान्य केला नाहीं; मग दाद मागणार कोठें? सारांश, प्रेस आक्टानें लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांना न्यायमंदिरांत दाद ही मिळणार नाहीं असा पक्का बंदोबस्त करून टाकिला आहे. असा हा भयंकर कायदा रद्द होणें ही सध्या अत्यंत अगत्याची गोष्ट आहे. ही दाद मागणें हें काम जितकें जहालांचें तितकेंच मवाळांचें आहे. यांत भेद असलाच तर तो हिंदी लोकांत नाहीं. हिंदी व युरोपियन लेखकांत मात्र आहे. हा भेद नसता तर लॉर्ड हार्डिंज यांचे विरुद्ध किंवा आतां मद्रास हायकोर्टाच्या जजांविरुद्ध आंग्लो–इंडियन पत्रांतून जे तीव्र शरसंधान चाललें आहे तें करणारांचे हात म्याजिस्ट्रेटांनीं केव्हांच धरले असते.

## शिक्षण विषयक प्रश्न.

खुद्द इंग्लंडला सुद्धां आपली शिक्षणपद्धति असमाधानकारक किंबहुना हानिकारक घडून तो बदल ण्याचा विचार चालला आहे. 'ना दे खाया पोटाला ती विद्या काशाला?' ही सध्या सर्वत्र तक्रार चालली आहे, आणि ती अगदीं रास्त आहे मनावर संस्कार घडण्याकरितां विद्या शिकणारे फार थोडे असतात, पण पोटाला भाकर मिळवितां यावी या साठींच विद्या शिकणारांची संख्या नेहमीं मोठी असावयाची. शिक्षणाच्या या कार्याकडे विशेष लक्ष देण्याकडे विलायतेतल्या युनिव्हर्सिट्यांचें व अधिकाऱ्यांचें लक्ष आतां लागलें आहे. पण हिंदुस्थानांतल्या युनिव्हर्सिट्यांच्या गांवीं ही हा प्रश्न अद्याप नाहीं. मुलींना हायस्कुलांतून गृहोपयोगी शास्त्रज्ञान व मुलांना हातकाम, व धंदा यांना उपयोगी पडेल असें शास्त्रज्ञान देण्याविषयींची मागणी करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांतलें विद्यालयें स्वतः तसें कांहीं एक करीत नाहीं; इतकेंच नाहीं तर एखाद्या खाजगी शाळेनें आपण आखून दिलेल्या मर्यादेच्या बाहेर शिक्षणपद्धतींत सुधारणा करण्याचा यत्किंचित् ही उपक्रम केला, तरी त्या संस्थेवर तुस्सा भरते, याचें उदाहरण ह्मणून पुण्याच्या न्यू इंग्लिश-स्कूलकडे बोट दाखविता येईल. मुलांच्याशारीरिक शिक्षणांत ही सुधारणा पाहिजे ह्मणून तिकडे सक्तीचा कॅडेट कोअरची स्थापना व्हावयाची आहे. आमच्या इकडे मुलांनीं ब्याट आणि बॉल यांच्याशीं हवें तितकें खेळण्यास सरकार मना करणार नाहीं. पण हिंदी विद्यार्थ्यांनीं बंदुक हातांत धरण्याचें मनांत सुद्धां आणिलेलें खपावयाचें नाहीं.

## म्युनिसिपालिट्या आणि दारूचीं दुकानें.

अबकारी खातें सरकारनें उत्पन्नासाठीं काढलेलें नसून लोकांना मादक पदार्थ स्वल्प किंमतींत मिळूं नयेत व अशा रीतीनें त्यांना दुर्व्यसनापासून दूर राखावें यासाठीं आहे असें सांगण्यांत येत असतें. तरी या खात्याविरुद्ध लोकांची फार ओरड आहे. ही ओरड मद्यप्यांकडून असती तर गोष्ट निराळी होती. पण उलट प्रकार आहे; ह्मणजे मद्यपाननिषेधक मंडळीकडून ती होत आहे. ही ओरड बंद करण्याची व लोकांची नीतिमत्ता राखण्याचा उद्देश तो अनायासें साधण्याचा एक उपाय अमृतसरचे डेप्युटी कमिशनर यांनीं सुचविला आहे. तो हा कीं अबकारीचें कंत्राट देण्याची व्यवस्था बंद करून दारूचीं दुकानें उघडण्याचें काम म्युनिसिपालिटीकडे सोपविण्यांत यावें. म्युनिसिपालिट्यांत लोकांचेच प्रतिनिधि असतात. आपल्या बंधूंना अनीतिमान् बनवून म्युनिसिपालिटीचा खजिना भरण्याची इच्छा त्यांना कधी होणार नाहीं. अर्थात् दारूचा खप वाढविण्याचा जो कंत्राटदाराचा प्रयत्न असतो तसा या नव्या व्यवस्थेंत घडणार नाहीं, व सरकारला ठराविक उत्पन्न मिळत जाईल. ही सूचना प्रयोग करून पाहण्यालायक आहे खरी. अमृतसरची म्युनिसिपालिटी ही हें काम अंगावर घेण्यास कबूल आहे. तेव्हां सरकारनें हा प्रयोग अवश्य करून पहावा अशी आमची शिफारस आहे.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांतल्या गोष्टी ह्मणजे इंग्रजांच्या इंग्लिश चॅनल ट्रान्स्पोर्ट सर्व्हिसवर जर्मन विनाशक बोटींनीं केलेला निष्फळ हल्ला, जर्मन पाणबुड्या बोटींनीं स्वीडनला भीती घालण्यासाठीं नार्वेच्या व इतर तटस्थ राष्ट्रांच्या बुडविलेल्या बोटी, मॅकिनसन याची चळवळ, रशियाच्या दक्षिण सरहद्दीवरच्या शत्रूचा जोराचा आघात रुमानियानें चालव्य सरहद्दीवर केलेली चाल, व व्हर्डूनपाशीं फ्रेंचांनीं मिळविलेला विजय या होत. आतां या गोष्टींचें क्रमशः विवरण करूं.

## जर्मन विनाशक बोटी.

दहा जर्मन विनाशक बोटींनीं इंग्लिश खाडींतून मोहीम करण्याचा यत्न केला, आणि एका रिकाम्या ट्रान्सपोर्ट बोटीचा टार्पेडोनें नाश केला, पण इंग्रजांनीं त्यांचें उद्दें काढलें. दोन जर्मन बोटींचा नाश होऊन बाकीच्यांना पळून जावें लागलें. या निष्फळ जर्मन मोहिमेनें ब्रिटिश आरमाराच्या जागरूकतेचें व दक्षतेचें आणखी एक प्रमाण मात्र जगाच्या निदर्शनास आणिलें. गेल्या २६ महिन्यांत इंग्लिश खाडींतून लाखो शिपायांची, दारूगोळ्यांची व सामानाची ने आण झाली आहे पण ब्रिटिश आरमारानें कधीं धोका होऊं दिला नाहीं. गेल्या आठवड्यांतल्या सारख्या शत्रूच्या मोहिमी आगाऊ ही होण्याचा संभव आहे, पण ब्रिटिश आरमार जर्मनांना पुरून उरेल.

## जर्मनी आणि तटस्थ राष्ट्रें.

जर्मनीनें नार्वेजियन बोटींचा केलेला नाश ही एकच गोष्ट समुद्रावरल्या स्वातंत्र्या संबंधाच्या जर्मनीच्या गप्पांचा पोकळपणा व्यक्त करण्यास पुरे आहे. स्वातंत्र्य शब्दाचा अर्थ जर्मनीला तेवढें स्वातंत्र्य आणि इतरांना गुलामगिरी असा घेतला तर मग जर्मनीचें करणें बरोबर आहे. जर्मनीचें व नॉर्वेचें अलीकडे चांगलें नाहीं. नॉर्वेच्या व्यापाऱ्यांच्या कांहीं बोटींचें जर्मनीनें नुकसान केलें, तेव्हां त्या बोटींच्या दुरुस्तीच्या कामीं जर्मन पोलाद न वापरण्याविषयीं जर्मनीनें हालंडला ताकीद देऊन ठेविली होती! तटस्थ राष्ट्रांविषयींचें जर्मनीचें वर्तन किती दगलबाजपणाचें व निष्ठुरतेचें आहे पहा. जशास तसें या न्यायानें सगळी तटस्थ राष्ट्रें जर्मनीशीं वागतील तर जर्मनीला फार जड जाईल. पण तीं राष्ट्रें जर्मनीसारखा जंगलीपणा करूं इच्छित नाहींत. पण काट्यानें काटा काढण्याची पद्धति स्वीकारल्यावांचून व्यवहारांत चालत नाहीं हें अजून या तटस्थ राष्ट्रांना विशेषतः अमेरिकेला–अद्याप कळूं लागलें नाहीं हें आश्चर्य आहे.

## रूमानिया.

रूमानियानें ट्रान्सिलव्हानियामध्यें घुसण्यावर आपली दृष्ट ठेवण्यांत चूक केली कीं काय हा प्रश्न लष्करी तज्ञांनींच सोडविण्यासारखा आहे. पण रूमानियाच्या या धोरणाचा परिणाम हा झाला आहे कीं डोब्रूजाकडे मॅकेनसनला वायती संधी मिळाली, व तिकडे जें थोडें रशियन व रूमानियन सैन्य होतें तालां मागें हटावें लागलें. मॅकेनसननें या सैनाला ९० मैल मागें लोटलें ! व रशिया आणि रूमानिया एक होण्याचा काळ लांबणीवर टाकिला. मॅकेनसननें कांहीं मजबूत किल्ले हस्तगत केले खरे, पण त्यांत त्याचा बरीच हानि ही झाली. डान्यूब नदी ओलांडून त्याला कुमक येऊन मिळेल हें संभवनीय नाहीं. रूमानियाला उत्तरेकडून रशियापासून दूर ठेवण्याचा शत्रूचा प्रयत्न आहे. रशियाचें दक्षिण सैन्य व रुमानिया यांमध्यें पाचर घालण्याचा प्रयत्न आतांपर्यंत विशेषसा फलद्रूप झालेला नाहीं. वायव्य सरहद्दीवर रूमानियानें आक्रमण करण्यास सुरुवात केलीच आहे. ट्रान्सिलव्हानिया मध्यें निराश होण्यासारखें कांहीं घडलेलें दिसत नाहीं. रुमानियावर केलेल्या हल्लसंबंधानें हालंडसारखीं तटस्थ राष्ट्रें तर असें ह्मणत आहेत कीं आज जर्मनीला जरी यांत फुशारकी करण्यासारखें दिसेल तरी अखेर रडण्याचीच पाळी येईल.

## ग्यालिशियामधली स्थिति.

ग्यालिशियामधली लढाई मंदावली आहे. आणि आपण रशियन लोकांना हकलिझच्या उत्तरेला हाकून लाविलें अशी फुशारकी जर्मन मारीत आहेत. शत्रु हकीलझच्या बचावासाठीं आकाशपाताळ एक करण्यास चुकणार नाहींत हें निश्चित होतें. तेव्हां रशियन लोक तेथून निघाले ते शत्रूच्या जबर सैन्याच्या भीतीनें ह्मणण्यापेक्षां अन्य कांहीं कारण असलें पाहिजे. बलगेरियाच्या दक्षिणेकडची कांहीं बातमी नाहीं. तेथें हवेच्या वाईट स्थितीमुळें मित्रराष्ट्रांची प्रगति खुंटली आहे असें दिसतें. तथापि ते मोनास्टिरवर चाल करून गेले, फ्रेंचांनीं व सर्वियन सैन्यानें कांहीं भाग हस्तगत केला. इटालियनांशीं दळणवळण सुरू झालें, व ग्रीस, च्या राजानें शांतता राखण्यापुरतें तेवढें सैन्य ठेवून एपिरस व सलोनी यांतल्या बाकीच्या सैन्याला पेलोपोनिसाकडे जाण्याचा हुकुम केला, वगैरे गोष्टी खात्रीनें उत्साहवर्धक आहेत.

## इटालियनांची चळवळ.

इटालियन लोक नेटानें कार्सोवर चाल करीत आहेत. त्यांनीं या बाजूला आपलें पुष्कळ सैन्य नेलें आहे. त्यांना तोंड देण्याला आस्ट्रियानें ही आपलें सैन्य नेलें आहे. ट्रीस्टवर जाण्याचा इटालियन लोकांचा जो बेत आहे तो हाणून पाडण्यासाठीं आस्ट्रिया आपली शिकस्त करीत आहे.

## पश्चिम रणक्षेत्र.

व्हर्डुनपाशीं फ्रेंचांनीं वर्णनीय मर्दुमकी गाजविली आहे जी जागा थोडीथोडी घेण्याला जर्मनीला आठ महिने लागले ती फ्रेंचांनीं सारी ४ तासांत हस्तगत केली, व एका सप्ताहांत बराच मुलुख आक्रमिला. सामकडे विशेषशी गडबड गेल्या आठवड्यांत झाली नाहीं. एकीकडून फ्रेंच व दुसरीकडून इंग्रज जर्मनांना सळो कीं पळो करून सोडीत आहेत. जर्मन केसर ही चळवळ पाहून घाबरला आहे आणि जुलैपासून आतांपर्यंत हातांतून गेलेला मुलुख जिंकावर उदार होऊन परत मिळविण्याविषयींचे हुकुम त्यानें सोडले असल्याची बातमी आहे. ती खरी असल्यास नवल नाहीं. कारण सामच्या दक्षिण व उत्तर या दोन्ही बाजूस तशीच स्थिति आहे.

## महत्वाचा ऐतिहासिक शोध.

हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्याचें शिक्षण कधींच मिळालें नव्हतें; सार्वजनिक संस्था चालविण्याची शक्ती व शहाणपण यांचा मागमूस ही त्यांच्या इतिहासांत नाहीं असें पुष्कळवेळां ह्मटलेलें आपण ऐकतो. आमच्या प्राचीन वाङ्मयाचा व इतिहासाचा जसा जसा शोध लागत आहे तसतसें वरील मत निराधार ठरत आहे. बौद्धकाळीं मगध देशांत प्रजासत्ताक लहान लहान राज्यें होतीं हें आतां बौद्ध ग्रंथावरून निर्विवाद सिद्ध झालें आहे. लोकमतानें ग्रामव्यवस्था किंवा राज्यव्यवस्था करण्याच्या ज्ञानाचा मक्ता पाश्चात्य देशांनींच घेतलेला नाहीं, पाश्चात्यांच्या ही पूर्वीं तें ज्ञान आमच्यांत होतें हें उत्कृष्ट प्रमाणांनीं सिद्ध होण्यासारखे शिलालेख नुकतेच दक्षिण हिंदुस्थानांत सापडले आहेत. पहिल्या राजराजाच्या वेळच्या एका लेखावरून असें दिसतें कीं गांवकरी स्वतःच्या खर्चानें किंवा एखाद्या उदार धनिकाच्या देणगीनें टाउनहॉल बांधून ग्रामव्यवस्थेचें काम करण्यासाठीं तेथे जमत. लोकांच्या या सभांना महासभा ह्मणत. या महासभेच्या एखाद्या सभासदानें आपलें काम नीट केलें नाहीं तर महासभेकडून त्याला दंड करण्यांत येत असे. दुसरा एक शिलालेख इ. स. १०६२–६७ च्या वेळचा मिळाला आहे. त्यांत लोकशिक्षण व दवाखाने यांविषयीं उल्लेख आहेत. दवाखान्यांत १९ रोग्यांच्या शुश्रूषेची व्यवस्था असे. डाक्टर, नर्सेस, औषधें फुकट देणें, वगैरे गोष्टी त्यावेळीं ही होत्या. त्यावेळीं मंदिराचें उत्पन्न ब्राह्मणभोजनाकडेसच खर्च न होतां त्यांतून शाळा व दवाखाने आणि बोर्डिंगें यांचा खर्च चालविण्यांत येत असे. त्यावेळीं ज्या गोष्टी प्रत्यक्ष कृतींत उतरलेल्या होत्या, त्यांच्या संबंधानें आतां निष्कारण युक्तायुक्ततेविषयींची चर्चा मात्र चालते. हातून मात्र कांहीं घडत नाहीं. केवढा हा अधःपात !

## बहिष्कार.

(विदुषी आनी बिझांटबाईंना मनाई.)

आजपासून मध्यप्रांत व वऱ्हाड या मधील थि आसाफिकल सोसायटीच्या शाखांचें संमेलन उमरावतीस भरणार आहे. व त्या निमित्त पुष्कळ वर्षांच्या विश्रांतीला मान देऊन या संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याला रुकार श्रीमती बिझांट बाईंनीं दिला होता आणि त्या प्रमाणें त्या कालरोजीं कलकत्त्याच्या बाजूनें उमरावतीस यावयाच्या होत्या; पण आमच्या स्थानिक सरकाराकडून गेल्या १ त्या तारखेला डिफेन्स ऑफ इन्डिया आक्टान्वयें त्यांच्यावर नोटीस बजावण्यांत आली. आणि मध्यप्रांत व वऱ्हाड या मुलखांत त्यांनीं पाऊल टाकूं नये असें फर्माविलें आहे. ब्रह्मविद्येच्या विषयावर त्यांचीं व्याख्यानें उमरावतीस न व्हावींत असा सरकारी विचार नाहीं. पण प्रांतिक परिषदेच्या निमित्तानें किंवा जाहीर सभांच्या द्वारें यांचीं व्याख्यानें राजकीय विषयावर उमरावतीस होतील आणि तीं आमच्या स्थानिक सरकारला नको आहेत ह्मणून वरील प्रकारचा हुकूम राज्याच्या स्वास्थ्यासाठीं मुद्दाम काढण्यांत आलेला आहे. सरकारला या विदुषी बाईंचे विचार राजकीय वातावरण खवळून टाकण्याइतके क्षोभकारक वाटतात आणि ह्मणूनच सरकारी सद्बुद्धिविषयीं शंका घेण्याला अवकाश नाहीं. सर बेंजामिन राबर्टसन यांचें राजधोरण उदात्त असतें आणि आपले विचार कृतीमध्यें मूर्तिमान करण्याइतके ते उत्साही व धैर्यशील आहेत. सरकारी दृष्टी व लोकदृष्टी या बाबतींत अगदीं दोन ध्रुवाइतक्या विरुद्ध दिशेच्या आहेत. पण कदाचित् सरकारी दृष्टी अशी बनण्याला पुष्कळशी "प्रागतिक" मंडळी कारणीभूत झाली असली पाहिजेत. आणि त्यांच्या वजनानें आमच्या स्थानिक सरकारच्या दृष्टीचा कोन ही वितका झुकता झाला आहे असा आमचा तर्क आहे. कांहींही असो वरील हुकमाचा व्यूह सध्या अगम्य आहे. आणि सरकारी मनःसृष्टी लोकांच्या विचारासारखी अनुकूळ होई पर्यंत हा व्यूह फोडण्याची किल्ली भविष्य कालाच्या जामदारखान्यांतच पडून राहील हाच विहित मार्ग होय.

## महायज्ञ.

(स्वराज्याचा श्री ग)

सरकारी इतकाच निसर्गाचा मार्ग गूढ असतो. निसर्गाचा संसार असाच हृदयंगम चालत असतो कीं तेथें बुद्धी कुंठित होते. वरील बहिष्काराच्या काळकूट मेघाच्या पलीकडे सूर्य गोल प्रकाशत आहे हें राष्ट्रानें विसरतां कामा नये. आशेचे किरण पुन्हा लाभेपर्यंत लोकांच्या परीक्षेचाच काल असतो. श्री. बिझांट बाईंना जो प्रतिबंध झाला आहे तो हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर प्रतिबंध आहे अशी बहुजन समाजाची दृढ, पक्की व निग्रहाची समजूत आहे. श्रीमती बिझांटबाई या नव्या हिंदी राष्ट्राचे डोळे आहेत. त्यांचे विचार लोकांच्याच मनःसमुद्रांतील लाटांस रमणीयता आणितात, लोकांच्या अस्फूट व अव्यक्त विचारांचीं शद्धचित्रें यांच्या प्रासादिक वाणीनें सर्वांग सुंदर अशीं तयार होतात, आणि अन्य संस्कृतींचें पाऊल पुढें पाडीत पाडीत इंग्रजी व हिंदी मनें या अद्भुत रसायन द्रव्यांनीं अगदीं एकजीव होत चालल्यीं आहेत. अशीही उपकारी विदुषी लोकांची उत्कृष्ट ध्येयें सुवर्णाच्या मूर्तींत नवी जुनी करीत आहे. आणि अशा वेळीं सरकार जेव्हां त्यांना या प्रांतांत येण्याची मनाई करतात तेव्हां स्थानिक सरकार व लोकसमूह हे परस्परां पासून किती दूर व अंतरावर राहतात हें सहजीं ध्यानांत येण्या सारखें आहे. एक गोष्ट ही निश्चित होय कीं सरकार लोकांच्या मनापासून फार दूर राहतें. सरकारचे ह्मणून जे कांहीं डोळे आहेत ते लोकांच्या डोळ्यांशीं [illegible] मिळतीं नाहींत. आणि हेंच दृष्टीदोष [illegible] करण्यासाठीं श्रीमती बिझांटबाईंनीं स्वराज्य संघ काढला आहे. स्वराज्याचें [illegible] खरोखरी लोकसमूहाचें [illegible] सर्वांगाने [illegible] साक्षात्कार करून येईल तर आमचें स्थानिक सरकार या स्वातंत्र्याच्या मुखीं [illegible] पुढें पाऊल टाकण्याला माघार घेणार नाहीं, इतकेंच नाही तर लोकांची मनोभूमी सुसंस्कृत व सुसंपन्न करणारी ही श्रीमती देवी या स्वतंत्र स्वराज्याचें साम्राज्य यांस्तव सर्वत्र सरकारी शिक्षा मोतेंच मिळत आहे. संकटाची वेळ ही जशी कसोटीला लावते तशी ती संपदाही गृहीं आणते. आणि हाच नियम राजकीय गोष्टींतही सारखाच लागू पडतो. तेव्हां स्वराज्यासाठीं आपण महायज्ञ आरंभला पाहिजे. आणि हाच महायज्ञ कालपासून आमच्या प्रांतिक परिषदेनें डाक्टर गौर नागपूरचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर यांच्या अध्यक्षतेखालीं सुरू केला आहे.

## प्लेगवर नवा उपाय

नुकत्या हातीं आलेल्या इंदूरच्या 'मल्हारि मार्तंड विजय' पत्राच्या ता. २ नोव्हेंबरच्या अंकांत प्लेगचे रोगी आयोडियाल नांवाच्या औषधाच्या पिचकारीनें बरे करण्याचे प्रयोग इंदुरास चालले आहेत त्या बद्दल जी माहिती देण्यांत आली आहे तिकडे आमच्या प्रांताचे मेडिकल ऑफिसर व खाजगी धंदेवाले डाक्तर यांचें लक्ष जाईल असें आह्मी इच्छितों. हें औषध आयोडीनपासून केलें आहे व आयोडीन टरक्लोराईड व त्यासारखीं दुसरीं द्रव्यें यांचा उपयोग केल्यानें अथवा नुसतें आयोडीन सूक्ष्म प्रमाणांत पोटांत दिल्यानें कांहीं प्लेगचे रोगी बरे झाल्याचा अनुभव पूर्वीं कित्येक ठिकाणीं आलेला आहे. तेव्हां आयोडियॉल पिचकारीच्या द्वारें शरीरांत प्रविष्ट केल्यानें अधिक गुण आल्याचा अनुभव आला असल्यास ती गोष्ट अविश्वसनीय ह्मणतां येणार नाहीं. म मा. विजयाच्या अंकांत इंग्रजी लेखांत हा प्रयोग करून पाहणारे डा० रानडे यांनीं पांच केसीसचें साद्यंत वर्णन दिलें आहे. या वर्णनास उद्देशून जो संपादकीय स्फुट लेख संपादकांनीं लिहिला आहे त्यांत ह्मटलें आहे कीं हा प्रयोग आतांपर्यंत ३०-३९

रोग्यांवर करून पाहिला. पैकीं शेंकडा ८० रोगी बरे झाले हें खरें असेल तर सध्या प्लेग आकोला जिल्ह्यांत चालू झाला आहे अशा वेळीं येथील डाक्तरांनींही अशा प्रकारचे प्रयोग करून अनुभव घेणें अवश्य आहे असें आह्मांस वाटतें. या संबंधानें ज्यांना ज्यास्त माहिती पाहिजे असेल त्यांनीं इंदूरचे स्टेट सर्जन डा० गोपाळ रामचंद्र तांबे एम. ए. बी. एस. सी. एल. एम. अँड एस इंदूर यांजकडे मिळेल.

---

## देशी भाषा आणि शिक्षण.

देशी भाषांच्या द्वारें सगळें शिक्षण (कालेजांतलें सुद्धां) देण्याचा हट्ट धरणारे लोक थोडे निघतील, पण म्याट्रिकपर्यंतचें शिक्षण व परीक्षा देशीभाषांतून व्हाव्या असें ह्मणणारांची संख्या मोठी आहे. देशी-भाषांना शिक्षण क्रमांत अग्रस्थान मिळावें, त्यांच्यांतच परीक्षा व्हाव्या, व देशीभाषांची उन्नति व्हावी हें सर्वतोपरी इष्ट आहे, पण आपल्या देशांत ते कितपत शक्य आहे याचा विचार व्हावयास पाहिजे. जपानला जें शक्य झालें तें हिंदुस्थानलाही झालें पाहिजे असें ह्मणून चालणार नाहीं. जपानांत एकच जपानी भाषा आहे. येथें मराठी, हिंदी, व उर्दू या तीन भाषा आमच्या मध्यप्रांतांत आहेत. मुंबई इलाख्यांत या शिवाय गुजराथी, कानडी आणि सिंधि अशा तीन अधिक आहेत. देशीभाषांतून नुसत्या परीक्षा घ्याव-याच्या ह्मटल्या तरी प्रत्येक विषयांत इतक्या भाषांचे निरनिराळे परीक्षक नेमिले पाहिजेत. खर्चाच्या दृष्टीनें हें शक्य नाहीं हें उघड आहे. देशी भाषांतून शिक्षण द्यावयाचें ह्मणजे प्रत्येक भाषेचें निरनिराळें हायस्कूल करावयास पाहिजे. तेंहि त्याच खर्चाच्या कारणास्तव शक्य नाहीं तेव्हां असा भल-ताच आग्रह धरण्यांत किंवा मागणी कर-ण्यांत शहाणपण नाहीं एक गोष्ट मात्र बऱ्याच ठिकाणीं-विशेषतः आमच्या वऱ्हाडप्रांतांत शक्य आहे, आणि ह्मणून येथें ती गोष्ट अमलांत आणून प्रयोग करून पहावा अशी आमची शिक्षणखात्यास सूचना आहे. वऱ्हाडांत मुख्यतः दोनच भाषा आहेत. हिंदु लोकांची मराठी व मुसलमानांची उर्दू ही अस्सल उर्दू नाहीं-मराठी मिश्रित आहे; इतकेंच नाहीं, तर बहुतेक मुसलमान त्यांची मातृभाषा उर्दू असतां ही आपले सगळे व्यवहार मराठींतच करतात. ह्मणजे व्यवहारांत मराठी ही एकच सर्वांची भाषा आहे. तेव्हां आमच्या वऱ्हाड प्रांतांत तरी हाय-स्कुलांतलें सर्व विषयांचें शिक्षण मराठीच्या द्वारें देण्याचा नियम केला तर त्यापासून कोणाची ही अडचण न होतां ही सु-धारणा अमलांत आणितां येईल. परिक्षेचीं उत्तरें ही देशी भाषांतून देण्याची परवा-नगी असावी या मागणींत आह्मांला कांहीं अर्थ दिसत नाहीं. हल्लींच्या काळीं इंग्रजी भाषेचें चांगलें ज्ञान असणें अपरिहार्यच नव्हे तर अवश्य आहे. अर्थात् इंग्रजी भाषा चांगली बोलतां व लिहितां येईल अशा साठीं विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या ज्ञानाकडे अधिक लक्ष देणें जरूर आहे. सर्व विषयांचें शिक्षण मराठीच्या द्वारें देण्याची पद्धती सुरू केल्यास इंग्रजी वि-षयाकडे अधिक लक्ष देण्यास अधिक वेळ ही मिळेल, व त्या योगानें विद्यार्थ्यांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान सुधरेल असें देशीभा-षांच्या पुरस्कर्त्यांचें ह्मणणें आहे आणि त्यांत पुष्कळ अर्थ ही आहे. पण हें ह्मणणें खरें धरून चाललों तर परिक्षेंतल्या प्रश्नां-चीं उत्तरें इंग्रजींतच विद्यार्थ्यांना लिहिण्यास लावण्यास हरकत कोणती आहे तें सांगणें कठीण आहे? देशी भाषेच्या द्वारें विष-याची समजूत चांगली पटलेली असली आणि आपले त्या विषयाचें ज्ञान इंग्रजींत व्यक्त करण्याचें ही सामर्थ्य अंगीं येण्या-इतकें विद्यार्थ्यांचें इंग्रजी भाषेवरचें प्रभुत्व असल्यावर प्रश्नांचीं उत्तरें त्यांनीं देशी भाषांतच लिहावीं असा आग्रह धरण्यांत हेतु काय राहिला? सारांश, जेथें शक्य असेल तेथें देशीभाषांतून विषय समजावून देण्यांत यावा व परिक्षेचीं उत्तरें मात्र इंग्रजींतच हल्लींप्रमाणें लिहिण्याचा नियम असावा असा तडजोडीचा मार्ग शिक्षण-खात्याच्या अधिकाऱ्यांपुढें मांडल्यास तो अधिक शहाणपणाचा होऊन अधिकारीवर्गास ही पटेल अशी आमची समजूत आहे. सगळी भाकरी मिळणें शक्य नाहीं असें दिसल्यावर अर्धी मिळत असली तर ते-वढी तरी शहाण्या माणसानें पदरांत पाडून घ्यावी. ह्यांतच खरी व्यवहारज्ञता आहे.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—एकंदर पाऊस ४३–४४ इंचा पर्यंत झाला. आणि अद्यापीही पर्जन्य काळाचीं चुकलीं मुकलेलीं चिन्हें दिसतात तथापि लौकरच खरा हेमंत ऋतू आपल्या अमृतच्छाया पसरून सार्वजनिक आरोग्य अधिक तेजस्वी करील. यंदासारखा पावसाळा गेल्या ४० वर्षांत अनुभवांत आला नाहीं.

रा. रा. नारायण रघुनाथ चांदोरकर प्रोबेशनरी एक्स्ट्रा असि. कमिशनर आकोला यांस यवतमाळास बदलण्यांत आलें.

रावसाहेब दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. एक्स्ट्रा असि. कमिशनर यांचे हक्क नोंदणीचें काम संपतांच त्यांस उमरावती जिल्ह्यास नेमण्यांत आलें.

रा. रा. अच्युत सीताराम साठे सबजज्य बुल्डाणा यांस २ रे वर्ग मॅजिस्ट्रेट नेम-ण्यांत आलें आहे.

रा. रा. गोविंद भगवंत देशपांडे अॅक्टिंग तहसिल्दार मुर्तिजापूर यांस २ रे वर्ग मॅजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. दामोदर गंगाधर परांजपे अब-कारी इन्स्पेक्टर आकोला डिस्टिलरी यांस त्याच जागीं कायमची बढती देण्यांत आली.

**प्लेग**—उमरावती जिल्ह्यांत १० खेडीं व यवतमाळ जिल्ह्यांत ४ खेडीं प्लेग दूषित असून एकंदर मृत्यूचें प्रमाण हप्त्याचे २५ पेक्षां अधिक नाहीं. पण आकोला जिल्ह्यां-तील २१ गांवांत व बुल्डाणा जिल्ह्यांतील १३ गावांत प्लेग पसरला असून या दोन्ही जिल्ह्यांतील गेल्या हप्त्यांतील प्लेगाच्या मृत्यूची बेरीज १७० आहे.

**नजराणा**—मोहिमेवर गेलेल्या हिंदुस्था-नच्या सैनिकांस नजराणा पाठवावयाच्या वस्तु व त्या पाठविण्याच्या योजना या एकत्र छापलेली पुरवणी आजच्या अंकासोबत आह्मी धाडीत आहों, तिकडे योग्य लक्ष दिल्यास रणांगणावर लढणाऱ्या बांधवांचें आपण अंशतः तरी अभिनंदन केल्यासारखें होईल. ही यादी सुदाम्याच्या पोह्याची आठ-वण देण्याइतकी तपशीलवार आहे तेव्हां या यादीचा चांगला उपयोग सर्वत्र होईल असा आह्मांस भरंवसा वाटतो.

**मोहरम**—या सणानिमित्त आमचा महमदी बंधु वर्ग आनंदांत व खुषींत आहे इतकेंच नाहीं तर या सणाचें रहस्य जाणून श्री महमद पैगंबरांचा तो जगद्व्यापी प्रेमळपणा सर्वत्र प्रसृत करण्याकडे उच्च वर्गांतली इस्लामी मंडळी आपापल्या परीनें प्रयत्न करीत आहेत ही गोष्ट आमच्या प्रांतीं चांगली निदर्शनास येते. व त्या बद्दल सर बेंजामिन हे खरोखर कौतुक करितील कांहीं वेडीं स्थळें असतील पण तीं अगदीं अपवा-दासारखीं व न कळविण्यासारखींच आहेत.

**बभ्रा**— मुर्तिजापूरच्या स्टेशनावर एलिचपूर किंवा यवतमाळ या दोन्ही बाजूकडे जाणा-ऱ्या उतारूंचा पुष्कळसा खोळंबा होतो आणि त्या गैर सोयींतच पुष्कळशा लहान मोठ्या तेथें चोऱ्या होतात अशा विषयीं कित्येक महिन्यापासून बोभाटा ऐकूं येतो. तर आमचे कतन साहेब रेल्वे पोलीसांच्या कडून मुर्तिजापूर स्टेशनला अधिक शिस्तवार देखरेख चालू करितील अशी उमेद आहे.

✓ **मौनव्रत**— आकोला जिल्हा कांग्रेस कमीटीनें बहुमतानें प्रांतिक परिषदेस अशा अर्थाची सूचना केली आहे कीं विदुषी बिझांट बाईच्या बहिष्कारासंबंधानें सर्व परि-षदेचें कामच बंद ठेवावें, ह्मणजे कारुगतीनें सरकारास लोकांचे हृद्गत कळून चुकेल.

---


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भाशयांत मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व मल्ल भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्या अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपा, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व हुशार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इतरदि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ ० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ता:—मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी. ना० नं० २० } कृष्णशास्त्री पेंसे वैद्य.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवप्रमांव छापून प्रसिद्ध केलें.

मोहिमेवर गेलेल्या हिंदुस्थानच्या सैन्यांतील ब्रिटिश व हिंदी सैनिकांचे उपयोगाकरितां जे कोणी भेटीदाखल जिन्नस पाठवूं इच्छीत असतील अशा लोकांच्या सोईसाठी भेटीदाखल पाठविण्यास योग्य अशा जिनसांची पुढील यादी तयार करण्यांत आली आहे:—

| जिन्नसाचें नांव. | | जिन्नस भरून बंद कसे करावयाचे वगैरे बद्दल माहिती. |
|---|---|---|
| इंग्रजी. | मराठी. | |
| *Chocolate | चोकोलेट | हें स्वच्छ असलें पाहिजे. मूळच्याच पुडचा जस्ती डब्यांत भरून बंद कराव्या. |
| *Dried figs | सुके अंजीर | निरनिराळ्या जस्ती डब्यांत भरून त्या डब्यांची तोंडें डांक लावून बंद करावींत, व आंतल्या वस्तूचें नांव डब्यावर रंगानें इंग्रजींत लिहावें. |
| *Dried apricots | सुके जरदाळू | |
| *Dried apple chips | सपर चंदाच्या सुक्या चकल्या | |
| *Dried dates | खारका | |
| *Raisins | बेदाणा (किसमिस) | |
| *Pomegranates | डाळिंबे | हीं पेट्यांत अगर जस्ती डब्यांत भरावींत. |
| *Monkey nuts | भुईमुगाच्या शेंगा (शेंगदाणें) | हीं वेगवेगळीं पेट्यांत अगर जस्ती डब्यांत भरावींत, व त्या त्या पेटीवर किंवा डब्यावर आंतील जिन्नसाचें नांव इंग्रजींत रंगानें लिहावें. |
| *Walnuts | अक्रोड | |
| *Pistachio nuts | पिस्ते | |
| *Almonds | बदाम | |
| *Cocoanuts | नारळ (खोबरें) | |
| *Edible pine seeds | चिलगोझा | |
| *Cardamoms | वेलदोडे (वेलची) | |
| *Mineral alum earth (Nepal). | शिलाजीत | |
| *Crystallised sugar | साखऱ्या | |
| *Dry ginger | सुंठ | |
| *Betel-nut | सुपारी, चिकणी सुपारी | प्रत्येक जिन्नस निरनिराळ्या लहान जस्ती डब्यांत भरून ते डबे मोठ्या डब्यांत भरावेंत व तोंड डांक लावून बंद करावें. |
| *Catechu | कात | |
| *Slaked lime | विरवलेला चुना | |
| Hindu biscuits (Hindu Biscuits Co., Delhi). | हिंदू बिस्कूटें (हिंदू बिस्कूट कंपनी, दिल्ली). | मूळचेच डबे न उघडतां जसेच्या तसेच पाठवावेत. |
| Tobacco leaf | सुकी तमाखू | निरनिराळ्या जस्ती डब्यांत भराव्या. |
| Tobacco, compressed | | |
| Cigars | चिरूट | |
| Cigarettes | सिग्रेट (विड्या) | |
| Pipes | चिलीम | ह्या स्वतंत्र लांकडी पेटींत भराव्या. |
| Portable hookas | छोटी गुडगुडी (हुक्का) | ह्यांतील प्रत्येक निरनिराळ्या प्रकारचा जिन्नस निरनिराळ्या मजबूत पेटींत भरून आंतील जिन्नसाचें विनचुक वर्णन पेटीच्या बाहेरच्या आंगांस लिहावें. |
| Material for making up hookas. | हुक्क्याचें सामान | |
| Socks and bed socks | मोजे | ह्या जिनसा पोत्यांत भराव्या. |
| Belts | कमरपट्टे (काचे) | |
| Handkerchiefs | हात रूमाल | |
| Mittens | हातमोजे | |
| Long woollen stockings | लोंकरीचे लांब पायमोजे | |
| Gloves, warm | लोंकरीचे हातमोजे | |
| Gloves, without separate fingers, except forefinger. | अंगठे व करंगळी या खेरीज इतर बोटें वेगवेगळीं न ठेवलेले हातमोजे. | |
| Jerseys | गंजी फ्राक | ह्या जिनसा पोत्यांत भराव्या. |
| Woollen comforters | लोंकरी गळेबंद (कंफर्टर). | |
| Knitted puggaries | लोंकरी टोप्या. | |
| Warm vests | गरम जाकिटें. | |
| Balaclava caps (thin over ears). | कानटोप्या (कानपट्ट्या पातळ असाव्यात). | |
| Waterproof covers for puggaries. | पागोट्यांच्यासाठीं मेणकापडी टोप | |
| Kumarbands | कमरबंद | |
| Housewife, strong buttons, needles, cotton. | जुगदान व त्यांत भक्कम बटनें व सुई दोरा. | |

| जिन्नसाचें नांव. | | जिन्नस भरून बंद कसे करावयाचे वगैरे बद्दल माहिती. |
|---|---|---|
| इंग्रजी. | मराठी. | |
| Matches | आगपेट्या | आंतमध्यें जस्ती पत्र्यानें मढविलेल्या भक्कम लांकडी पेट्यांत बंद कराव्या. |
| Folding lanterns | घडीचे (घडी करून खिशांत ठेवण्याजोगे) कंदील. | ह्या वस्तु वेगवेगळ्या लांकडी पेट्यांत बंद कराव्या. |
| Hair clipping machines | केंस कापण्याचें यंत्र | |
| Notepaper | नोट पेपर (पत्र लिहिण्याचे कागद) | |
| Envelopes | पत्राचीं पाकटें, लिफाफे | |
| Night lights | रात्रभर जळत ठेवण्याचे दिवे | |
| Plain postcards | साधीं पोस्ट कार्डें | |
| Pencils | पेनसिली (शिस पेनसिली) | |
| *Sweets of all sorts | सर्व प्रकारची मिठाई | वेगवेगळ्या लांकडी पेट्यांत अगर जस्ती डब्यांत बंद कराव्या. |
| *Maple sugar | मेपल शुगर (मेपल साखर) | |
| Tinned milk | दूध भरलेले डबे | स्वतंत्र लांकडी पेट्यांत बंद करावे. |
| *Curry powder | दळलेला (कुटलेला) मसाला | ह्यांतील वेगवेगळे जिन्नस निरनिराळ्या लहान जस्ती डब्यांत बंद करावेत व ते डबे एका मोठ्या डब्यांत भरून त्याचें तोंड डाग लावून बंद करावें. |
| *Spices | मसाल्याचें सामान | |
| Acid tablets | लिंबाच्या (लेमोनेडच्या) गोळ्या (ही एक विलायती मिठाई आहे) | स्वतंत्र डब्यांत अगर पेट्यांत बंद कराव्या. |
| Achar (mango pickle in mustard oil). | आंब्याचें लोणचें (शिरसूच्या तेलाचें). | हें डब्यांत बंद करून त्यांची तोंडें डाक देऊन बंद करावीत व मग तो डबे लांकडी पेट्यांत भरावेत. |
| Dried mango juice | आंब्याचीं साटें | जस्ती डब्यांत अगर पेट्यांत बंद करणें. |
| Chagals | छागली | स्वतंत्र पेट्यांत भरणें. |
| *Chutney | चटण्या | स्वतंत्र जस्ती डब्यांत अगर पेट्यांत भरणें. |
| *Effel tower lemonade | एफेल टावर लेमोनेड | |
| *Grain and Chioda | मुरमुरे आणि चिवडा | |
| Mustard oil | शिरसूचें तेल | बाटल्यांत घालून मजबूत लांकडी पेट्यांत बंद करणें. |
| *Mangoes (dried green) | आंबूशी, (अंबसूलें). | स्वतंत्र जस्ती डब्यांत अगर पेट्यांत बंद करणें. |
| *Lemonade or gingerade powder. | लेमोनेड अगर जिंजरेड करण्याची भुकी | |
| *Sherbet | सरबत | |
| *Sugar | साखर | |
| *Potted meat | पॉटेड मीट | |
| Pickles | मुरंबे | हे मजबूत लांकडी पेट्यांत बंद करावेत. |
| *Spices, Hindustani | हिंदुस्थानी मसाले | मसाले कसे भरावयाचें तें वर सांगितलें आहे, त्याचप्रमाणें. |
| Cigarette tobacco | सिगारेट करण्याची तमाखू | वेगवेगळे जस्ती डब्यांत बंद करणें. |
| Cigarette papers | सिगारेट करण्याचे कागद | |
| Boot laces | बुटांचे बंद | |
| Cloth (plain, white, Latha or twill). | कापड (सफेत लठ्ठा किंवा टुइल) | पोत्यांत भरणें. |
| Crutches and stout sticks. | कुबड्या व जाड काठ्या | त्यांचें गठ्ठे बांधून ते पोत्यांत शिवावेत. |
| Dhotis | धोतरें | पोत्यांत भरणें. |
| Belts (hollow for cash) | कसण्या (रुपये ठेवण्यासाठीं) | |
| Jharans | धुरळा झाडण्याचे रुमाल | |
| Caps, folding, khaki | घडी घालतां येणाऱ्या खाकी टोप्या | |
| Great coats W. P. | मेणकापडी ओव्हर कोट | |
| Payjamas | पायजामे | |
| Shoes (Native nog dar). | नोकदार देशी जोडे | लांकडी पेट्यांत भरणें. |
| Shoes, light, muntha (country). | हलके मुंढ्याचे देशी जोडे (चढाऊ जोडे). | |
| Kurtas | कुडते | पोत्यांत भरणें. |
| Shirts, khaki twill | खाकी टुइल कापडाचे खमीज | |
| Shirts, thin | पातळ कापड्याचे खमीज | |
| Socks, cotton | सुती मोजे | |
| Sikh clothes | शीख लोकांचे कपडे | |

ब्रिटिश राष्ट्र वि
इच्छा त्यांच्या Rgd-No. N150
जितकें साहाजिव
कटाचें वेळीं ३
...पाठीं

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख १३ माहे नोव्हेंबर सन १९१६ ई० [ अंक ४४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।९।०९ — Lyon Setot एजंट

नो. नं १

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

---

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।।।, १, १।, १॥, २, २॥, ते ९ रु. प. **बुद्धीवळजोड लांकडी**— किंमत ।॥ १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ।॥, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान वाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

**डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी**

नो. नं. ३४९

---

## खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६

नो० नं०

---

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥. २, ३. ४. अंगठी किं. रु. १, १॥, सले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं. रु. १॥, २ ३॥ कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः—**मगनलाल के. आणि कंपनी**

गिरगांव मुंबई.

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेस वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

---

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १।८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 3 Dadar Bombay.

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळ टीका, मुदी अग्रफुलें साधीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तांटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें, ग्यारानचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पहावें. जिन्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

---

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १८९ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पैंड, बादाम मुरब्बा २ पैं. टिन १

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ३९४

---

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरणे वे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज

धी एशियन कमर्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग. फोर्ट, मुंबई.

नो. नं. ३९९

---

### नोटीस

वि॥ सबजज साहेब कोर्ट खामगांव

मयत गोपाळ पुरुषोत्तम रा. जळगांव याचे जिनगिचे वारसाचे सर्टिफिकीट मिळणें संबंधी अर्ज.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं गोपाळ पुरुषोत्तम रा. जळगांव हा मयत झाला असून त्याची वारस बायको सत्यभामा जवजे गोपाळ इनें गोपाळ याच्या जिनगिचे वारसाचे सर्टिफिकीट मिळण्याविषयीं या कोर्टात अर्ज केला आहे, तरी कारभाराची उठाठेव फिकीट देणे बद्दलबाळगतील हें संभवनीय असेल त्यानीं त्येक इंग्रज लेखक या १९१७ रोजीं ब्रेटिश सरकारच्या कौंसिलांत दर्शवावी. तर त्यांच्या द्वारें सदर कौंसिला-वारसाचे सं...कमताला दुर्बळपणा आणण्याची आज ता...करीत असतात; त्यांना व्हाइसराय इसवी... शिक्षा व हें अश्वासन कसें काय रुचेल हवो. खुद्द स्टेटसेक्रेटरी साहेबांकडून तिन्च गव्हर्नमेंट ऑफ इंडिया आक्ट

## नोटीस

१ रा. रा. जानकीराम गणेश कुळकर्णी राहणार देऊळगांव माळी ता. मेहकर पोष्ट फत्तेखेडा

२ लक्ष्मणआया सदाशिवआया

३ बकाया उर्फ शंकरआया गुरु गंगाधरआया

४ विश्वाभरआया गुरु गंगाधरआया

सर्व राहणार फत्तेखेडा ता. मेहकर

५ महादापा भिवापा राहणार सनगांव पोष्ट मंगरूळपीर ता. वाशीम

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून सर्वांना नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, आह्मी तुह्माला ता. ६-७-१६ इसवी रोजीं जनरल मुकत्यारपत्र दिले. तें या नोटिशीनें रद्द केले आहे. अशाबद्दल जाहीर नोटिशीनें प्रत्येकी रजिष्टर द्वारें कळविले आहे. तरी यापुढें आमचे मुकत्यार नात्यानें कोणत्या ही प्रकारचा व्यवहार व कामकाज करूं नये. केल्यास त्याबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. कळावें. ता. ३१-१०-१९१६

सही

गंगाधरस्वामी गुरु पलसिद्धमहास्वामी दस्तुर खुद्द

नो० नं० ३९४

## नोटीस

नोटीस बेशमी सयद इनायत तुल्ला वा सैयद कुद्र तुल्ला साहेब राहणार मंगरूळपीर

यांसः—

नोटिस देणार खालीं सह्या करणारे जुम्मा मैजत कमेटी राहणार मंगरूळपीर

यांजकडूनः—

नोटिस दिली जाते कीं ता. २८-१०-१६ चे वऱ्हाडसमाचारांत आपण आह्मास नोटिस दिली कीं, मी जुमा मैजत कमेटीचा हेड मेंबर व म्यानेजर असून मीच तुह्मास कमेटींत मेंबर शरीक केले होते. परंतु तुह्मी आमचे विरुद्ध होऊन व कफ नाम्याचे शर्तीप्रमाणें कामें बरोबर करीत नसून आमचे संमति शिवाय कामें करितां. सबब व कफ नाम्यांत मेंबर लोकांस रद्द करण्याचा अधिकार आह्मास दिला आहे. त्याप्रमाणें आह्मी तुह्मास वगैरे कमेटींतून रद्द केले आहे. असें आपण आह्मी लोकांस नोटिस देल्यावरून या नोटिशीनें आपले नोटिशीचा जबाब दिला जातो कीं, आपण कोणते ही प्रकारें हेड मेंबर अगर म्यानेजर होऊं शकत नाहीं. कारण आपणास कोणीच व हेडमेंबर किंवा म्यानेजरचे एक ह्मणजे पदवी दिली होऊन [illegible] कोणी कमेटीचे [illegible] किंवा गांवकरी प्रांताचा [illegible] किंवा म्यानेजर शिक्षणप्रसार [illegible] नाहीं. मग मध्यप्रांतासाठीं [illegible] अगर डॉ० गौड यांनीच कफ आहे असें कोणास किंवा [illegible] कोणत्याही [illegible] किंवा [illegible]

एक त्यास शिवाय कमेटी मेंबराचे मोठे मत्ता खेरीज तुह्मास कोणीच मेंबराचा फेरफार करण्याचा अख्त्यार राहत नव्हता. त्याअर्थी आपण एकटे मेंबर असून हेड मेंबर आणि म्यानेजर नाहींत व कमेटी किंवा वक्फ करणारांनीं आपणास हेड मेंबरी किंवा म्यानेजरी ह्मणून नांव देऊन मुकरर केले नाहीं व कमेटींत फेरफार करण्याचा अधिकार ही आपणास दिला नाहीं त्याअर्थी आपण एकटे मेंबर असून वे अधिकारी आहा. आपण आह्मास कमेटींत शरीक केलें नाहीं.

कमेटींतील एका मेंबरास द्वितीय विचारणें अगर कमेटींत कमीजास्त करणें अगर कमेटी मेंबरापैकीं कांहीं मेंबरांस काढणें अगर ठेवणें वगैरे वगैरे काम करण्यास अधिकार मुळींच नाहीं. याजबद्दल वाशीम कोर्टांत दिवाणीत दावा होऊन नागपूर हाय कोर्ट मध्येंही हाच ठराव कायम राहीला आहे. यावरून आणि कायद्यावरून तुह्मी एका मेंबरास कोण्याच प्रकारें आह्मा सर्व मेंबरांस रद्द करण्यास अधिकार नाहीं.

या पूर्वीं आह्मी जुमा मैजत कमेटींत मेजारटीवरून आणि गांव लोकांचे मोठे मतानें ता. १८-१-१६ रोजीं आपणास जुमा मैजत कमेटींतून खारिज ह्मणजे रद्द केले आहे. अशाबद्दल वऱ्हाडसमाचार आकोला ता. ११ सप्टेंबर सन १९१६ चे पत्रांत नोटिशीनें आपणास खबर केली आहे.

खारीज आह्मी नव ९ कमेटी मेंबरांस आपण एकट्या मेंबराचे रद्द केल्यानें रद्द होऊं शकत नाहीं. सबब ह्या नोटिशीनें ही खबर आपणास दिली आहे. कळावें. ता. ४-१०-१६

सह्या

शेखअमीनोदीन वा शेखअनीमोदीन
जुमा मैजत कमेटी मेंबर मंगरूळपीर
नुरुलाखा मंगरूळपीर द० खु०
शेखमहेबुब वा शेखमलंग द. खुद
मे. ऐनादीन वा महमद हयात द. खु.
शेखलाल वा शेखचांद
सयदलाल वा सयदबद्र
नो. नं. ३९५

## नोटीस

रा. रा. पुर्णाजी बापूजी लोहार रा. भर ता. व पोष्ट मेहकर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून तूं मला लग्न झाल्यापासून वागवीत नाहीं. ता. १०-२-१९०९ रोजीं तूं मला करारनामा लिहून देऊन माझे अन्नवस्त्राची व्यवस्था करण्याचे व मला नांदविण्याचे कबूल केले परंतु त्याप्रमाणें तूं वागला नाहींस. त्याचप्रमाणें एक महिनापर्यंत तुमची वाट पाहून तूं मला न नांदविल्यास गंधर्व लावण्याची मला परवानगी करारनाम्यानें लिहून दिली आहेस. [illegible] ही नोटीस पावतांच १५ दिवसाचे आंत माझी अन्नवस्त्राची व्यवस्था करावी. व मला नांदण्यास घेऊन जावे. नाहींतर मला अन्नवस्त्रासाठीं कायदेशीर इलाज करावा लागेल. त्याचप्रमाणें एक महिन्याचे आंत तुह्मी मला न नांदविल्यास करारनाम्याप्रमाणें हीच फारकत समजून मी गंधर्व लावीन. कळावें. ही नोटिस

सही

मनी मर्द पुर्णाजी लोहार निशाणी आंगठा

नो. नं. ३९६

## नोटीस

गोविंदा वा रायभान फुरंगे हल्लीं राहणार कान्हेरी तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आकोला वऱ्हाडसमाचारपत्रांत तारीख ९ माहे आक्टोबर सन १९१६ रोजीं नोटिस दिली आहे असे समजते. त्यांत तुह्मी लिहिलेला मजकूर अगदीं खोटा आहे. लग्नांत मुलीचे वय फार लहान ह्मणजे २ वर्षाचे होते. इतक्या लहान मुलीचे अंगावर नोटिशींत लिहिलेले दागिने घातले ही गोष्ट मुळींच संभवत नाहीं. लहान मुलीचे अंगावर असलेले लहान लहान दागिने मुलीचे गंधर्व झाले त्यावेळीं चार संभावित लोकांसमक्ष तुह्माला दिले आहेत. आमचेकडे तुमचे कांहीं घेणें राहिलें नाहीं. तुह्मी नोटिस विनाकारण देऊन आह्मास त्रास देत आहा ह्यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. कळावें. ता. ४ माहे नोवेंबर सन १९१६

सही

सही बळवंता वा बाळाजी कचाले गवळी पाटील राहणार तुलंगा॥
ता. बाळापूर
नो. नं. ३९७

## नोटीस

जव्हारमल मोहता दुकान आमळनेर खानदेश

मी खालीं सही करणार ह्या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी आह्मास लिहिलेल्या मिती आषाढ शुद्ध ९ संमत १९७३ च्या कार्डाप्रमाणें आठवारी आठशें एक नंबरच्या बांडाची गाठ १ एक खरेदी केली ती अद्याप पाठविली नाहीं. तरी ही नोटिस पावल्यापासून ३ तीन दिवसाचे आंत सदहू गाठ १ आकोला स्टेशनवर रवाना करावी व रसीद आह्मास पाठवावी. नाहीं पेक्षां नोटिस पावलेल्या तारखेच्या भावाप्रमाणें आपलेवर नुकसानीचा दावा व्याजासह करूं व त्याचा सर्व खर्चाची जोखीम नोटिशीसह आपले वर राहील. ही नोटिस दिली सही.

सही

ता. ४ ११-१९१६ } बेहारीलाल बगडे दस्तुर
मु. रिसोड } बन्सीलाल
नं० नं० ३९८

## नोटीशीचें उत्तर

नोटीस बेशमी १ गोपी तेली व २ जानकी मर्द [illegible] राहणार पळसोद तालूका आकोट

यांसः—

मी खालीं सही करणार नोटिशीचें उत्तर देतो कीं तुह्मी उभयतांनी आपल्या सहीनिशी ता. १७-१०-१६ ची "वऱ्हाडसमाचार" त दिलेली नोटिस पावली. मी तुह्मास आगाऊ रोख रुपये ४०० चारशेंचा भरणा तुह्मास दिल्यानंतर तुह्मी स्वसंतोषानें ५ पांच वर्षांचें पट्टेखत मला नोंदून दिलें. व शेतीचा ताबा दिला. असें असतां कांहीं फंदी लोकांच्या सल्यानें तुह्मी मला भरणा न पावल्याबद्दल नोटीस दिली हें आश्चर्य आहे. इतकेंच नव्हे तर तींत कांहीं इतर लोकांचीं नांवें त्याची बदनामी करण्याचे इरादानें तुह्मी लिहिलीं आहे. पाटिलकीचा धाक दाखविला वगैरे खोटीं कारणें नोटिशींत पुढें आणलीं आहेत अशा करण्यापासून तुह्मी दिलेल्या पट्टेखताच्या हक्कास कोणताहीं बाध येणार नाहीं. सदरहू खोटे मजकुराची नोटिस देऊन तुह्मी माझे नांव बदनाम केल्याबद्दल मला कोर्टामार्फत योग्य तजवीज करावी लागेल. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें ता. ६-११-१९१६ इ०

सही.

मोतीराम विठोबा देशमुख द. खुद.
नो. नं. ३९९

# वऱ्हाडसमाचार

मिति कार्तिक वद्य ४ शके १८३८

## प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षांचें भाषण.

वऱ्हाड व मध्यप्रांत यांच्या संयुक्त प्रांतिक परिषदेचें जें अधिवेशन उमरावती येथें नुकतेंच झालें तें या दोन्ही प्रांतांच्या पुढाऱ्यांच्या उत्साहास, देशहिताच्या कळकळीस आणि सरकारी अधिकाऱ्यांशीं सलोखा व सहकारिता ठेवून वागण्याच्या पद्धतीस साजेलसें झालें हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो. परिषदेचे अध्यक्ष डॉ. हारिसिंग गौर ब्यारिस्टर यांचें भाषण व्यापक असून आटोपशीर, अत्यंत मुद्देसूद आणि टीकाविषयक असून नेमस्त व व्यावहारिक स्वरूपाचें होतें. नेमस्त असून निर्भीडपणाचें भाषण करण्याचा प. वा. नामदार गोखल्यांचे अंगीं जो विशेष गुण होता त्याची बरीचशी छाया डॉ० गौर यांच्या भाषणांत दिसून आली. आमच्या सर्व चळवळी राजनिष्ठेच्या भक्कम पायावर उभारलेल्या असल्यामुळें प्रस्तुतच्या युद्धांत

ब्रिटिश राष्ट्र विजयी व्हावें अशी कळकळीची इच्छा त्यांच्या भाषणांत अग्रस्थानीं येणें हें जितकें साहजिक होतें तितकेंच अशा संकटाचें वेळीं आपल्या सरकारच्या उपयोगीं पडण्यासाठीं स्वयंसैनिक होऊन सैन्यांत प्रविष्ट होण्याचा हक्क आह्मांस १८६९ च्या कायद्यानें दिला असतां कांहीं अतर्क्य कारणामुळें हिंदी लोक त्या हक्काला मुकले आहेत या गोष्टीबद्दल वाटत असलेली हळहळ जोरानें व्यक्त होणें ही साहजिक होतें. याचप्रमाणें स्वायत्तशासनाच्या हक्का संबंधानें किरकोळ बाबतींत मतभेद असला तरी सामान्य तत्त्वासंबंधानें हिंदुस्थानच्या कोना कोपऱ्यांत ही दिसून येणारें एकमत त्यांनीं स्पष्टपणें जाहिर केल्यानें अध्यक्षाचें कर्तव्य योग्य प्रकारें केलें असेंच ह्मटलें पाहिजे. तसेंच हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांना ऊर्जितावस्थेला आणण्याचें खात्रीचें उपाय ह्मणजे संरक्षक जकाती बसाविणें, देशी उद्योगांना विशेष सवलती व मदत देणें, व शास्त्रीय शोध, धंदे शिक्षणाचा प्रसार, पदार्थसंग्रहालयें उघडणें, इ० गोष्टी करणें हे होत व त्यांत ही संरक्षक जकातीचा उपाय अधिक महत्त्वाचा आहे हें सरकारच्या कानावर वारंवार घालण्याची अवश्यकता डॉ. गौर यांनीं ओळखली व त्यांच्या भाषणाचा येवढा सर्वसामान्य भाग सर्व हिंदुस्थानचें लोकमत ह्मणून सरकारपुढें मांडण्यास हरकत नाहीं अशा स्वरूपाचा होता. प्रांतिक प्रश्नांना ही त्यांच्या भाषणांत योग्य स्थान मिळालें होतें. शिक्षणविषयक प्रश्नाला जसें व्यापक तसें प्रांतिक स्वरूप ही आहे. नागपूर युनिव्हर्सिटीची योजना जरी सर्वांगपूर्ण नाहीं तरी ‘ अकरणान्मंदकरणं श्रेयः ’ या न्यायानें तिला मूर्त स्वरूपांत पाहण्यास व तिच्या पासून होणारे फायदे लवकर अनुभवण्यास मिळावे अशी लोकांची दृढ आकांक्षा सरकारानें शक्य तितक्या जल्दीनें पूर्ण करावयास पाहिजे यांत शंका नाहीं. अनुभवानें त्या योजनेंत दिसून येणारीं न्यूनें सरकार लोकहिताकडे दृष्टि देऊन कालांतरानें भरून काढील असा लोकांना पूर्ण भरंवसा आहे. सरकारी अधिकारी पूर्णता साधण्याच्या महत्त्वाकांक्षेनें कोणतेंही सत्कार्याला लवकर प्रारंभ करण्यास अनुत्सुक असतात; पण न्यूनतापूर्ति ही पुष्कळ अंशानें अनुभवावलंबी असते हें तत्त्व ते विसरतात. कायदेकौंसिलाच्या संबंधांत ही त्यांची अशीच प्रवृत्ति दिसून येते. नागपूरच्या कायदेकौंसिलांत ३० सभासद असावेत असा नियम असून फक्त २५ च जागा हल्लीं भरण्यांत येतात. यापेक्षां अधिक लायक माणसें या प्रांतांत दुष्प्राप्य आहेत असें ह्मणतां येणार नाहीं. संस्थेची वाढ हळूं हळूं करण्याची सदिच्छा याच्या मुळाशीं असली पाहिजे असें आह्मांस वाटतें. सावधानता हा मुत्सद्यांच्या अंगचा एक सद्गुण आहे; पण तिचा अतिरेक होऊन लोकांनीं नाउमेद व्हावें अशा प्रकारची स्थिति येणें ही चांगलें नाहीं. मध्यप्रांताचा विस्तार, व्यापार वगैरे व्यवहार, शिक्षणप्रसार इ. गोष्टी लक्षांत घेतल्या ह्मणजे मध्यप्रांतासाठीं चीफ कोर्टाची जी मागणी डॉ. गौड यांनीं केली आहे ती योग्यच आहे असें कोणास ही दिसून येईल. पंजाबापेक्षां कोणत्याही बाबतींत उणे नसलेल्या मध्यप्रांताची ही मागणी सरकारला कोणत्याही मुद्यावर नाकारतां येईल असें आह्मांस वाटत नाहीं. असें चीफ कोर्ट मिळाल्यास त्यांत सिव्हिलियन जज्जा ऐवजीं ब्यारिस्टर जज्ज व योग्य प्रमाणांत देशी जज्ज नेमण्यांत यावे अशा केलेली मागणी न्यायाचीच ह्मटली जाईल. तसेंच जमीनमहसुलाचे सुधारलेलें बिल पुढें आणण्यापूर्वीं त्या संबंधाचें लोकमत समजून घेणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें अवश्य कर्तव्य होतें. तें न घडल्याबद्दल लोकांना वाटत असलेला खेद व सावधगिरी ठेवण्याची सूचना, त्याच प्रमाणें शिक्षणासाठीं जादा कर बसविण्याचा अधिकार म्युनिसिपालिटींना देण्याची अवश्यकता, जिल्हा बोर्डांत लोकनियुक्त सभासद असण्याचें महत्त्व, ग्रामपंचायतींची स्थापना इ. सूचना लोकमताची वाढ हिंदुस्थानांत कशी होत आहे हें दाखविणारा बळकट पुरावा आहे, आणि त्याकडे दुर्लक्ष करणें ह्मणजे मुलाला जन्मभर बोळ्यानें दूध पाजीत राहीन असें ह्मणणाऱ्या प्रेमळ पण व्यवहारज्ञानशून्य आईच्या वर्तनासारखें हास्यास्पद होणार आहे. मुलाच्या वाढी बरोबर त्याला स्वतंत्रता देत जाणें हेंच शहाण्या आईबापाचें कर्तव्य आहे. लोकांनीं स्वतंत्र होऊन सरकारी अधिकाऱ्यांपासून फटकून दूर राहावें अशी पुढाऱ्यांची कधीं इच्छा नव्हती व नाहीं. हिंदुस्थानांत सरकारपक्ष निराळा व लोकपक्ष निराळा असण्याची कांहींच अवश्यकता नाहीं. दोघानीं सहकारिता ठेवून गुण्यागोविंदानें चालावें व राजहित तेंच लोकहित आणि लोकहित तेंच राजहित हीच भावना मनांत सतत जागृत ठेवावी असेच विचारी हिंदी गृहस्थांना वाटत आहे. मध्यंतरीं या बाबतींत जरी अविचाराची लाट आली असली तरी ती आतां गेली आहे आणि जहाल विचाराची मंडळीं जशी दूरवर विचार करण्यास शिकली आहे, तसे नेमस्त ही राष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतींत मुखपणा न ठेवतां मनांतल्या राष्ट्रीय भावनांना स्पष्टपणें प्रकट करण्याचें धैर्य करूं लागली आहे. परस्परांपासून परस्परांनीं असा बोध घेतल्यामुळेंच यंदाच्या सारख्या संयुक्त परिषदा भरविणें शक्य झालें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. त्याच प्रमाणें सरकारी अधिकारी व लोकांचे नायक यांच्या दृष्टीचें योग्य संमेलन झालेलें पाहण्याचा समाधानकारक प्रसंग लवकरच प्राप्त होवो असें आह्मी इच्छितों.

---

## राजे रजवाड्यांची कान्फरन्स.

हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांची कान्फरन्स खुद्द व्हाइसराय साहेबांच्या अध्यक्षत्वाखालीं दिल्ली येथें झाली. या परिषदेंत काय कामें झालीं तें बाहेर आलें नाहीं. फक्त व्हाइसराय साहेबांचें प्रास्ताविक भाषण व त्यांचे आभार मानतांना श्री गायकवाड सरकार यांनीं केलेलें भाषण येवढीं काय तीं प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. बाकीचें सगळें काम पडद्याआड झालें आहे. ज्या संस्थानिकांच्या व त्यांच्या प्रजेच्या हितासाठीं ह्मणून परिषद बोलाविली असें या व्हाइसराय साहेबांनीं निक्षून सांगितलें त्यांच्या पासून परिषदेची हकीकत चोरून ठेवण्यांत काय हेतु असेल तो आह्मांस कळत नाहीं. असो. प्रसिद्ध झालेल्या भाषणांवरून पहातां ही परिषद अल्पारंभी आहे तरी महत्कार्यकारी होईल असें दिसतें. आरंभ तरी निदान फार शुभसूचक आहे. कारण, व्हाइसराय साहेबांनीं पहिल्याच आपल्या भाषणांत तीन महत्त्वाचीं आश्वासनें दिलीं आहेत. १ लॉर्ड हार्डिंज साहेबांच्या वेळीं देशी राजे लोकांशीं व्हाइसराय साहेबांचा जो सख्यभाव होता तो कायम राखण्याविषयीं व सुधारण्याविषयीं आपण यत्न करूं, २ राजे व ब्रिटिश सरकार यांच्यामध्यें एखादे प्रश्नासंबंधानें मतभेद उत्पन्न झाला असतां त्याची चौकशी आपण स्वतः बारकाईनें करून निःपक्षपाताचा निकाल करूं; आणि ३ आजपर्यंत झालेले तहनामे पवित्र समजून त्यांचा अर्थ नुसत्या शब्दार्थावरून नव्हे तर त्याचें मर्म लक्षांत घेऊन करूं. हीं तिन्हीं आश्वासनें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. पहिल्याचें महत्त्व सांगावयासच नको. दुसऱ्या संबंधानें हें सांगितलें पाहिजे कीं देशी संस्थानिकांपाशीं ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधि ह्मणून जे पोलिटिकल एजंट असतात त्यांच्या रिपोर्टावर भिस्त ठेवणें ह्मणजे म्याजिस्ट्रेटानें सी. आय डी. च्या लोकांच्या रिपोर्टावर संपूर्ण विश्वास टाकण्यासारखें आहे. अशानें एकतर्फी व अर्थात् अन्यायाचा निकाल होण्याचा फार संभव आहे. व्हाइसराय साहेबांनीं स्वतः चौकशी करण्याबद्दलचें जें आश्वासन दिलें आहे तें या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. वस्तुतः व्हाइसराय साहेबांनीं याच्या ही पलीकडे जाऊन असे मतभेदाचे प्रश्न राजेरजवाड्यांच्या एखाद्या कौन्सिलापुढें मांडून सर्वांच्या अनुमतीनें योग्य तो निकाल द्यावयास पाहिजे. श्री गायकवाड महाराजांनीं आपल्या भाषणांत हीच गोष्ट सुचविली आहे; आणि जरी ती आज प्राप्त झाली नाहीं तरी पुढें मागें होईल अशी उमेद आहे. तिसरें आश्वासन तर अत्यंत महत्त्वाचें आहे. संस्थानिकांचें सगळें जीवित व सगळ्या आशा ज्या तहनाम्यांवर अवलंबून आहेत त्या तहनाम्यांना जर्मन केसरप्रमाणें कागदाचा चिठोरा मानण्याकडे सरकारी अधिकाऱ्यांची बिलकुल प्रवृत्ति नाहीं, इतकेंच नाहीं तर त्यांचा अर्थ करतांना सुद्धां नुसता शब्दच्छल न करतां मर्म लक्षांत घेऊन अर्थ करण्यांत येईल या आश्वासनानें राजे लोकांना मोठाच धीर येईल यांत शंका नाहीं.

---

याच प्रसंगीं व्हाइसराय साहेबांनीं प्रस्तुत युद्धांत संस्थानिकांनीं ब्रिटिश सरकारास स्वतः लढाईवर जाऊन व सढळ हातानें द्रव्यसाह्य देऊन जी साम्राज्यनिष्ठा प्रदर्शित केली तिचाही पुनः एकवार उल्लेख केला. हिंदुस्थानानें कांहींच मदत केली नाहीं असे ह्मणणारे उलट्या काळजाचे कांहीं टीकाकार मधून मधून आपले विषारी फुत्कार इंग्रजी पत्रांत सोडून ब्रिटिश लोकमत दूषित करूं पाहत असतात. त्यांचें तोंड खुद्द व्हाइसराय साहेबांच्या उद्गारानें बंद पडलें नाहीं तरी ब्रिटिश जनता असल्या टीकाकारांचीं खरी योग्यता ओळखून राहील.

---

ही परिषद वादग्रस्त प्रश्नासंबंधानें राजे लोकांनीं आपली सल्ला मन मोकळेपणानें द्यावी या साठीं बोलाविली आहे असें सांगून या परिषदेच्या वारंवार बैठकी झाल्यास पुढें मागें तिला व्यवस्थित कौंसिलचें ही स्वरूप येण्याचा संभव आहे अशी आशा व्हाइसराय साहेबांनीं प्रकट केली; आणि श्री गायकवाड सरकारांनीं संस्थानिकांच्या तर्फे आभार मानतांना तथास्तु ह्मटलें यावरून राजे लोकांनाही हेंच पाहिजे आहे हें व्यक्त झालें. यावरून राजे लोकांना ही एकतंत्री शासनपद्धति पेक्षां बहुमत तंत्रशासनपद्धति अधिक पसंत आहे असें अनुमान काढल्यास तें चुकीचें होणार नाहीं. ही भावना दृढ झाल्यास स्वतःसंबंधानें ज्या बहुमताची उपयुक्तता त्यांना पटते तेंच बहुमत आपल्या संस्थानच्या राज्यकारभारांत ही प्रविष्ट करून स्वतःचे अधिकार नियमित करून घेण्यास त्यांनीं तयार झालें पाहिजे हें उघड आहे. नाहीं तर स्वतःच्या फायद्यापुरता बहुमताला मान द्यावयाचा आणि आपल्या प्रजेच्या संबंधांत मात्र त्याला तुच्छ लेखावयाचें असा दुटप्पीपणा त्यांच्या संबंधाच्या पूज्यभावाला विघातक होईल हें त्यांनीं ध्यानांत ठेवून आपापल्या संस्थानांत लोकसभा व कायदे कौंसिलें वगैरे स्थापन करण्यास व या संस्था केवळ दिखाऊ न ठेवतां खऱ्या खऱ्या सत्ताधारी होतील असें करण्यास तयार झालें पाहिजे. आपला कारभार लोकमताच्या विस्तृत व भक्कम पायावर बसविल्याशिवाय केवळ पोलिटिकल एजंटाची किंवा व्हाइसराय साहेबाची मर्जी संभाळून त्यांना आपल्या संस्थानांना चिरस्थायित्व आणतां येणार नाहीं.

---

या परिषदेंत आणखी एका गोष्टीचा उल्लेख प्रामुख्यें करून करण्यांत आला. ती गोष्ट ह्मणजे ब्रिटिश सरकारनें संस्थानिकांच्या अंतर्गत कारभारांत व संस्थानिकांनीं ब्रिटिश सरकारच्या अंतर्गत कारभारांत हात घालूं नये असें परस्परांनीं परस्पराला दिलेलें आश्वासन ही होय. देशी संस्थानिकांना स्वतःचेंच राज्यकारभाराचें काम इतकें असतें कीं तेंच त्यांनीं प्रामाणिकपणानें करूं ह्मटलें तर त्यापासून त्यांचें व त्यांच्या प्रजेचें हवें तेवढें कल्याण त्यांना करतां येईल. पण अद्याप कित्येक संस्थानिकांना स्वतःच्या चैनीपलीकडे कांहीं दिसत नाहीं, आणि त्यांच्या हातून आपलें कर्तव्य बजाविलें जात नाहीं. अशा स्थितींत ते दुसऱ्याच्या घरच्या कारभाराची उठाठेव करण्याची हाव बाळगतील हें संभवनीय नाहीं. पण कित्येक इंग्रज लेखक या संस्थानिकांना ब्रिटिश सरकारच्या कौंसिलांत जागा देऊन त्यांच्या द्वारें सदर कौंसिलांतल्या लोकमताला दुर्बळपणा आणण्याची सूचना करीत असतात; त्यांना व्हाइसराय साहेबांचें हें आश्वासन कसें काय रुचेल तें रुचो. खुद्द स्टेटसेक्रेटरी साहेबांकडून नुकतेंच गव्हर्नमेंट ऑफ इंडिया आक्ट

डेमंट आक्ट पास करण्यांत आला त ही देशी संस्थानिकांना व त्यांच्या ला कौंसिलांत मेंबर ह्मणून नेमण्याचा धिकार हिंदुस्थान सरकारला देण्यांत आला हे. व्हाइसराय साहेबांच्या या आश्वास-शीं त्या कलमाचा मेळ कसा घालाव-चा तें आह्मांला कळत नाहीं.

## वऱ्हाडचें कॉलेज.

(बुलढाण्याची कॉलेजकडे योजना.)

थोड्या दिवसांपूर्वी नामदार राव बहादुर मोळकर यांनीं वऱ्हाडच्या कॉलेजा संबंधानें निक कौंसिलापुढें प्रश्न आणलेला होता. णि त्याची वाटाघाट सर्व विद्याभिलाषी ळींत जोरानें चालू आहे. हा कॉलेजचा श्न प्रथमता जेव्हां निघाला तेव्हांच आह्मी चविलें होतें कीं उमरावती हें ठिकाण कॉलेजाच्या पयोगासाठीं अगदीं अपात्र आहे. त्याचवेळीं लिचपूरच्या भागाचे एखादें मैदान पहावें सें आह्मी सुचविलें होतें. पण त्या पेक्षांही लढाणा कॉलेजच्या उपयोगाला विशेष सुलभ सोयीचें होईल. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला हवाशीर स्थळ सर्वच जण पसंत करि-ल. विद्यामंदिर लोकांच्या उपसर्गा पासून र दूर असावें. तेथें गुरु कुलाच्या पद्ध-वर विद्यार्थ्यांच्या मनाचा उत्साह, साहस-धैर्य हीं निसर्गतः च चांगलीं उत्तेजित तील. आणि कॉलजाचीं उच्च उच्च ध्येयें द्यार्थ्यांच्या मनापुढें रमण्याला बुलढाण्याचें सृष्टीवैभव परिपोषक होईल. वऱ्हाडचे भावी लिज खरोखर नमुनेदार असावें आणि ा कॉलेजाचा विशेष हाच पाहिजे कीं यमान कॉलेजातील दोष काढून टाकून थें विद्यार्जनाची संस्कृती सर्व बाजूंनीं सुंदर समृद्ध असली पाहिजे. निवळ गता-गतिकपणा या कॉलेजच्या सस्थापनेंत होऊं ये. आणि इतर कॉलेजांच्या ताल भाजना-माणें हाही एक चेंबू आस्तित्वांत येऊ नये णून आमची उत्कट इच्छा आहे. आणि थें या भावी कॉलेजाची गंगाजळी लोकांच्या र्गण्यांनीं भरलेली आहे, तेथें आमचें कॉलेज सें असावें अशी मागणी सरकारपाशीं रण्यापेक्षां सरकारानेंच लोकांच्या इच्छा ाहून त्यास होकार देण्याचा बहुमान मिळ-वण्याची संधी निः संशय सरकार दवडणार ाहीं. लोकानुरंजन हें सरकारचें मुख्य र्तव्य होय. आणि कॉलेजा सारख्या भावी पेढ्या बनविणाऱ्या संस्थेच्या बाबतींत तें र्तव्य आपल्या सौंदर्यानें व तेजानें सर्वत्र हिःस्फूर्त झालें पाहिजे.

## औद्योगिक कमिशन व सामान्य सूचना

(४१ अंकावरून पुढें चालू.)

व्यापार धंद्याच्या वाढींकरितां वाहनांची विपुलता व स्वस्ताई असली पाहिजे व त्या करितां कमिशनपुढें जी ६ वी सूचना आहे ती रेल्वेवर विशेष सवलती देण्यासंबंधाची आहे. परंतु याच्या ही पेक्षां अतिशय महत्वाची बाब ह्मणजे हिंदी व्यापाराकरितां हिंदी लोकांना जहाजें आपल्या मालकीची ठेवण्यासंबंधीं सवलती देण्याची होय. चलू युद्धामुळें तर हिंदुस्थानचे व्यापाऱ्यांना स्वतः-ची गलबतें नसल्यामुळें किती नुकसान होते ही गोष्ट पूर्णपणें समजली आहे. आज मित्तीला ज्या कित्येक पदार्थांचे भाव कल्प-नेच्या बाहेर वाढले आहेत यांचें कारण आमचे जवळ परक्या देशांतला माल आण-ण्याकरितां जहाजें नाहींत एवढेंच होय. व जपाननें जो दोन तीन वर्षांमध्यें कोट्यावधी रुपयाचा व्यापार केला आहे, तो तरी जहाजांच्याच बळावर केला आहे. परकी देशांत माल नेण्याकरितां आमच्या व्यापाऱ्यां-ना दुसऱ्या देशाच्या जहाजवाल्यांच्या तोंडाकडे पहावें लागतें व हे लोक आपल्या लोकांचा फायदा करण्याकारितां आपल्या व्यापाऱ्यांचा माल अगोदर घेऊन जातात व त्यामुळें सगळा फायदा त्या व्यापाऱ्यांचे वशांत पडतो. आमच्या व्यापाऱ्यांना आपली स्वतःचीं जहाजें ठेवण्याकारितां सरकारनें उत्तेजन दिलें पाहिजे व त्यास विशेष सवलती दिल्या पाहिजेत. असें केल्यानें हिंदुस्थानच्या मालाची नुसती ने आण करण्याबद्दल जे लाखो रुपये पर-कीयांच्या खिशांत पडत आहेत ते आमच्या खिशांत पडतील व आमच्या व्यापाऱ्यांना परदेशी व्यापाऱ्यां बरोबर टक्कर मारतां येईल व अशा तऱ्हेनें देशी धंद्याची भरभराट होईल. जहाजें बांधण्याची कला आमचे देशांत नव्हती असें नाहीं. मुंबईचे प्रख्यात वाडीया यांचा जहाजें बांधण्याचा मोठा प्रचंड कारखाना होता व त्यांच्या कारखा-न्यांत नुसती व्यापारी जहाजेंच बांधलीं जात असत इतकेंच नव्हेतर ते लढाऊ गलबतें सुद्धां बांधीत असत व खुद्द इंग्रजी आरमारा मध्यें ५० वर्षांपूर्वीं वाडीया यांनीं बांधलेलीं लढाऊ जहाजें होतीं. परंतु सरकारच्या विशिष्ट धोरणामुळें या धंद्यास सवलती मिळेनाशा झाल्या व आज मितीला हिंदुस्था-नांत एकही जहाज बांधलें जात नाहीं! व हिंदी व्यापाऱ्यांचा व्यापारी गलबतांचा Mercantile fleet एकही तांडा नाहीं. करितां या कमिशनपुढें व्यापारधंद्याच्या भर-भराटी करितां सरकारनें व्यापाऱ्यास जहाजें बांधण्याच्या किंवा स्वतःच्या मालकीचीं जहाजें ठेवण्याकरितां विशेष सवलती द्यावयास पाहिजेत कीं काय या प्रश्नाचा उहापोह केला जावा.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांतल्या महायुद्धाच्या प्रग-तीसंबंधानें पुढील ठळक गोष्टी नमूद कर-ण्यासारख्या आहेतः—कित्येक दिवसपर्यंत जोराचा तोफांचा भडिमार करून अखेर फ्रेंचांनीं व्हो नांवाचा मजबूत किल्ला सर केला. व्हर्डुनच्या भोंवतालच्या किल्ल्यांचा पट्टा आतां संपूर्ण फ्रेंचांच्या ताब्यांत आला आहे. फ्रेंच सैन्यें लेज व्यूफस व सेलीसेली सेल यांच्या मध्यापर्यंत जाऊन पोंचली आहेत. आर्मेंटियर्स पासून आरासपर्यंत ३० मैलपर्यंत प्रदेश ब्रिटिश तोफांनीं आपल्या आटोक्यांत घेतला असून तेथें त्यांची गर्जना सारखी चालली आहे. लेज व्यूफसच्या पूर्वेकडे ब्रिटिशांनीं बराच लाभ संपादिला असून कांहीं ठिकाणीं शत्रूच्या खंदकांवर हल्ले करण्यांत यश संपा-दन केलें आहे. कार्पेथियन पर्वतांतली स्थिति सुधारत आहे; आणि त्या बरोबरच जूल दरींत शत्रूवरचें संकट वाढत आहे. जर्मनीला सैन्याची तूट पडल्यामुळें पोलांडच्या लोकांतून सैन्यांत भरती करण्याचे प्रयत्न चालले आहेत. पण ते लोक एरव्हीं खुषीनें येणार नाहींत ह्मणून त्यांना स्वराज्याचे अधिकाराचें आमिष एका जाहिरनाम्यानें ला-वण्यांत आलें आहे. रुमानियानें ग्रामोव्या पूर्वेस सरहद्दीवर हल्ले करण्याचा क्रम पुनः जोरानें सुरू केला आहे, आणि आस्ट्रियन सैन्यांना बरेंच मागें हटविलें आहे. लंडन टाइम्सच्या बातमीदाराचें असें मत आहे कीं रुमानिया असाच नेट धरील तर आणखी कित्येक आठवडेपर्यंत शत्रूला अंतर्भागांत प्रवेश करतां येणार नाहीं. आणि मग एकदां हिंवाळा सुरू झाला म्हणजे ती गोष्ट अशक्य होईल. एकंदरींत रुमानियाची स्थिति समाधानकारक आहे डान्यूब नदीवर रुमानियाचा तोफखाना पाहारा देत असून शत्रूला मागें परतवीत आहे. ग्रीसमधली गडबड अजून शांत झाली नाहीं व ग्रीस मित्र राष्ट्रांना मिळेपर्यंत लोक स्वस्थ होणार नाहींत. पण तेथल्या मूर्ख राजाला अजून येवढी गोष्ट कळत नाहीं हें आश्चर्य आहे. त्याचे लोक व्हेनो झुलोसच्या पक्षाचा अजून छळ करीत आहेत. या पक्षाचे २९ आ-फिसर कैद करण्यांत आले असून एकाला तर सुळावर ही देण्यांत आलें! व्हेने झुलोसच्या पक्षाकडे मनाचा कल दाखविणारांना सैन्यां-तून बडतर्फी देण्याचा ही धाक घाल-ण्यांत आला आहे. इतका छळ होत आहे तरी व्हेनो झुलोसची लोकप्रियता कमी झाली नाहीं. त्याच्या पक्षाचे जनरल डांगलिस यांनीं एका मुलाखतींत नुकतेंच सांगितलें कीं आमच्या जवळ लवकरच सै-न्याच्या चार डिव्हिजन्स होतील. ब्रिटिश अणि फ्रेंच सेनापतीच्या विचारानें जनरल सारेल हे पुढील बेत ठरवीत आहेत. ते अंमलांत येतील तेव्हां बल्गेरियन लोकांना म्यासिडोनियाच्या पूर्व भागांतून पाय काढावाच लागेल. ग्रीक राजाच्या लढाऊ नावांपैकीं एकीवर फ्रेंचांनीं आपलें निशाण चढाविलें आहे.

## प्रांतिक परिषदेचे ठराव.

अमरावतीस भरलेल्या प्रांतिक परिषदेस एक हजारावर प्रतिनिधि व ४६० वर स्वागत कमिटीचे सभासद जमले असून त्यांनीं परिषदेच्या कामाविषयीं विलक्षण उत्साह दाखविला. कित्येक ठरावांचे वेळीं हा उत्साह विशेष प्रकट झाला होता. मिसेस आनी बिझांटबाईना मध्यप्रांतांत येण्याच्या बंदीच्या हुकमानें लोकांच्या स्वातंत्र्याचें अपहरण केलें आहे आणि विशेषतः धार्मिक बाबतींत ढवळाढवळ करून लोकांचा हक्क हिरावून घेणारा हा हुकुम आहे अशी लोकांना भीती पडल्यामुळें सदर हुकुमाचा निषेध करण्याच्या ठरावाला परिषदेच्या दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमांत अग्रस्थान देण्यांत आलें होतें. हा ठराव रा. सा. महाजनी सारख्या राजमान्य आणि नेमस्त ह्मणून प्रसिद्ध असलेल्या गृहस्थानेंच पुढें आणिला या वरून या संबंधाच्या लोक-मताची तीव्रता लक्षांत येईल. या ठरावावर मि. वाडिया यांचें भाषण सर्वोत्कृष्ट झालें. याच बैठकींत दुसरा एक महत्वाचा ठराव पास झाला त्याचा ही उल्लेख करणें जरूर आहे. हा ठराव ह्मणजे व्हाइसराय साहेबांच्या कायदेकौंसिलांतल्या एकोणीस लोकनियुक्त सभासदांनीं एकमतानें केलेली स्वराज्याची मागणी आपणांस मान्य आहे व हिंदी लोकांच्या राजनिष्ठेस पूर्णपणें अढळ कर-ण्यास व स्थिरतेचें रूप देण्यास स्वराज्याचे अधिकार हिंदुस्थानाला मिळणें अवश्य आहे असा या ठरावाचा मतलब होता. हा ठराव रा. ब. ठाकूर यांनीं पुढें मांडला व त्यास एका मुसलमान गृहस्थाचें अनुमो-दन मिळून तोही पास झाला. या दोन्ही ठरावाचें व्यापक स्वरूप; व हल्लींचे काळीं त्यांचें महत्त्व हीं लक्षांत घेतां या ठरावांना जें अग्रस्थान व महत्त्व देण्यांत आलें व ते ठराव पास होतांना लोकांनीं टाळ्यांच्या कडकडाटानें जी आपली संमति प्रदर्शित केली. त्या बद्दल कोणास आश्चर्य वाटाव-यास नको.

## प्रांतिक परिषद्.

(लोकवृत्तीचा उल्लास.)

अमरावतीची प्रांतिक परिषद् सर्वांगसुंदर अत्यंत रमणीय व उदात्त विचारांना प्रबोधक अशी झाली. या समारंभाला जे जे प्रतिनिधी व प्रेक्षक हजारों जमले त्यांना हें आश्चर्य वाटले असेल कीं या तीन दिवसाच्या राजकीय शाळेंत ज्या अनेक विद्या आनंदानें, उत्साहानें व साहसानें सर्वजण शिकले त्यांस आयुष्याची किंबहुना नव्या पिढीची एक राजकीय भव्य इमारत बांधली जात आहे अशी कल्पना तात्काळ येईल. बरोबर मंडळी येथून जो विचार सुवर्णाचा खजिना घेऊन परत जातील तेव्हां त्यास तें विचाराचें सोनें आपल्या इतर बंधुजनांमध्यें लुटतांना किती अपरंपार आल्हाद वाटेल हें या समारंभास हजर असलेलें अंतःकरण व तसेंच त्या अंतःकरणाच्या प्रेमळ वाणीला ऐकणारें दुसरें अंतःकरण यांनाच कळण्यासारखें आहे. सार्वजनिक क्रियाशक्ती केवढी श्रीमान् आहे आणि तिचें स्फुरण एकदां मनुष्याच्या अंगांत रसरसूं लागलें ह्मणजे राष्ट्राची विलक्षण वडामोड होते आणि मनुष्य आपल्या राष्ट्रीय ध्येयासाठीं कसे तन, मन धन अर्पण करण्याचा संकल्प कारितात याची प्रचिती या परिषदेंत इतकी सुंदर मनावर बिंबली कीं त्या वेळच्या निरनिराळ्या वक्त्यांचे ते दैवी विचार व त्यांच्या मनोभावनेनें श्रोत्यांच्या अंतःकरणांत उभारलेलें सदृश विचार हे डोळ्यांपुढें अद्यापी ही मूर्तिमंत उभे असून निरनिराळ्या वक्त्यांचीं मनानें काढलेलीं प्रकाशचित्रें अंतःकरणांना आनंद, उत्साह व प्रेरणा प्रत्यक्ष देत आहेत असा भास होतो. या परिषदेमध्यें

एक मोठा विशेष हा होता कीं मतभेद नानाविध, तीव्र व जाज्वल्य असून ही विचारांच्या स्वातंत्र्याला शोभा आणीत असत आणि राजकीय उन्नतीला विलक्षण शक्ती आणीत होते. अशी यशःश्रीनें माळ घातलेली ही परिषद् देवी आमच्या राजकीय कुरुक्षेत्रावर सदा विराजमान राहील. आणि तिच्या त्या उच्च ध्वजेवर नानारंगांत लिहिलेलीं राजकीय ध्येयें साम्राज्याचें वैभव प्रसृत करून आह्मीं लोकांच्या आकांक्षाचे मार्ग खुले करून देतील.

---

## थोर व्यक्ती.

( नवी कार्य प्रतिभा. )

वऱ्हाडांत पूर्वी राष्ट्रीय सभा ही होऊन गेली, पण गेल्या ५-६-७ तारखेला भरलेली प्रांतिक परिषद् त्या सर्वांहून ही अप्रतिम अशी झाली. तिच्या त्या अनुपमेय यशाचा वाटा जिकडे तिकडे देऊं लागलों तेव्हां किती तरी थोर पुरुषांचा परिचय घडतो. त्यांचे तें मार्दव, कार्य काठिण्य व भगीरथ प्रयत्न हीं पाहून त्या त्या थोर पुरुषांचें लिंबलोण करावें तितकें थोडें असें वाटतें. व्यक्ति निर्देश मनाला आनंद देतो खरा; पण तें कार्य जलप्रवाहावर रेघा काढण्या इतकेंच दुष्कर आहे. औपचारिक पद्धतीनें कांहीं नांवें पुढें मांडावीं तर त्यांच्या मागें केवढी तरी सुजनांची सेना वगळली जाईल. तथापि सेनाध्यक्षाचा जय घोष ऐकला ह्मणजे जसे सैनिक आनंदानें तर्र होत असतात, तद्वत्च अनुभवाच्या दिशेनें आह्मी राजश्री दादासाहेब खापर्डे, अण्णासाहेब जोशी व तात्यासाहेब मुधोळकर यांचे धन्यवाद गातों. या तीन व्यक्तींनीं सर्व उमरावती शहरच काय तर सर्व प्रांत एक तऱ्हेनें दणाणून दिला आहे. यांच्या अध्यक्षतेखालीं उमरावतीची वकील मंडळी, व्यापारी मंडळी व इतर सुखवस्तु लोक परिषदेचा स्थूलदेह निर्माण करण्यांत अगदीं तल्लीन होते. पांच हजार सभासद बसतील येवढा टोलेजंग शोभायमान सभा मंडप, हजारो पाहुण्यांचें आदरातिथ्य बादशाही थाटावर करण्याची ती कडेकोट तयारी आणि या सर्वांवर विजेप्रमाणें चमकणारा तो मनाचा उत्साह, स्फूर्ति व रमणीय प्रेरणा हीं पाहिलीं ह्मणजे वरील तीन व्यक्तींमध्यें केवढी कर्तुम् अकर्तुम् शक्ती आहे याची कल्पना होईल. या तिन्ही गृहस्थांनीं आपल्या सहकारी मंडळीसह उत्तम यश संपादलें हे शब्द प्रत्यक्ष अनुभवापुढें अगदीं निरस वाटतील. पण याहूनही यांची दुसरी एक वर्णनीय कामगिरी फार धन्यतेची आहे. राजकीय हिमालयातून निघणारे हे तीन महानदच हो. आमच्या प्रांतांतील विचारांमध्यें खरेप्र कांहीं पाणी असेल तर त्यांना या तिन्ही प्रवाहांचा लाभ झालेला आहे असें कोणींही प्रांजळपणें कबूल करील. यांच्या सारखी वयोवृद्ध मंडळी आपल्या राजकीय तपसामर्थ्यानें लोक [illegible] नवी जीवनक्रिया कशी आणीत [illegible] हें या सुप्रसंगी जग जाहीर झालें. हे त्रिवेही महायोद्धे आपल्या संग्राहक शक्तीमुळें प्रतीभीष्म आहेत. आणि ह्मणूनच आह्मीं मोठ्या आनंदानें यांचें अभिनंदन करितो. सत्कार्याची पावन क्रिया फार विलक्षण आहे; किंबहुना ही एक अद्भुत रसायन शाळाच होय. या राजकीय कार्याच्या क्षेत्रांत गेल्या सत्रकांत किती तरी नवी जुनी थोर थोर मंडळी आपल्या प्रभावानें चमकत होती! खुद्द आमचे अध्यक्ष डॉ. गौर हे विद्वत्तेनें जरी फार पुढें असले तरी राजकीय धुरंधर या दृष्टीनें हे नुकतेच पुढें आले, पण त्यांच्या अहमहमिकेनें त्यांना इतकें पुढें लोटलें कीं त्यांच्या विचारांतला तो स्वराज्याचा वेणूरव लोकांच्या कानीं पुष्कळ दिवस गुंगत राहील. रावबहादूर काशीनाथ केशव ठाकूर पेन्शनर डिव्हीजनल जज्ज यांनीं पेनशन घेतल्यानंतर लागलीच या परिषदेंत "स्वराज्या" चा ठराव पुढें करावा हा केवढातरी काय महिमा होय! या ठरावाचें अग्रेसरत्व आपणाकडे त्यांनीं घेतलें हें प्रसादाचिन्हच होय. यांच्या सारख्या थोर अधिकाऱ्यांना आपलीं मनें सुसंस्कृत व उपयुक्त करण्याचा हा त्यांनीं धडाच घालून दिला असें आह्मी समजतों. स्वागत कमीटीचे अध्यक्ष या नात्यानें नामदार राजश्री जोशी यांनीं जें प्रास्ताविक लेखी संभाषण केलें त्याबद्दल लोकांनीं मान्यता मोठी आनंदोद्गारांनीं प्रदर्शित केली. एकंदर संभाषणामध्यें या स्वागतपर भाषणाला पाहिला नंबर देण्यांत येत आहे. त्यांतील वक्तृत्व शब्दलालित्यापेक्षा विचारसौष्ठवांत विशेष आहे. स्वधर्मोक्ती, सत्याग्रह व अनुभवाचा शिक्का मोर्तब यांनीं सर्वच भाषणाला तेजस्विता आणिली आहे हें संभाषण सर्व व्याख्यानांतील विषयांचा सारांश असून त्याच्या हृदयगर्भांत पूर्ण मुत्सद्देगिरी भरलेली आहे. सैन्याच्या भरती संबंधानें बोलतांना राजश्री जोशी यांनीं इंग्लिश लोकांना प्रोत्साहन करणाऱ्या सर्व गोष्टींचा संग्रह या देशांत होऊं द्या ह्मणजे हिंदी लोक जगांतील कोणत्याही राष्ट्राला हार जाणार नाहींत, अशा अर्थाची प्रतिज्ञा करून सांगितलें. तसेंच त्यांच्या भाषणाच्या शेवटीं विदुषी ॲनी बिझांट बाईंना जो प्रतिबंध करण्यांत आला आहे त्याविषयीं त्यांनीं आपले विचार सणसणीतपणानें लोकांच्या पसंतीसाठीं मांडले. नामदार रावबहादुर मुधोळकर यांनीं या परिषदेचीं सूत्रें फार नाजूक रितीनें, समतोल बुद्धीनें व मोठ्या चातुर्यानें चालू ठेविलीं होतीं. वयाच्या ६० वे वर्षीं रात्रंदिवस सार्वजनीक कार्य मोठ्या नेटानें व चिकाटीनें करण्याची उत्साह शक्ती तरुण पिढीनें यांच्या पासून शिकण्यासारखी आहे. रावबहादुरांचे हे गुण अनुकरणार्थ मांडतांना आह्मी मोठ्या गौरवानें त्यांच्या दुसऱ्या एक सर्वोत्कृष्ट लोकसेवेची बाजू मुद्दाम पुढें आणीत आहों. प्रेस ॲक्टाला लौकर तिलांजली द्यावी ह्मणून जो ठराव पुढें आणण्यांत आला होता त्यावर प्रेसिडेंट साहेबांच्या विनंतीवरून ते मुद्दाम बोलावयास उठले. तेव्हां त्या ॲक्टाचा पूर्व इतिहास सांगतांना ६ वर्षांपूर्वीच्या बंगालच्या अराजकतेला उद्देशून ते कांहीं बोलणार, इतक्यांत सर्व सभागृहांत विद्युल्लतेप्रमाणें एकच चळवळ उडाली. पण त्यावेळीं आमचे रावबहादुर काडीमात्र डगमगले नाहींत आणि त्यांनीं श्रेष्ठ कायदे कौंसिलांतील आपली तेव्हांची दृष्टी या कायद्याला अनुकूल कशी झाली होती हें मोठ्या सत्यनिष्ठेनें त्यांनीं सांगितलें. आणि त्या समयीं ते आपल्या विचारबलानें न्यायशिखरावर इतके उंच पोहचले होते कीं सर्व सभागृह एकदम प्रशांत झालें आणि त्यांनीं आपली स्वराज्याची नौबत इतकी जोरानें वाजविली कीं धन्यवाद व आनंदाचा जयघोष यांमध्यें त्यांचें सर्वांनीं प्रेमळपणानें अभिनंदन केलें. थोरले खापर्डे साहेब प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपल्या सरस्वतीचा लाभ श्रोतृसमाजास देऊं शकले नाहींत; तथापि त्यांच्या थोडावेळ झालेल्या आगमनानें जें मौनवक्तृत्व केलें तें देखील राष्ट्रकार्यास झटणाऱ्या पुरुषांची लोक महती किती मानतात हें कळविण्या इतकें शक्तीमान आहे. विदुषी ॲनी बिझांटबाईवर स्थानिक सरकारचा बहिष्कार पडला आहे, त्या संबंधानें आमचे नागरिक रावसाहेब रामभाऊ महाजनी यांनीं धैर्यानें आपला ठराव सभेपुढें मांडला आणि त्याचें समर्थनार्थ विकारवश न होतां विचाराच्या बाजूनें सुंदर युक्तीवाद केला व सरकारची ही घोड्याएवढी चूक लोकांपुढें नेटानें मांडली याबद्दल आह्मी त्यांचा मोठा गौरव करितों. व ते जें बालकडू प्याले आहेत, त्याची व्याप्ती विचाराच्या क्षेत्रांत फार लांबवर पसरलेली आहे हें ह्या अनुरोधानें सांगितल्यावांचून रहावत नहीं. आकोल्याचे रावबहादुर दामले यांनींही कायदेकौंसिलांत ३० सभासद असण्याविषयींची तात्कालिक सूचना मोठ्या गोड व शास्त्रीय पद्धतीनें केली. आणि हल्लींची फायनान्स कमिटी ह्मणजे एक निर्जीव बाहुली कशी उभारलेली आहे हें ही त्यांनीं जोरानें सांगितलें. राजश्री ब्रह्म, काणे, मुंडले, परांजपे, द्रवीड गुलाम अहमदखां, अब्दुल रऊफशहा, यशवंतराव देशपांडे, रामराव गोपाळ देशपांडे, छोटे खापर्डे, चाफेकर, दीक्षित, रावसाहेब ठकार, आणे, दाऊतखान सुफी, डाक्टर घोलकर, आळेकर, जयवंत, ठेंगडी केळकर, घोरपुरे, इ. इ. थोर थोर गृहस्थांनीं निरनिराळ्या ठरावावर बोलतांना आपापल्या परीनें विचारसौंदर्य असें प्रसृत केलें कीं त्यांच्या त्यांच्या निरनिराळ्या ठरावाला लोकमताची परिपुष्टी मिळाली. आणि त्यापेक्षांही लोकांच्या मनामध्यें या बहुविध पुष्कळशा ठरावा संबंधानें विलक्षण जागृती उत्पन्न केली या बद्दल आह्मी त्यांचे अत्यंत ऋणी आहों.

---

## दारूगोळा.

आकाशांत जसा धूमकेतू दुश्चिन्हकारक तसाच इंडियन डिफेन्स ॲक्टचा दारूगोळा संहारसूचक आहे. विदुषी आणि बिझांट यांस जो वरील कायद्याअन्वयें या प्रांतासंबंधानें बहिष्कार घालण्यांत आला त्यामुळें इंडियन प्रजे धार्मिक बाबतींत ही सरकारनें विना हात घातला ह्मणून सर्वत्र ओरड आहे. या विदुषी थिआसाफिकल सोसायटीच्या प्रेसिडेंट या नात्यानें वऱ्हाड व मध्यप्रांत या मधील थिआसाफिकल शाखांच्या संमेलन समयीं अध्यक्ष होणार होत्या. पण सरकारच्या वरील कृतीमुळें त्यांना आपले धर्मविषयक गोष्टी संबंधानें हि कर्तव्य बजावतां आलें नाहीं. व्हिक्टोरिया सरकारच्या ५८ सालच्या जाहीरनाम्याचें कलम या रितीनें तोडलें गेलें व लोकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर अशी गदा येऊन पडली ह्मणून आमच्या स्थानिक सरकारावर सर्व राष्ट्राचा रोष झाला आहे. पण रोषाला आमचे स्थानिक सरकार खरोखर पात्र नाहीं असें आह्मास एका विचाराच्या बाजूनें वाटतें. आह्मी प्रांजलपणें हें मुद्दाम कळवितों कीं विदुषी बिझांटबाईच्या व्याख्याना संबंधानें आमच्या सरकारचा मानसीक प्रतिरोध नव्हता. किंबहुना त्यांच्या त्या उत्कृष्ट व्याख्यानांचा रसास्वाद घेण्यासाठीं मोठे मोठे अधिकारी मुद्दाम सभेला आले ही असते. अलीकडे या बाईंनीं विद्याविषयक गोष्टींमध्यें व मुख्यतः राजकीय गोष्टींमध्यें जो अग्रणीपणा पत्करिला आहे, व आपल्या विचार समुद्रांतील ज्या तेजस्वी रत्नांनीं सर्व राष्ट्र हलवून सोडलें आहे तेवढ्याच पुरत्या व त्यांच्या स्वराज्याच्या गर्जने पुरत्या या बाई आमच्या प्रांतिक सरकारास मोठ्या विघ्नकारक वाटल्या आणि ही विघ्नांची आपदा टाळण्यासाठीं ह्मणून हें डिफेन्स ॲक्टाचें सुदर्शनचक्र आमच्या स्थानिक सरकारनें पुढें केलें आहे. पण एक संकल्पित गोष्ट पुरी करतांना किती दुसऱ्या अनुचित व हानीकारक गोष्टी घडत आहेत याचा नीटसा विचार झालेला नाहीं असें दिसतें. सर बेंजामिन यांचे राजकीय विचार कितीही प्रतिकूल असोत, पण ते धार्मिक व्याख्यानांना अशी बंदी आणतील असें आह्मास बिलकुल वाटत नाहीं. पण या नव्या अस्त्राचा विपरीत परिणाम मात्र लोकांस भोगावा लागला. जे कायद्याचा दारूगोळा वापरतात त्यांनीं अनिष्ट परिणामाकडे अगोदर दृष्टी पोंचवावयाला पाहिजे होती आणि अतिरेक न होईल अशी अगोदर योजना व्हावयाला पाहिजे होती. अजूनही सरकार ही चूक जितकी लौकर दुरुस्त करतील तितकें या कायद्याच्या धूमकेतूच्या पापाचें क्षालन लोकदृष्टीनें चांगलें होईल असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

---

## ब्रह्मराक्षस.

'भीत्या पाठीं ब्रह्म राक्षस' त्या प्रमाणें राजश्री वाडिया व नरसोपंत केळकर हे आमच्या स्थानिकसरकारला ब्रह्मराक्षसाप्रमाणेंच दिसले असतील. पहिले गृहस्थ हे विदुषींच्या सही करणार यक्षराय होत. आणि दर्शविण्यांत येते कीं तुमची यांचे कमांडर १०-११-१६ रोजीं मिळाली. जाहिरसभांमधून समजला नोटीसीमध्यें भाड्याचे पैसे स्वराज्याचें केली तर मी तुह्मास २८-१०- गाऊन भाडे चुकते करून दिलें आहे व नव्या भाडेचिठीही रद्द असून ह्या ऐवजीं तल्लीन तुह्मास नविन भाडेचिठ्ठी करून देण्याबद्दल स्टांप आणून लिहिण्यास सुरवात केली

आपल्या अंतकरणांत अडखळून पडलेल्या सर्व राजकीय गोष्टी हे वक्ते जणु काय आपल्या शब्दद्वारां बाहेरच काढीत आहेत. विदुषी विझांटबाई येऊन जें महत्कार्य लोकांच्या पदरीं पडले असतें त्याच्या शतपटीनें आतां लोकांमध्यें नवी जागृती उत्पन्न झाली आहे. व नव्या जीवन रसाची प्रतिभा लोकांच्या अंतःकरणांत खेळूं लागली आहे.

वाईटापासून हीं पुष्कळदां चांगलें निर्माण होतें असें ह्मणत असतात, त्याचा अनुभव आमच्या स्थानिक सरकारच्या अपकारापासून आह्माला लाभला आहे. रा. श्री वाडिया यांनीं होमरूलवर जें पहिलें व्याख्यान दिलें तें आंकड्यांच्या पुराव्यासुद्धां इतकें परिपूर्ण होतें कीं त्यावेळीं खुद्द सर बेंजामिन साहेब हजर असते तर त्यांनाही आपल्या ब्रिटिश राज्याच्या वैभवाखालीं राष्ट्रीय दारिद्र्याचा व तसेंच उन्नतीला प्रतिरोध करणाऱ्या गोष्टींचा केवढा अंधःकार वाढत चालला आहे याची जाणीव त्यांस पूर्णपणें झाली असती. आणि स्वराज्याची कास जी लोकांनीं धरली आहे तीच लोकांची खरी अन्नपूर्णा देवी होय अशी ही त्यांची खात्री झाली असती असा आह्मास भरंवसा वाटतो. राजश्री नरसोपंत केळकर यांनीं ही स्वराज्याचे विचार मोठ्या उत्कृष्ट प्रकारानें मराठींत लोकांस समजाऊन दिले आणि हल्लींच्या सुराज्यापेक्षां स्वराज्यानें ब्रिटिश साम्राज्याची सुकीर्ती कशी जगभर पसरत जाईल याचाही अनुवाद त्यांच्या संभाषणांत चांगल्या प्रकारें झाला. आणि तें भ[illegible] असल्यामुळें लोकांच्या अंतःकरणांत त्यांचा उपदेश तत्काळ विकास पावला. तेव्हां इतक्या सुंदर परिणामाबद्दल आह्मी सरकारचे खरोखर आभार मानतों.

## देशी भाषा.

या प्रांतिक परिषदेच्या वेळीं जी मुख्य [गो]ष्ट सर्वांच्या लक्षांत आली ती ही कीं [लो]कांची खरी जागृती करण्याला इंग्रजी [भा]षेचें द्वार तितकें उपयोगी पडत नाहीं [इंग्र]जी भाषेमध्यें जें कांहीं दुग्धामृत आहे [त्या]चा राष्ट्राच्या विचारपरिपुष्टीकडे फार [थो]डका उपयोग होतो. इंग्रजी शिकलेल्या [लो]कांस मातृभाषेपेक्षां इंग्रजीचें स्वारस्य अधिक [वा]टतें. आणि ज्ञानार्जनाच्या दृष्टीनें तें [ब]रेंही आहे; पण त्या ज्ञानाचा सद्व्यय [कर]ण्याला मातृभाषा जितकी उपकारक आहे [ति]तका इंग्रजी भाषा गुणवाहक नाहीं. या [प्रां]तिक परिषदेंत श्रोतसमूहानें मोठ्या [आ]ग्रहानें निरनिराळ्या वक्त्यांस देशी भाषा[ं]त बोलण्याचा आग्रह केला. आणि होतां [हो]ईल तों पर्यंत देशी भाषांतूनच पुष्कळशीं भाषणें झालीं. खुद्द प्रेसिडेंट डॉक्टर [गौ]रीसिंग गौर यांनीं जेव्हां प्रांतिक परिष[दे]च्या कार्यासाठीं [illegible] धृव [illegible]ताजळी [स्था]पित करण्याचा [illegible] मोठ्या कळकळीनें उपदेश [के]ला, तेव्हां [illegible]नीं त्यांच्य त्या हिंदी [भाष]णाचा अं[illegible]ार मोठ्या उल्हासानें व [जय]घोषानें [illegible]ला. मराठी भाषेहूनही हिंदी [भाष]ा अग[illegible] सार्वत्रिक आहे. तेव्हां जेथें [म]राठी [भाष]ा जुळण्यासारखी नसेल तेथें [हिं]दींत [सा]री अनुवाद व्हावा असें लोकमत [घड]ण्यास अगदीं मोठ्या नेटानें कळ[त] होते. याचा अर्थ इंग्रजी भाषावर [ब]हिष्कारासारखा होत नाहीं. कारण ज्ञानाचें द्वार या दृष्टीनें ती भाषा पावन करणारी आहे, पण जेव्हां जेव्हां सभामधून व्याख्यानांचे प्रसंग येतील, तेव्हां तेव्हां देशी भाषांचा प्रचार वाढला पाहिजे. किंबहुना त्यांचेंच साम्राज्य झालें पाहिजे असें गेल्या परिषदेंत पूर्णपणें सिद्ध झालें आहे. तेव्हां या पुढील जाहीरसभांमधून जर देशी भाषाचा उपयोग होण्यास चुकेल तर लोकमत यापुढें देशी भाषेचा हट्ट धरून बसतील; व तें आपला अधिकार पूर्णपणें गाजवूं लागतील तर त्यामध्यें आह्मा प्रमाणें पुष्कळांस कांहींच आश्चर्य वाटणार नाहीं.

---

## पहिला विजय.

### (राजनिष्ठेचा खरा दृष्टीकोन.)

मुंबई हायकोर्टापुढें राजश्री टिळक यांनीं स्वतःकडून घेतलेला २० हजाराचा जातमुचलका व २० हजाराचे जामीन हीं रद्द करण्यासंबंधानें अपील केलें होतें. पुण्याच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटानीं त्यांची बेळगांव व नगर येथील व्याख्यानें राजद्रोहात्मक धरून त्यांच्या मुखश्रीला चाळीस हजारांचें कायद्याचें कुलूपच लावलें होतें. या ठरावावरील अपीलांत जय मिळेल अशी लोकसमूहास आशा यथातथाच होती; किंबहुना राजद्रोहासंबंधीं खटले प्रथमतः सरकारच्या मजुरातीनेंच सुरू होतात, तेव्हां सरकारतर्फेला हार क्वचित्च खावी लागते. या राजद्रोहांच्या खटल्यांत कल्पनाच फार नाचतात. तेव्हां राजश्री टिळकांच्या राजभक्तीच्या शद्बांमध्येंही राजद्रोहाची खाण शोधण्याला कल्पना तरंगच अधिक तांडव करीत असतात असा अनुभव येऊन चुकला आहे एकदां अधिकारी कल्पनेनें घेतले कीं राजश्री टिळक हे राजद्रोहाचे पुतळे आहेत, आणि आपली स्वराज्याची यात्रा पुरी करण्याचा राजश्री टिळकांचा पूर्ण निश्चय आहे. तेव्हां या राजद्रोहाच्या सापा निमित्त त्यांना एवढा देहदंड सोसावा लागला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण मुंबई हायकोर्टाचें वातावरण पुनः शुद्ध' पवित्र व आशामय त्याच्या पूर्व परंपरे प्रमाणें कायम आहे याची साक्ष या अपिलांत पटली. आणि नामदार चीफ जस्टिस सर बेसिल स्कॉट यांनीं आपल्या जोमदार व प्रांजळ विचार पद्धतीनें राजश्री टिळक यांस राजद्रोहाच्या पापापासून मुक्त केलें आहे हा राजद्रोहाच्या खटल्यांतील प्रथम विजय होय. आणि शांत अंतःकरणानें जर राजश्री टिळक यांच्या हृदयाचा गाभा अधिक शोधून पहाण्यांत येईल तर खऱ्या राजनिष्ठेचें उज्वल स्वरूप सरकारच्या दृष्टीस पडेल असें आह्मी निश्चयानें सांगतों. मोठ्या आनंदाचा व आश्चर्याचा हा नवा दृष्टीकोन असाच विजयी होत जावो.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—हेमंत ऋतूची खरी श्री सर्व सृष्टीला शोभायमान करूं लागली आहे. आ[illegible]जी वार्षिक पिकांची समृद्धी लहान मोठ्या प्रमा[illegible]णावर डोळ्यांना संतोषवीत आहे. गेल्या [illegible]ा ५ दिवसांतच गुलाबी थंडी क्रमाक्रमानें अधि[illegible]क उत्तेजक व प्रोत्साहक अशी होत असून [illegible] आरोग्य संपदा लुटण्याची संधी लोकांपुढें [illegible] चांगली येत चालली आहे. हा नवा ऋतू ठिक ठिकाणचा प्लेग बहुशः लयास नेईल अशीं [illegible] लक्षण दिसतात.

रा. रा. [वि]नायक मोरेश्वर खरे आक्टिंग डिस्ट्रिक्ट जज्ज छिंदवाडा यांस उमरावती येथें आडि. डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज नेमण्यांत आलें.

आणि रा. रा. एफ. जे. उडवर्ड यांस वाशीम येथें सब डिव्हीजनल मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें.

लेफ्टनंट कर्नल मॉरिस डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज पूर्व वऱ्हाड हे आजरोजीं आपल्या कामाचा चार्ज रा. रा. बारसाहेब यांस देतील आणि पुढें ते जबलपूर डिव्हीजनल जज्याच्या जागीं रुजू होण्यास रवाना होतील. राजश्री मॉरिस साहेब हे वऱ्हाडचे जुने प्रसिद्ध अधिकारी असून ते आपल्या न्यायाच्या कामांत बाणासारखें सरळगामी असून आपल्या बुद्धीच्या तीव्रतेनें व कार्यदक्षतेनें सर्वत्र लोकप्रिय असतात. ते मोठे बाणेदार व स्वभावानें चांगले तितकेच हट्टी आहेत. त्यांच्या सारखे न्यायदक्ष अधिकारी मध्यप्रांताला भूषणःप्राय होतील हें आह्मी आनंदानें कळवितों.

रा. रा. बारसाहेब हे पुनः वऱ्हाडांत परत आले आहेत हें पाहून लोक आनंदित होतील. त्यांचें सौजन्य, सद्गुण व न्यायप्रियता हीं लोकांच्या दिलाच्या दप्तरीं जागृतच आहेत.

**प्रांतिक कायदे कौंसिल**--आजपासून एक आठवडाभर हें नागपुरास भरणार होतें; पण ल्यांड टेनन्सी बिलाचा मसुदा लांबणीवर पडल्यामुळें सभा थोडक्याच दिवसांत आटपेल. या बैठकीची प्रश्नावली ही लोकांचे लक्ष लागण्यासारखी आहे. पण सरकारी उत्तरें मात्र सार्वजनिक इच्छेला अनुसरून येतील तरच त्या प्रश्नांचा खरा फायदा होईल.

रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर 'केसरी'चे संपादक हे कालरोजीं चांद्याहून येथें आले आणि त्यांनीं आपल्या आवडत्या 'स्वराज्य संघा' च्या विषयावर सुविचारांनीं परिप्लुत असें सभाषण केलें. निकडीच्या कार्यामुळें त्यांचा मुक्काम एकच दिवस झाला.

---


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

याच्या सेवनानें नपुंसकत्व. स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भाशय मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व भडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाला, सकाळीच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें अ[illegible] याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, शास्त्रोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सा० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

ना० नं० २०


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके [illegible] वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमां[illegible]सिद्ध केलें.

Regd-No-N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख २० माहे नोव्हेंबर सन १९१६ ई० [ अंक ४५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ } Lyon Scott एजंट
नो. नं १

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ॥।, १, १॥, रु प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३४९

## खात्रीचा तयार केलेला.

ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६
नो० नं०

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥. २, ३. ४. अंगठी किं. रु. १, १॥, सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥ बांगड्या जोडीची किं. रु. १॥, २ २॥ कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः—**मगनलाल के. आणि कंपनी**
गिरगांव मुंबई.

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेंस वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांच विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सार्थी व वाघऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तार्टे, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर ए.क रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८५ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पौंड, बादाम मुरव्वा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ३९४

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमीटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ३६९

## जाहीर नोटीस

नोटीस घेणारे शामी राजार ... लुद दावलसिंग जोहरी रा. शहर नवाब... आकोला

यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुमची नोटीस ता० १०-११-१६ रोजीं मिळाली. लिहीला मजकूर समजला नोटीसीमध्यें भाड्याचे पैशाची मागणी केली तर मी तुह्मास २८-१०-१६ पर्यंत भाडे चुकते करून दिलें आहे व मागील भाडेचिठीही रद्द असून ह्या ऐवजीं मी तुह्मास नवीन भाडेचिठ्ठी करून देण्याकरतां स्टांप आणून लिहिण्यास सुरवात केली

व त्या भाडेचिठ्ठीमध्यें तुह्मी मला १२ महिन्याचे पैसे आगाउ मागीत असतां ते देणें मला ना कबुल असल्या कारणानें भाडेचिठ्ठी रहित केली गेली. तर आगाउ पैसे न घेतां वरील तारखे पासून प्रत्येक महिन्यास पैसे मी देण्यास तयार आहो. व मकान खाली करण्यासंबंधानें मी राहते मकानांत अडचण होत असल्या कारणानें तुमच्या सल्यानी नवीन मकान बांधलें आहे त्या मकानास सरासरी रुपये ५१ खर्च आला असून सरासरी १॥ वर्षेही झालें आहे. तर सदर्हू मकानास लागलेला खर्च व दिड वर्षाचे व्याज असें हिशोबानीं एकंदर देऊन आमचे हातची पावती ध्यावी या प्रमाणें तुह्मी न केल्यास त्या इमल्याचे व व्याजाचे एकंदर पैसे फिटेपर्यंत मकान भाड्यानें आमचे जवळ राहील व विनाकारण कदाचीत आमचेवर दावा वगैरे कराल तर मी त्या दाव्याचा व खर्चाचा जबाबदार मुळीच नाहीं. व विनाकारण नोटिसीचें उत्तर देणें भाग पडलें त्याचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे ता. १९-११-१६

सही

बारकुदास वा॥ रामुदास गढेवाल रा. नबाबपुरा ( शहर आकोला ) ।नि० आंगठा खुद असे.

नो. नं. ४०५

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ति कार्तिक वद्य १० शके १८३८

## उमरावतीच्या प्रांतिक परिषदेचे ठराव.

ता. ५।६।७ नोवेंबर रोजीं उमरावती येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेंत पास झालेल्या ठरावापैकीं कांहीं अत्यंत महत्त्वाच्या ठरावासंबंधाचा उल्लेख आह्मी गेल्या अंकांत केला होता. आज बाकीच्या ठरावां संबंधानें दोन शब्द लिहून या प्रतिसांवत्सरिक राजकीय ज्ञानसत्राचा आह्मी निरोप घेणार आहों. राहिलेल्या ठरावांत विशेष महत्त्वाचे असे ठराव ह्मणजे ल्यांड रेव्हेन्यु व टेनन्सी बिला संबंधाचा, म्युनिसिपालिट्यांची संख्या वाढविण्याबद्दलचा, डिस्ट्रिक्ट कौंसिलाचे अधिकार वाढविण्यासंबंधाचा, ग्राम पंचायतीविषयक, निवडक जिल्ह्यांत ज्यूरी नेमण्याची पद्धत सुरू करण्याचा, वऱ्हाडांतील पटेल पटवारी वगैरे वतनदारांना एजंट नेमण्याचा व त्यांचे पगार ठरविण्याचा अधिकार देण्याचा, वऱ्हाडांत हस्तकौशल्याचें शिक्षण पसरण्यासाठीं उमरावतीच्या टेकनिकल स्कूलचा विस्तार करण्याबद्दलचा इ. होत. या सर्व ठरावासंबंधानें लोकमत काय आहे तें परिषदेच्या द्वारें सरकारच्या कानावर घालण्यांत आलें आहे आणि कायदेकौंसिलांत हा प्रश्न विचारून व ठराव आणून या संबंधाची चर्चा सतत चालू ठेवण्याचे कर्तव्यास लोकनियुक्त सभासद चुकणार नाहींत अशी आह्मांस आशा आहे. यांपैकीं कित्येक ठराव असे आहेत कीं त्यांच्या उपयुक्ततेसंबंधानें, किंवा अवश्यकतेसंबंधानें सरकारी अधिकाऱ्यांना ही प्रतिकूल जाण्यास योग्य कारण दाखवितां येणें मुष्कील आहे. उदाहरणार्थ उमरावतीच्या टेक्निकल इन्स्टिट्यूटला हस्तकौशल्याचे वर्ग जोडून त्या संस्थेची उपयुक्तता वाढविणें. या विरुद्ध सरकारी अधिकाऱ्यांना योग्य सबब द्रव्यसाधनाची प्रतिकूलता या शिवाय दुसरी कांहीं दाखवितां येईल असें आह्मांस वाटत नाहीं आज लढाईमुळें सरकारला द्रव्याची टंचाई पडली आहे ही गोष्ट आह्मांस कबूल आहे. पण या संस्थेचा विस्तार करून लोकांत उद्योगधंद्यांचा प्रसार करणें हें सरकारच्या अवश्यक कर्तव्यांपैकीं एक असल्यामुळें ही सरकारवरची जबाबदारी त्यांना सहज फेकून देतां येण्यासारखी नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांनीं पुढाकार घेऊन फंड उभारल्यास लोकांची ही मदत त्यांना मिळूं शकेल व सरकारी ग्रयांट व लोकांच्या वर्गण्या यांनीं हें कार्य सहज होऊं शकेल. ग्रामपंचायतीची स्थापना ह्या विषयाचा विचार संयुक्तप्रांत व मद्रास सरकार करीत आहे आणि ह्मैसूर, बडोदें, व देवास यासारख्या देशी संस्थानांतून या संबंधानें अनुभव ही घेण्यांत येऊन ते बहुतांशीं यशस्वी ठरले आहेत. तेव्हां आमच्या प्रांतांतल्या सरकारनेंच या विषयासंबंधानें मागें कां राहावें तें आह्मांस कळत नाहीं. ग्रामपंचायतींचा दिवाणी कज्जांच्या व किरकोळ फौजदारी खटल्यांचा निकाल करण्याचे कामीं सरकारला पुष्कळ उपयोग करून घेतां येईल; व त्यापासून लोकांना न्याय थोड्या खर्चांत मिळून स्वराज्य चालविण्याचें शिक्षणही त्यांना अनायासें प्राप्त होईल. येवढा लाभ सरकारानें प्रजेला घडू देण्यांत सरकारचें कोणतें नुकसान होण्यासारखें आहे तें आह्मांस कळत नाहीं. निवडक जिल्ह्यांना ज्यूरीचे अधिकार देण्यासंबंधाची सूचना ही अशीच आहे सरकारानें प्रथम प्रयोगाखातर कांहीं निवडक जिल्ह्यांनाच हा अधिकार द्यावा असें प्रांतिक परिषदेचें मागणें आहे, आणि ही मागणी बेतालपणाची आहे असा आक्षेप सरकारी अधिकाऱ्यांना घेतां येईल असें आह्मांस वाटत नाहीं. उमरावती, आकोला, बुल्ढाणा, यवतमाळ वगैरे ठिकाणीं ज्यांना आपणावरची जबाबदारी योग्य प्रकारें कळत आहे असे ज्यूरर मिळण्यास सरकारला मुळींच अडचण पडणार नाहीं. अशा ठिकाणीं सरकारनें ज्यूरीची पद्धत सुरू करण्यास कोणती हरकत आहे? राज्यपद्धतींत किंवा न्याय पद्धतींत कोणती ही नवी सुधारणा प्रविष्ट करण्यासंबंधानें सावधानता ठेवणें हें वाईट नाहीं. पण वरच्या सारख्या बाबतींत कांहीं न करतां स्तब्ध बसणें हा सावधानतेचा अतिरेक आहे आणि प्रागतिक ह्मणविणाऱ्या सरकारला तो न शोभणारा आहे. राज्य कारभारांत प्रगति होण्याचे मार्गांत हा अतिरेक विघ्न करणारा आहे. लोकांच्या महत्त्वाकांक्षेला व उत्साहाला दाबून टाकणारा आहे. जंगल खात्याचे कित्येक नियम लोकांना अत्यंत जाचक होतात व त्यांच्यांत दुरुस्ती होण्याची फार अवश्यकता आहे या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं सरकारी प्रतिनिधि व लोकांच्या तर्फेचे पंच यांची एक मिश्र कमिटी नेमावी अशी प्रांतिक परिषदेची सूचना आहे ही सूचना कोणच्या आधारावर सरकारला अग्राह्य ह्मणतां येईल? सरकाराशीं सहकारित्व ठेवून लोकांच्या अडचणींचा विचार करण्यास लोकनायक आपण होऊन पुढें येत असतां सरकारी अधिकारी जर त्यांना दूर लोटून देऊं लागले तर तें त्यांचें करणें कधीं कोणी रास्त ह्मणेल काय? एखाद्या कार्यासाठीं फंड उभारण्यापुरती तेवढी लोकांची सहकारिता सरकारला पाहिजे आहे, पण लोकांचीं दुःखें निवारण्याच्या कामीं मात्र नको, असा यावरून अडाणी लोकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. पण असा ग्रह होऊं देणें फार अनिष्ट व अपायकारक आहे व सरकार अशी चूक आपले हातून घडूं देईल असें आह्मांस वाटत नाहीं. मिश्र कमिटी न नेमण्यास सरकारी अधिकाऱ्यांजवळ कांहीं सयुक्तिक कारणें असलीं तरी तीं अडाणी लोकांना पटावयाचीं नाहींत. या लोकांचें समाधान आपणांस विचारून सरकार सगळ्या गोष्टी करतें अशी खात्री पटल्यावांचून कधीं व्हावयाचें नाहीं. या साठीं प्रजेच्या समाधानाकरितां सरकारनें एरएक गोष्टीचा विचार करतांना मिश्र कमिट्या नेमण्याचें धोरण ठेविलें पाहिजे. प्रांतिक परिषदेच्या या सूचनेचा जंगलापुरता तरी सरकार अवश्य विचार करील अशी आह्मांस उमेद आहे. ल्यांड रेव्हेन्यु बिलासंबंधाच्या ठरावांत कायम धाऱ्याच्या पद्धतीचा फायदेशीरपणा सरकारनें कबूल करावा अशा अर्थाचें जें वाक्य आहे तें आमच्या मतें बरेंच वादग्रस्त आहे. बंगाल्यांतला जमीनदार वर्ग या पद्धतीनें श्रीमंत झाला आहे, पण कुळांच्या मागचें दैन्य त्यानें फिटलें नाहीं. जमीनदारी पद्धति इकडे नसल्यामुळें हें कारण इकडे दाखवितां येणार नाहीं, तथापि दुसरीं अनेक कारणें या पद्धतीच्या विरुद्ध पुढें आणतां येण्यासारखीं आहेत. त्यांत सरकारचा वाढता खर्च हें प्रमुख आहे आणि त्याला समाधानकारक उत्तर जोंपर्यंत देतां येत नाहीं, तोंपर्यंत बंदोबस्ताची मुदत वाढविण्याची मागणी करणें हाच आमच्या मतें शहाणपणाचा मार्ग आहे. नव्या बंदोबस्ताचे वेळीं साऱ्याची वाढ शेतकीची सुधारणा, दळणवळणाच्या सोयी इ. कारणांमुळें शेतकऱ्यांचें उत्पन्न जें वाढलें असेल त्या वाढीच्या मानानें ठेवणें योग्य आहे. तिचें प्रमाण अमुकच असें ठरविणें अंमळ कठीण आहे, तथापि साऱ्याच्या वाढीला ज्यास्तींत ज्यास्तीची कांहीं मर्यादा न घातली तर शेतकरी नागविला जाण्याचा संभव असल्यामुळें शें. २५ टक्के ही परिषदेनें सुचविलेली वाढ गैरवाजवी ह्मणतां येणार नाहीं.

या प्रमाणें प्रांतिक परिषदेच्या ठरावापैकीं कांहीं महत्त्वाच्या ठरावासंबंधानें आह्मांला योग्य दिसलें तें आह्मीं लिहिलें आहे. सरकारी अधिकारी त्याचा योग्य विचार करेत

---

## रा. टिळक राजनिष्ठ ठरले!

पुणें येथील डिस्ट्रीक्ट माजीस्त्रेट मि. हॅच यांनीं क्रि. प्रो. क. १०८ प्रमाणें रा. टिळकाकडून बेळगांव व नगर येथें होमरूलवर व्याख्यानें देऊन राजद्रोहाचा फैलाव केला. याबद्दल २०००० चा मुचलका व १०००० रुपयाच्या दोन जामिनक्या घेतल्या होत्या. त्या विरुद्ध रा. टिळकांनीं मुंबई हायकोर्टांत अपील केले होते. तें अपील ना. जास्टिस बॅचलर व ना. जास्टिस शहा यांचे पुढें निवून त्यांनीं डिस्ट्रीक्ट माजिस्त्रेट साहेबांचा हुकूम रद्द करून रा. टिळकास निर्दोषी ठरविलें. हायकोर्टाचा हा ठराव ऐकून हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्यास आनंदच वाटेल. व व आनंदाचे भरांत रा. टिळकांचे व ना. बॅचलर व ना. शहा यांचें अभिनंदन केल्या शिवाय राहवणार नाहीं. ब्रिटिश न्यायदेवतेचे अती उज्वल स्वरूप हाय कोर्टांतच पहावयास सांपडते व हिंदी प्रजाजनांचा हाय कोर्टावरील विश्वास अशा तऱ्हेच्या निकालानें जास्त दृढ होतो असें कोण ह्मणणार नाहीं? या अपीलाचे निकालांत ना. बॅचलर यांनीं जी निर्भीड टिका केली आहे त्याबद्दल त्यांचे बुद्धीचे समतोलपणाबद्दल तारीफ करावी तितकी थोडीच होणार आहे

कोणताहि मनुष्य गुन्हेगार आहे किंवा नाहीं हें ठरविण्या करितां त्याचा हेतु काय होता याकडे लक्ष द्यावें लागतें व तो हेतु ठरविण्याकरितां सबंध व्याख्यानाकडे, सबंध भाषणाकडे लक्ष्य दिलें पाहिजे. नुसते या ठिकाणीं एक शद्ब त्या ठिकाणीं एक तुटकें वाक्य असें घेऊन चालावयाचें नाहीं असें जें त्यांनीं सांगितलें आहे त्याकडे माजिस्त्रेट लोकांनीं अवश्य लक्ष द्यावें. या निकालांत अतिशय एक महत्वाचा मुद्दा बाहेर पडला आहे तो ह्मणजे dis affection या शद्बाच्या अर्थाबद्दलचा होय. जस्टीस स्ट्रॅची यांनीं या शद्बाची ओढाताण करून disaffection चा अर्थ Want of affection असा केला होता तो अर्थ चुकीचा आहे. तो अर्थ इंग्रजी भाषेमध्यें dis हा प्रिफीक्स लावून शद्बाचा जो अर्थ नेहमी करण्यांत येतो त्या अर्थाचे विरूद्ध आहे असें ना. बॅचलर यांनीं सांगितलें आहे! अशा तऱ्हेनें अर्थ करणें ह्मणजे इंग्रजी भाषेचा खून करणें होय असा त्यांचा ह्मणण्याचा उद्देश आहे! ना. बॅचलर साहेबांनीं ना. बॅटी यांचे प्रमाणेंच या शद्बाचा अर्थ करून हिंदुस्थानचे लोकांवर उपकार केले आहेत; परंतु याच शद्बाचे ओढाताणीमुळें न. स्ट्रॅची यांच्या घोडचुकीमुळें रा. टिळकास दोन वेळां शिक्षा झाली ती ते निर्दोषी असतांना झाली असेंच ह्मणावयाचें कीं काय?

लोकसत्तात्मक स्वराज्याची किंवा होमरूलची मागणी कायदेशीर आहे व हीच मागणी रा० टिळकांनीं केली आहे असा स्पष्ट अभिप्राय न्यायमुर्तिनीं

दिली आहे. आपल्या जजमेंट मध्यें तुटक तुटक वाक्यें दाखवून रा. टिळकांचें हेतु विषयीं जो विपर्यास डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट साहेबांनीं केला होता त्याला झणझणीत उत्तर ना. बॅचलर साहेबांनीं त्याच भाषणा मधून राजनिष्ठा परिपूर्ण असे उतारे दाखवून दिलें आहे. ह्या उताऱ्यावरून टिळकांच्या भाषणामध्यें बेकायदेशीर असें मुळींच कांहीं नाहीं इतकेंच नव्हे तर ज्या सुधारणा त्यांना घडवून आणण्याची इच्छा आहे त्या कायदेशीर व सनदशीर पद्धतीनेंच घडवून आणण्याबद्दल त्यांनीं आपल्या श्रोत्यांस सांगितलें आहे असें न्यायमूर्तींनीं आपलें स्पष्ट मत दिलें आहे. स्वराज्याचे निरनिराळे अर्थ होतात व निरनिराळ्या अर्थाप्रमाणें स्वराज्याची मागणी रास्त आहे किंवा नाहीं यावर न्यायमूर्तींनीं मत देण्याचें नाकारलें ही गोष्ट आमचे मतें बरोबर झाली नाहीं. त्यांनीं स्वराज्याचा अर्थ अमुक तऱ्हेचा असला तरच स्वराज्याची मागणी कायदेशीर आहे असें निर्भीडपणानें सांगावयास पाहिजे होतें. ह्मणजे मॅजिस्ट्रेटांच्या लहरी प्रमाणें स्वराज्य शब्दाचें अर्थाचा विपर्यास करण्यांत येतो तो तरी केला जाणार नाहीं व लेखकानें किंवा वक्त्यानें स्वराज्य याचा अर्थ अमूक आहे व त्याच अर्थानें तो शब्द मी वापरीत आहे असें सांगितलें ह्मणजे झालें. तो शब्द वापरण्याची भीती अशा तऱ्हेनें मुळींच राहणार नाहीं. एकंदरींत पाहतां ना. शहा यांचे पेक्षां ना. बॅचलर यांचें जजमेंट ज्यास्त निर्भिड व स्पष्टवक्तेपणाचें आहे. ना. शहा यांचें जजमेंट गावठी भाषेमध्यें सांगावयाचें ह्मणजे अगदीं "पिळपिळीत" आहे. असेंच जजमेंट जर लिहावयाचें होतें तर निराळ्या जजमेंटची काय जरूरी होती हेंच आह्माला समजत नाहीं. राजद्रोहाचे खटल्यास सन १८९७ सालापासून सुरुवात झाल्यापासून आरोपी सुटल्याचा हा पहिलाच प्रसंग होय ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. स्वराज्याचे मागणीचा, होमरूलचे मागणीचा हा मोठाच विजय आहे. रा. टिळकांची राजनिष्ठा आतां अगदीं ताऊन सुलाखून निघाली आहे. याउपर तरी त्यांचे हेतूविषयीं सरकारी अधिकाऱ्यांस संशय न येवो ह्मणजे झालें.

---

## चमत्कारिक गोष्ट.

सध्या घनघोर युद्ध चालू असतां १९१५ सालीं लंडन शहरांत आजपर्यंत कधीं न घडलेली अशी एक विचित्र गोष्ट घडून आली. त्या सालीं ९८३१४९ लग्नें नोंदण्यांत आलीं. १९१४ सालीं लग्ननोंदीची संख्या ४॥। लग्न झाली होती, आणि १९१३ सालीं तर ही संख्या अर्धालक्ष ही नव्हती. इकडे लग्नांची संख्या इतकी वाढली, आणि तिकडे जन्मसंख्येंत १९१५ सालीं शें. २-३६ यामानानें प्रमाण उतरलें ! याचा मेळ कसा बसवावयाचा हें पुष्कळ डाक्तरांना गूढ पडलें आहे. लंडनचे मेडिकल ऑफिसर डॉ० हेलर हे असें ह्मणतात कीं जन्मसंख्येचे प्रमाण आज ४० वर्षें इंग्लंडांत कमीच आहे, व अलीकडे लंडनचें आरोग्य ही बिघडलें आहे. तिसरें कारण, महागाई असल्यामुळें लोकांचें रोजचें वेतन लढाईमुळें जरी वाढलें आहे तरी तें त्यांच्या खर्चाला पुरत नाहीं. युनिव्हर्सिटीचें शिक्षण मिळालेल्या एका बाईचा पती लढाईवर गेल्यामुळें तिची कमाई कमी झाल्यामुळें ती नोकरी पहूं लागली. तिला आठवड्याचा ३९ शिलिंग पगार देऊं केला तरी ती कामावर जाईना. कारण कीं मग घर संभाळण्याला जी बाई नोकर ठेवावी लागेल तिला त्यांतले २९ शिलिंग द्यावे लागणार ! नोकर इतके महाग झाले आहेत! व धान्याचे भावही दुपटीचे जवळ जवळ गेले आहेत. यामुळें लग्नांची संख्या जरी वाढली तरी नवीन प्रजेच्या उत्पत्तीबरोबर येऊन पडणारी जबाबदारी पतकरण्यास फारसे कोणी धजत नहींत यामुळें जन्मसंख्या कमी ती कमीच राहिली आहे. मुलांच्या पोषणाच्या जबाबदारीची ही कल्पना हिंदुस्थानांतल्या भिकाऱ्यांना येईल तर किती बरें होईल !

---

## शिक्षणविषयक मिशनरी.

इंग्लंडांतले सुप्रसिद्ध मुत्सद्दी लॉर्ड हॉलडेन यांचे सारखी जर्मनीची खडानुखडा माहिती दुसऱ्या कोणाला ही नाहीं. त्यांनीं परवा आपल्या एका भाषणांत यापुढें आपलें राहिलेलें आयुष्य शिक्षण विषयक मिशनरीचें कार्य करण्यांत घालविण्याचा आपला विचार कळविला. आमच्या इकडे सरकारांतून मानपान, व पेनशन मिळाल्यावर ही एखाद्या देशी संस्थानांत नोकरी करण्याची हाव धरणाऱ्या पदवीधर पेनशनरांनीं लॉर्ड हाल्डेन यांचे ह्मणण्याचा विचार करावा. लॉर्ड हाल्डेन यांना जर्मनीच्या चांगल्या कृतीचें कौतुक वाटतें, पण त्या कौतुकानें अंध होऊन सारासारविचारशक्तीस त्यांनीं रजा दिलेली नाहीं. जर्मनींत ही एका प्रकारचा जातिभेद आहे. ह्मणजे मजूराचा मुलगा मजूरच व्हावयाचा, सावकाराचा सावकार व्हावयाचा. पण ही रीत फार वाईट आहे असें ते ह्मणाले. युद्ध संपल्यावर जर्मनी काय करील याविषयींचें या भावी शिक्षणविषयक मिशनरीचें मत ऐकण्यासारखें आहे. लॉर्ड हाल्डेन ह्मणतात— लढाई संपल्यावर १६ इंची तोफा वगैरे शब्दसुद्धां जर्मनींत ऐकूं यावयाचे नाहींत. कंटिन्युएशन स्कूल्स हा शब्द सर्वत्र ऐकूं येईल. जर्मनी आज कित्येक वर्षें कामकरी वर्गाला शिक्षण देऊन तयार करीत आला आहे. ह्मणून त्या वर्गाशीं आपणाला बरोबरी करतां आली नाहीं पण असें किती दिवस चालूं द्यावयाचें? कामकरी वर्ग मोठा, अर्थात् त्याच्या शिक्षणाला पैसाही पुष्कळ लागणार. पण हा खर्च अवश्य ह्मणून केला पाहिजे. अंगाबाहेर टाकून चालणार नाहीं. युद्ध संपल्याबरोबर हा शिक्षणाचा प्रश्न इंग्लंडनें हातीं घेतला पाहिजे.' हिंदुस्थानांतल्य कामकरी वर्गाची दुर्दशा याहून ही वाईट आहे त्याना सक्तीचें शिक्षण पाहिजे असें संयुक्त प्रांताच्या विद्याखात्याच्या डायरेक्टरांनीं ही औद्योगिक कामिशनपुढें कबूल केलें. पण इकडे ना गोखले यांच्या सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणाच्या बिलावरच्या चर्चेच्या वेळीं पैशाची अडचण ही एक सबब सरकारनें पुढें केलीच होती. लॉर्ड हाल्डेन सारखे शिक्षणविषयक मिशनरी निघाल्याशिवाय या प्रश्नासंबंधानें जागृति होणार नहीं.

---

## अर्भकांचे मृत्यु.

आपल्या देशांत अर्भकांच्या मृत्यूंचें प्रमाण भयंकर आहे व त्याबद्दलचे कांहीं उपाय लवकर केले पाहिजेत ही गोष्ट अनेकवेळां आह्मी सरकारचे व वाचकांचे नजरेस आणिली आहे. शिकलेल्या सुईणी, व आरोग्यविषयक ज्ञानाचा देशी भाषेंतल्या पुस्तकांच्या द्वारें प्रसार हे दोन मुख्य उपाय आज करतां घेण्यासारखे आहेत. या संबंधांत इंग्लंडांतलें लोकल गव्हर्नमेंट बोर्ड काय करीत आहे तें पाहण्यासारखें आहे. युद्धामुळें इतर सर्व बाबतींत काटकसर करावी लागली तरी या आरोग्याचे बाबतींत खर्चांत काटकसर करणें हानिकारक आहे ही गोष्ट सर्क्युलराचे द्वारें त्यांनीं अधिकाऱ्यांना बजाविली आहे. ज्या गरीब लोकांना प्रसूतीच्या काळीं फी देऊन शिकलेली सुईण आणण्याची ऐपत नसेल त्यांना बोर्डाच्या खर्चानें ती देण्याची तजवीज करण्यांत आली आहे. प्रत्येक तालुक्याच्या व जिल्ह्याचे ठिकाणीं आरोग्यविषयक कमिटी नेमून तिच्याकडे त्यांच्या भागापुरती आरोग्याची पाहणी करण्याचें, औषधपाणी पुरविण्याचें व लोकांना आरोग्यविषयक शिक्षण देण्याचें काम सोंपविण्यांत आलें आहे या कमिट्यांतून सरकारी अधिकाऱ्यांबरोबर खाजगी धंदेवाले डाक्तर व इतर लोकमान्य गृहस्थ ही आहेत व सर्वांच्या सल्यानें व सहकारित्वानें बोर्डाचें काम चांगलें चाललें आहे. अशा उपायांनीं इंग्लंडांतल्या अर्भकांच्या मृत्यूंचें प्रमाण उतरवीत उतरवीत बरेंच आटोक्यांत आणितां आलें आहे. हिंदुस्थानांत या दिशेनें प्रयत्नच अद्याप कोणी केला नाहीं. आरोग्य खात्याचीं सर्व सूत्रें सरकारनेंच आपल्या हातीं ठेविलीं आहेत. जणूं काय लोकांच्या पुढाऱ्यांना लोकांच्या आरोग्याशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं ! म्युनिसिपालिटींत त्यांनीं मत द्यावें पण आरोग्य कमिट्या स्थापून त्यांच्या सल्यानें वागणें हें अब्रह्मण्यम् समजण्यांत येतें. असें कां ?

---

## ब्रिटिश न्यायदेवतेचा जयजयकार.

हिंदुस्थानांतल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून कांहीं प्रसंगीं जरी अधिकाराचा दुरुपयोग होऊन सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर टीका करणारांना त्रास सोसावा लागतो तरी अखेर ब्रिटिश न्यायदेवतेच्या दारीस तो अन्यायाचा प्रकार येतांच खरा न्याय मिळण्यास उशीर लागत नाहीं असा अनुभव हिंदुस्थानच्या लोकांना वारंवार येत असल्यामुळें ब्रिटिश न्यायदेवतेच्या ठायीं त्यांची पूर्ण श्रद्धा आहे. याचें ताजें उदाहरण ह्मटलें ह्मणजे पुण्याच्या डि. म्याजिस्ट्रेटांनीं क्रि. प्रो. को. कलम १०८ प्रमाणें रा. बाळ गंगाधर टिळक यांच्या बेळगांव, नगर वगैरे ठिकाणच्या भाषणांना राजद्रोही ठरवून त्यांच्या जवळून घेतलेली ४० हजार रुपयांची जामिनकी मुंबई हायकोर्टाचे जज न्या. मू. बॅचलर व शहा यांनीं तपासणींत रद्द करण्याचा हूकूम केला हें आहे. पुण्याच्या म्याजिस्ट्रेटांनीं रा. टिळक यांच्या भाषणांतला मधलाच कांहीं भाग वेंचून काढून त्याचें स्वरूप राजद्रोही आहे असा ग्रह करून घेतल्यावरून जामीन घेण्याचा हुकुम दिला होता. पण असें करणें गैरशिस्त आहे, मधलाच भाग वेचून न घेतां एकंदर भाषणाचा रोख राजद्रोहाकडे आहे कीं काय तें पाहिले पाहिजे असें न्या. बॅचलर यांनीं आपल्या निकालांत ह्मटलें आहे. या निकालानें वर्तमानपत्रांतल्या किंवा जाहिर सभांतल्या भाषणांतल्या टीकेवरचें एक मोठें अरिष्ट दूर केलें आहे यांत शंका नाहीं. रा. टिळक यांनीं आपल्या भाषणांत मांडलेली स्वराज्याची योजना पुष्कळांना पसंत नसेल; पण सिव्हिल सर्व्हिसच्या हातांतले अधिकार काढून ते हळूं हळूं लोकांच्या हातांत दिले पाहिजेत असें ह्मणणें ह्मणजे कांहीं राजद्रोह नाहीं हें न्यायमूर्तींच्या निकालावरून आतां स्पष्ट झालें आहे. सिव्हिल सर्व्हिसवर तुटून पडणें ह्मणजे सरकारावर तुटून पडणें (अर्थात राजद्रोह) होतो कीं काय या संबंधांत न्या. मू. नीं दिलेल्या निकालांत स्पष्ट विवेचन झालें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. परिस्थितीवर व टीकेच्या स्वरूपावर या प्रश्नाचा निकाल अवलंबून राहील असें दोघांही न्यायमूर्तींनीं ह्मटल्यामुळें हा मुद्दा मुग्ध राहिला आहे. तथापि समग्र लेख किंवा भाषण याच्या रोखावरून त्याचें स्वरूप राजद्रोही आहे कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे हा न्यायमूर्तींच्या निकालांतला मुद्दा फार महत्त्वाचा आहे आणि म्याजिस्ट्रेट हा नीट लक्षांत ठेवून वागतील, तर वर्तमानपत्राच्या संपादकांना भोगावा लागणारा पुष्कळसा त्रास कमी होईल. डिफेन्स ऑफ इंडिया आक्टाखालीं ज्यांना स्वातंत्र्याला मुकावें लागलें आहे त्यांना ब्रिटिश न्यायदेवतेपुढें आपली बाजू मांडून न्याय मागण्याची सवड कायद्यानें ठेविली असती तर त्यांच्या ही बाबतींत न्यायदेवतेनें सर्वांना समाधानकारक व निर्भयता देणारा निकाल दिला असता व मग ब्रिटिश न्यायदेवतेच्या जयजयकाराचा घोष अधिक उच्च स्वरांत झालेला ऐकण्यास मिळाला असता. पण तेथें आमचें दुर्दैव आड येत आहे.

---

## औद्योगिक कमीशन. व सामान्य सूचना.

### नं. २

(लेखक – त्र्यंबक सिताराम दिवे वकील आकोला)

मागें सांगितलेंच आहे कीं कमिशनपुढें सरकारनें उद्योग धंद्यांना कशा तऱ्हे

मदत करावी या संबंधाच्या ९ सूचना आलेल्या आहेत. त्यांत ६ वी सूचना "रेल्वेवर माल नेण्या आणण्याच्या व भाड्याच्या विशेष सवलती देणें" अशा संबंधाची आहे. रेल्वेच्या या महत्वाच्या प्रश्नाकडे सरकार लक्ष घालणार आहे हें ऐकून स्वदेशी धंद्याच्या भरभराटीची इच्छा करणाऱ्या कोणाही मनुष्याला आनंद वाटेल. आज पर्यंतचें सरकारचें धोरण या बाबतींत असावें तितकें चांगलें नाहीं असें ह्मटलें तरी चालेल व त्यामुळें स्वदेशी व्यापार धंद्यांना किती जाच व अडथळा होत आहे हें खालीं दिलेल्या माहितीवरून कळून येईल.

हल्लींचे रेल्वेवर मालाचे भाड्याचे दर पाहिले तर ते साधारणतः परक्या देशच्या मालापेक्षां स्वदेशी मालावर शेंकडा ५० या प्रमाणानें जास्त आहेत. उदाहरणार्थ आस्ट्रियांतून आलेले कांच सामान मुंबईहून आकोल्यास आणावयाचें असलें व तळेगांवाहून स्वदेशी कांच सामान तेथेंच आणावयाचें असलें तर तळेगांवच्या कांच सामानावर शेंकडा ५० या प्रमाणांत आस्ट्रियाच्या मालापेक्षां ज्यास्त भाडें पडतें. मॉरिशस बेटांतून आलेली साखर आपल्यास मुंबईहून आणावयाची असेल तर (actual weight) जितक्या वजनाची ती साखर असेल तितक्या वरच भाडें पडतें. परंतु स्वदेशी साखरेवर मात्र (Wagon load) ह्मणजे डब्याचे प्रमाणांत भाडें पडतें. हिंदुस्थांतल्या हिंदुस्थानांत पाठवावयाचा असला तर जास्त भाडें पडतें. ह्मणजे जर्मनीला गहूं पाठवावयाचा असला तर आकोल्याहून मुंबई पर्यंत त्याला जें भाडें पडेल त्याच्यापेक्षां जास्त आश्चर्य कारक ह्मणजे आकोल्याहून आपण कोणताहि देशी माल उमरावतीस पाठविला व तोच माल मुंबईहून उमरावतीस पाठविला तर आकोल्यापासून उमरावतीच्या भाड्यापेक्षां मुंबई ते उमरावतीचें भाडें कमी पडेल! सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं दिलेलें उदाहरण पाहून तर पोटभर हसूंच येईल. सोडा वाटर करण्याकरितां लागणाऱ्या कॅरबॉनिक गॅसच्या सिलेंडर्सना जर्मनीहून आकोल्यास आणण्याकरितां जितकें भाडें पडतें त्याच्यापेक्षां मुंबईंत तयार केलेल्या सिलेंडर्सना आकोल्यास आणण्यास ज्यास्त भाडें पडतें! ही भाड्या संबंधाची गोष्ट झाली व आगगाडीचे डबे स्वदेशी व्यापाऱ्यापेक्षां परक्या देशच्या व्यापाऱ्यांना माल नेण्या आणण्याकरितां लवकर दिले जातात असेंहि ह्मणतात. हें जर खरें असेल तर "गंडस्योपरि पिटिकां संवृत्ता" असेंच ह्मणावयाची पाळी येईल!

कमिशन पुढें फक्त वर सांगितल्या प्रमाणें "माल नेण्या आणण्यासंबंधानें रेल्वेनें स्वदेशी धंद्यांना किती सवलती द्याव्या" याच प्रश्नाची चर्चा होईल असें प्रिमिलरी नोटवरून दिसतें. परंतु आजपर्यंत रेल्वेनें परकी व्यापाऱ्यांना सवलती दिल्यामुळें आमच्या धंद्यास किती अडथळा झाला याची ही चर्चा झालीच पाहिजे. सरकारला या संबंधानें विचारले असतां ही गोष्ट रेल्वे बोर्डाच्या अधिकारांतली आहे असें सांगण्यांत येतें व बोर्डामध्यें तर नेटिवांना मज्जाव आहे. मग लोकांनीं या सुधारणा कशा करून घ्याव्या? जोंपर्यंत रेल्वे बोर्डामध्यें आमचा शिरकाव होत नाहीं तों पर्यंत आमचीं गाऱ्हाणीं नाहींशीं होणार तरी कशीं? करितां कमिशननें सवलती संबंधाच्या प्रश्नाला जोडूनच "रेल्वे बोर्डाच्या घटनेमध्यें फेरबदल करणें जरूर आहे काय व लोक प्रतिनिधी या बोर्डांत असावयास पाहिजे आहेत काय व असले तर त्यांचें प्रमाण किती असावें याही प्रश्नांचा विचार करावा.

आपल्या अंगावरची जबाबदारी टाळण्याकरितां रेल्वे कंपन्यांनीं B व H या नमुन्याच्या जबाबदारी टाळणाऱ्या (Risk Notes) काढल्या आहेत व त्या व्यापारी लोकांना अतीशय जाचक आहेत अशा संबंधाची ओरड आज फार दिवसांपासून चाललेली आहे. परंतु सरकारचें तिकडें लक्ष गेलेलें नाहीं. करितां या कमिशननें तरी या मुद्याकडे लक्ष द्यावें अशी सूचना आहे. रेल्वे कंपन्याच्या नौकर लोकांच्या निष्काळजीपणामुळें किंवा खोडसाळपणामुळें मालाचें जर नुकसान झालें तर त्याची सर्व जबाबदारी रेल्वेनें आपल्या अंगावर घ्यावयास नको काय? अगोदर स्वदेशी मालावर गैरमर्जी व त्यांतल्या त्यांत आणखी B व H या नमुन्यांच्या रिस्कनोटस्; यांचा परिणाम उद्योग धंद्यावर काय होत असेल याची कल्पनाच करावी ह्मणजे झालें.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या तीनचार आठवड्यांपासून जर्मनीनें समुद्रांत बरेचसे उत्पात मांडले आहेत. यावरून त्यानें कांहीं नवीन तऱ्हेच्या टॉर्पेडो बोटी तयार केल्या आहेत कीं काय अशी शंका शास्त्रज्ञांना वाटूं लागली आहे. बारीक सारीक बोटींचा नाश केल्याचीं उदाहरणें इंग्रजी पत्रांतून पुष्कळ आलीं आहेत. यांत कांहीं ब्रिटीश, कांहीं नार्वेजियन आणि कांहीं रशियन बोटींचीं नांवें आहेत. पण त्यांत विशेष उल्लेखनीय नांव ह्मणजे पी. अँड ओ. कंपनीची अरेबिया नांवाची मेल स्टीमर हिचें आहे. ही ता. २९ आक्टोबर रोजीं मुंबईहून टपाल घेऊन निघाली. हिच्यांत सर रतन टाटा व त्यांची पत्नी, डॉ. जीवराज मेहता हे मुंबईचे सुप्रसिद्ध डाक्तर, हिंदुस्थानचे टपालखात्याचे डे. डॉ. जनरल मि. हाचिनसन, वगैरे अनेक ठळक ठळक स्त्री पुरुष होते. ही भूमध्यसागरांत येतांच टॉर्पेडोनें तिचा नाश केला. सुदैवानें सगळे उतारू वांचले. फक्त बोटीवरचे दोन इंजिनियर मेले. टपालच्या पिशव्या नष्ट झाल्या. अरेबिया बोट ही फार मोठी बोट होती. हिच्यावर सातशेंहून अधिक उतारू असून हिची शक्ति ११ हजार हॉर्स पॉवर होती. ही बोट बुडल्याचें ऐकतांच प्रथम मनाला मोठा धक्का बसतो, पण गेल्या अडीच वर्षांत अशा सुमारें दोन हजार बोटींच्या खेपा सुरक्षित झाल्या असतां त्यांतल्या फक्त तीन चारच मोठाल्या बोटी बुडविण्यांत आल्या हें लक्षांत घेतलें ह्मणजे इंग्लंडची आरमारी शक्ति बोटींचें संरक्षण करण्याचे कामीं किती यशस्वी झाली आहे तें प्रत्ययास येऊन मनाला धीर येतो.

## फ्रेंच रणक्षेत्र.

या क्षेत्रांतून नित्य ब्रिटिशांचा व फ्रेंचांचा विजय होत असल्याच्या खबरा येत असलेल्या पाहून समधान वाटतें. व्हर्डुनपाशीं फ्रेंच अपले स्थानावर अढळ आहेत. वॉक्स किल्ला त्यांनीं सर केलाच आहे. ओंक्रे नदीच्या दोन्ही तीरांवर ब्रिटिशांनीं एक मैल आक्रमण करून पुष्कळ शत्रू कैद केले व बोमांट हमेल हें आजिंक्य मानलें गेलेलें ठिकाण घेतलें. सेंट पिएर डिव्हियनकडे ब्रिटिश पांच मैल पुढें सरकले व तें गांव त्यांनीं घेतलें. सारांश, या रणक्षेत्रांत ब्रिटिश व फ्रेंच यांची मजबुती इतकी आहे कीं शत्रूंचें त्यांचेपुढें कांहीं चालत नाहीं असें ह्मटलें पाहिजे.

## पूर्व रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत युद्ध स्थिति मागच्या सारखीच बहुतेक आहे. कार्पेथियन पर्वताच्या झाडींत शत्रूनें मोठाल्या तोफा लपवून ठेविल्या होत्या, व तेथून रशियनांवर जोराचा भडिमार चालला होता. पण तो निष्फळ झाला. इतर ही कांहीं ठिकाणीं शत्रूचे प्रयत्न असेच निष्फळ झाले. हा प्रकार पाहिला ह्मणजे असें दिसतें कीं शत्रु खरोखर लढत नसून केवळ रशियन सैन्याची फाटाफूट करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांना भीती वाटते ती ही कीं रशियन फौज रुमानियांत जाऊन त्याला मदत करील, त्यापेक्षां कशी तरी तिला इकडेच लढाईंत गुंतवावी. ओगनोट पर्वतांत तुर्की फौजेनें रशियन फौजेवर हल्ला करण्याचा यत्न केला, पण फसला.

रुमानियानें आल्ट नदीच्या डाव्या तीरावर शत्रूचे सगळे हल्ले परतविले. उजव्या तीरावर मात्र एके ठिकाणीं त्याला कच खावी लागली. सर्वियन लोक सेरनाजवळ बल्गार व जर्मन यांच्याशीं निकरानें लढत आहेत. त्यांनीं शत्रूला उत्तरेकडे दोन मैल हटवून त्यांचें एक ठिकाण घेतलें. सर्वियनांना फ्रेंचांकडून चांगली मदत होत आहे. शत्रूचे सुमारें एक हजार लोक कैद करण्यांत आले असून आणखी १६ तोफा ही काबीज करण्यांत आल्या आहेत. एकंदर कैद्यांची संख्या ६००० वर गेली असून ता० १२ सप्टेंबर पासून ७२ तोफा व ५० यांत्रिक तोफा घेतल्या आहेत. आतां पोलाग हें ठिकाण सर्वस्वी सर्वियनांच्या हातांत आहे.

## सालोनिका व ग्रीस यांचें वर्तमान.

सालोनिका येथील दोस्तराष्ट्रांच्या फौजा पूर्ववत सर्विया व बल्गेरिया यांत प्रवेश करण्यांत यशस्वी होत आहेत. ग्रीसची दशा तर अधिकच बिघडली आहे. ग्रीसच्या लोकांत दोनपक्ष— एक दोस्त राष्ट्रांना अनुकूळ व दुसरा तेथील राजाला अनुकूळ— आहेत हें मागें सांगितलेंच आहे. या ग्रहकलहामुळें तो देश अगदीं दुर्बळ झाला आहे. फ्रेंचांनीं त्याची हलक्या प्रतीचीं लढाऊ जहाजें सगळीं हस्तगत केलीं आहेत. माजी प्रधान व्हेनोजोलिसच्या पक्षाचे लोक मित्र राष्ट्रांना अनुकूळ आहेत. त्यांचा जमाव उस्टाना येथें होता. त्यावर राजाच्या पक्षाचे लोकांनीं हल्ला केला. या लोकांनीं ग्रीसमध्यें मोठा जुलूम मांडला आहे. मित्रराष्ट्राशीं केलेल्या तहनाम्याचा भंग हे लोक करीत आहेत. असें वेनोजेलिसच्या पक्षाचें ह्मणणें आहे, आणि ते आणखी असें ह्मणतात कीं दोस्त राष्ट्रांच्या ढिलाईचा हा परिणाम आहे.

## वायुयुद्ध.

अलीकडे वायुयुद्धाला विशेष जोर आला आहे. रूटरच्या बातमीदारानें सरकारी खलित्यावरून हवेंतल्या एका जंगी युद्धाचें वर्णन तारेनें इकडे पाठविलें आहे. हें युद्ध आरासच्या पाशीं वर हवेंत झालें. ब्रिटिशांचीं हवा— जहाजें ३० होतीं व त्यांच्यापाशीं बांब होते. जर्मनीचीं हवा— जहाजें सुमारें तीस चाळीस होतीं. ब्रिटिश वर होते. तेथून खालीं उतरून त्यांनीं जर्मन जहाजांवर हल्ला केला. खूप जंगी लढाई होऊन जर्मन जहाजांना शेवटीं हटावें लागलें. ब्रिटिश लोकांचें थोडेंसें नुकसान झालें. बांब टाकण्याचीं कांहीं यंत्रें नष्ट झालीं. जर्मनीचीं तीन यंत्रें नष्ट झाल्याची खात्री आहे. आणखी तिनांबद्दल शंका आहे. दुसऱ्या एका ब्रिटिश हवा— जहाजाच्या समुदायानें जर्मनीच्या आस्टेंड बंदरावर आक्रमण करून बांब टाकले व कांहीं कारखान्यांच्या भट्यांचा नाश करून ते परत आले. जर्मन हवा— जहाजांनीं ही उलट बेलफोर्ट बंदरावर हल्ला करून पांच सिव्हिलियनांना जखमी केलें. जर्मनांनीं पाडोव्हावर बांब टाकून एक इमारत व तींत आश्रय घेऊन राहिलेल्या बायका मुलांना मारलें.

## सरकारी बाजू.

गेल्या सोमवारच्या प्रांतिक कायदे कौंसिलांत विदुषी बिझांटबाई यांस या प्रांतांत न येण्याविषयीं मनाईचा हुकूम सोडण्यासंबंधानें सरकारची बाजू अशी मांडण्यांत आली कीं विदुषी बिझांटबाईचे राजकीय विचार व संभाषण फार उग्र व जहाल असतात. आणि या प्रस्तुतच्या लढाईच्या प्रसंगीं प्रांतिक वातावरण क्षुब्ध होऊं नये ह्मणून व प्रांतिक परिषदे पैकीं कांहीं वजनदार गृहस्थांची सूचना तशाच प्रकारची झाल्यावरून असा बहिष्काराचा हुकूम काढण्यांत आला. आणि असें ही सांगण्यांत आलें कीं धार्मिक विषयांच्या बाबतींत हात घालण्याचा सरकारचा बिलकुल विचार नाहीं. व त्या हेतूनें ही मनाई करण्यांत आलेली नाहीं.

## पुढें काय?

स्थानिक सरकारचें हें ह्मणणें पुष्कळ उदार दृष्टीचें असून यांत खरेपणाची विशेष स्पष्टोक्ती आहे. तेव्हां त्यांच्या हुकुमाचा जो विपरीत परिणाम ह्मणजे धार्मिक स्वातंत्र्यावर जी गदा पडली आहे, ती दूर करण्याकरितां व घाई घाईनें सोडलेलें आपलें अस्त्र धर्माच्या बाबीपुरतें चुकीचें आहे असें कबूल केल्यानंतर आमचें स्थानिक सरकार आपला हुकूम तत्काळ बदलील असा आह्मांस भरवंसा आहे. चुकीचें क्षालन ती दुरुस्त करण्यांतच असतें. तेव्हां लोकांच्या बाजूनें पुनः अर्ज होण्याची वाट न पाहतां तारीख २९ आक्टोबरचा मनाईचा हुकूम अद्याप बदलला नाहीं याचेंच आह्मास आश्चर्य वाटतें

## तिलांजली.

### (सरकारची फसवणूक.)

खरा मनुष्य कोण तर जो आपल्या विचाराविषयीं आत्मविश्वास ठेवतो तो होय. आणि मग तो आपला प्रामाणिकपणा राखण्यासाठीं कधीं ही माघार घेणार नाहीं. ज्या वजनदार प्रागतिक गृहस्थांस सरकारास इशारा देण्या इतकें धारिष्ठ होतें, त्यांनीं विदुषी बिझांटबाई संबंधानें प्रांतिक परिषदेनें केलेल्या ठरावाच्यावेळीं आपली विरुद्ध बाजूच नेटानें सभेपुढें मांडावयाची होती. किंवा वाणींत तितका जोर नव्हता तरी तो ठराव सर्वानुमतें पास होऊं द्यावयाचा नव्हता. आपले हात वर उभारण्याइतकी व उलट मताचें प्रदर्शन करण्यापुरती त्यांच्या गात्रांत शक्ती राहिली नव्हती असें आह्मास वाटत नाहीं. सरकाला मात्र त्यांनीं अशा लपंडावानें तोंडावर पाल्थें पाडलें, तेव्हां या वजनदार ब्रिटिश राज्याचे आधारस्तंभ मानणाऱ्या लोकांविषयीं सरकारानीं काय ती आपली पक्की गाठ बांधून घ्यावी. हे लोक जर सरकारी 'दरबारी' यादींत असतील तर त्यांचीं नांवें तिच्यांतून वगळण्याइतकीं सत्यस्फूर्ति सरकार या प्रसंगीं दाखवील तर कर्णभेद करणाऱ्या लोकांस आपली जबाबदारी नीटशी कळून येईल.

## मृगजळ.

खऱ्या नदीच्या प्रवाहाला जर कोणी मृगजळ समजून दूर जाईल तर त्याचा तोच स्वतःला फसवून घेईल. असा प्रकार आमच्या स्थानिक सरकारच्या हातून विदुषी बिझांटबाई संबंधानें घडलेला आहे. सनदशीर शिष्ट संप्रदायाच्या व राजनिष्ठेनें प्रेरित झालेल्या तत्वांवर चालविलेली ही स्वराज्याची मोहीम जर अत्यंत शुद्ध, सात्विक व वैभवशाली राहात असेल तर ती या श्रेष्ठ बाइच्या नेतृत्वाखालींच आशासंपन्न झालेली आहे. व ब्रिटिश दृष्टीचें क्षितिजही तिच्या संभाषणामुळें विस्तार पावत चाललें आहे. अशा थोर विभूतीला वातावरण क्षुब्ध करणारी मानणाऱ्या सरकारी विचारदृष्टीला काविळीचा रोगच झालेला आहे आणि या विकृत दृष्टीनें सरकार प्रजेच्या अंतःकरणाच्या स्नेहप्रवाहास मृगजलाप्रमाणें विनाकारण तुच्छ लेखीत आहे ह्मणून आह्मांला अत्यंत खेद होतो. मद्रास हायकोर्टांत अत्यंत शुद्ध ठरलेल्या राजभक्तीच्या या सन्मूर्ती बरोबर राहून राजकीय वातावरण क्षुब्ध झालें तरी तें बाह्यतः प्रसन्न व शांत दिसणाऱ्या वातावरणापेक्षां लक्षावधीपटीनें बरें असें आह्मी आग्रहपूर्वक पुनः पुन्हा ह्मणत आहों.

## वऱ्हाड वृत्त.

**हवामान**—निरभ्र स्वच्छ आकाश, वर्धमान हिंवाळ्यांतील सूर्य प्रकाशाची प्रखरता आणि रात्रीची दंवाची अमृतवृष्टी यांनीं पिकें चांगलीं जोमांत आहेत. व सार्वजनिक आरोग्यही सुखमय आहे. पण जेथें जेथें प्लेगाचा प्रादुर्भाव आहे, तेथेंही जंगलेंम मंगल करणारे लोक आबादानींत आहेत.

**ग्रामपंचाईत**—गेल्या कौन्सिलाच्या बैठकींत ग्रामपंचायत चालू करण्यासंबंधानें सर्वत्र संचार करून माहिती गोळा करण्यासाठीं एक कमीटी नेमण्याचें ठरलें आहे. यांत दोन सरकारी अधिकारी राहतील व एक बिन सरकारी सभासद राहील. या जुन्या संस्थेचें पुनरुज्जीवन होत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

नामदार रावबहादुर मुधोळकर यांचे कांहीं महत्वाचे ठराव या कौंसिलापुढें येणार होते; पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें ते दिरंगाईवर पुढील जानेवारी १५ च्या बैठकीपर्यंत तहकूब ठेविले आहेत.

**बुलढाणा सेशन**— रावबहादुर विनायक मोरेश्वर केळकर सेशन जज्य हे बुल्ढाण्यास सेशन निमित्त गेले असून ते या सत्राच्या अखेरीपर्यंत तिकडेच राहतील. येथें आल्यावर त्यांच्या आदरसत्कारार्थ एक टोलेजंग पानसुपारी होणार आहे. रावबहादुर केळकर हे त्यानंतर सार्वजनिक कार्यांत आपल्या नेहमींच्या तरतरीनें व बाणेदारपणानें तसेच पुढें येतील. अशा आमच्या या भविष्याचा खरेपणा या पानसुपारीच्या ध्वनित करीत आहेत.

खानबहादुर निजामुद्दीन आहमद शाळा इन्स्पेक्टर यांची बदली नर्मदा सर्कलला झाली आहे.

रा० रा० आनंद बाळकृष्ण पंडे ए.अ. कमिशनर यवतमहाल यांची बदली जबलपुरास झाली आहे.

## आकोला बाजार भाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें | २५॥। |
| चांदी | ७८ ते ७९ |
| जवारी | ६० ते ६२ |
| गहू काठें | ५॥ ते ६ |
| गहूं खाडवा पीवडा | ६ ते ७ |
| सरकी | १० ते १०॥ |
| कापूस | ८५ ते ९० |
| रुई आकोला जीन | १०० ते १२५ |


## जाहिरात

वऱ्हाडप्रांत, वर्धा व नेमाड जिल्ह्याचे शेतकीचें वार्षिक संमेलन व प्रदर्शन अकोला येथील सरकारी प्रयोगाचे शेतीवर शुक्रवार तारीख ८ व शनिवार तारीख ९ माहे डिसेंबर सन १९१६ इसवी रोजी भरणार आहे.

सदरहु संमेलनास हजर राहण्याची व प्रदर्शन पाहण्याची सर्वांस मोकळीक आहे. कळावें ता. १३ नवंबर सन १९१६

सही

Jainarain

E. A. C.

For Deputy Commissioner

Akola.

N. N. 406


## NOTICE.

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2951-2964, dated the 18th December 1914, is published for general information.

F. S. A. Slocock.

NAGPUR:
The 14th Novr. 1916 } *Chief Secretary to the Chief Commissioner, Central Provinces*

## RESOLUTION.

2. Every native of India who contemplates proceeding out of India to foreign countries is strongly urged before leaving to furnish himself with an authoritative certificate of identity, in the appended form, signed by the Deputy Commissioner, in the case of residents of British India, and by the Political Agent in that of residents of Native States. In the case of a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the Deputy Commissioner or Political Agent, as the case may be.

Appeals for assistance by destitute Indians who desire repatriation and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education, cannot be dealt with satisfactorily unless the parties are in a position to produce evidence of identity. The possession of a certificate of ideptity will be specially useful to young men of good family, is it may enable the Secretary of State to obtain for them social and other attentions

Those who are desirous, however, of travelling in countries where a passport will be necessary are advised to furnish themselves with such a document also before leaving India, in lieu of, or in addition to, a certificate of identity. It should be remembered that no person is entitled to a passport, as of right, on the ground that he is a British subject, and the production before authorities outside India of a certificate of identity, unless supplemented by documentary evidence of respectability, is not sufficient to ensure that a passport will be granted.

### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ____________________
2. Father's name and caste ____________________
3. Residence ____________________
4. Age of applicant ____________________
5. * Nationality of applicant ____________________
6. Social or pecuniary status of father (or guardian) ____________________
7. Date of probable departure of applicant from India ____________________
8. Object of applicant's visit to Engand (Europe) / America / Japan.

*Signature of Deputy Commissioner or Political Agent, or Head of School or College.* ‡

*Signature of applicant.*

Signed before me.

*Deputy Commissioner or Political Agent*

Dated ____________________

* i.e., Whether a British subject by birth or by naturalization (or a subject of Native State)

‡ Countersignature of the Deputy Commissioner or Political Agent should be obtained on certificates signed by Heads of Schools or Colleges.

NOTE-Holders of certificates of identity intending to apply subsequently in England or elsewhere for a passport to visit a foreign country are warned that no person is entitled to a passport as of right on the sole ground that he is a British subject. The production of a certificate of identity, therefore, will not ordinarily be sufficient to secure the grant of a passport, unless it is supplemented by documentary evidence of respectability, endorsed by a local Government or other authority competent to issue passports in India, certifying that the holder is a fit and proper person to receive a passport.

N. N. 407

## नोटीस

नोटिस बेशमी केड्या उर्फ मारुती वा मनाजी तेली राहणार निमगांव ता. मल्कापूर जिल्हा बुलडाणा

यांसः—

नोटिस देणार संपत वा मनाजी तेली यांस नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा धाकटा भाऊ असून आज पर्यंत माझ्यांत होतास. आतां थोडे दिवसांत वेगळा राहिल्यापासून तूं कुसंगतीस लागून वाईट वागूं लागला. त्यामुळें तूं कर्जदारी काढु लागला आहेस. तरी या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं तूं माझे इस्टेटीवर कोणाचे कर्ज काढशील अगर गहाण खरेदी पत्यानें देशील शेत साऱ्यानें देशील, तर वरील कारणामुळें तुझा मुळींच इस्टेटीवर हक्क नाहीं. आणि कोणी तुझ्याजवळून जंनम माल स्थवर माल लिहून घेईल अगर पत्यानीं गहाण खरेदी करून घेइल तर त्याचा जबाबदार मी व माझी ही इस्टेट नाहीं. याचा जबाबदार स्वतः तुच आहेस

सही

संपत वा मनाजी तेली राहणार निमगांव दस्तुर खुद

नो० नं० ४०१

---

## नोटीस

नोटिस बेशमी वायलजी वा रामजी कडु जात कुणबी उमरीकर हल्लीं रा० मौजे चेंडकापूर ता. आकोट

यांसः—

नोटिस देणार जनी मर्द वायलजी कडु जात कुणबी हल्लीं रा. बार्शीटाकळी ता. आकोला

इजकडूनः—

नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहांत. लग्न झाल्यापासुन मला तुमचे बापानीं मी अज्ञान असतांना एक वेळ नेले होते. आणि सज्ञान झाल्यावर तुह्मी मला नेण्याकरितां आले. तेव्हां तुमचे बरोबर आणखी तीन इसम होते. त्यांनीं व तुह्मी माझे आईबापास एक करारनामा लिहून दिला व मला घेऊन गेले. इतक्या आवधींत तुह्मी मला फार विनाकारण मारहाण करून एके दिवशीं उमरी येथील पंच जमा केले. त्या पंचासमक्ष फारकती देण्याचे कबूल केले होते. त्या गोष्टीस आज अडीच वर्षे झालीं. मी आपले बहीणी जवळ येऊन राहिले. त्याप्रमाणें माझे जावायानीं वागाविले त्याचे खावटीबद्दल दरमहा पांच रुपये प्रमाणें एकंदर १५० दिडशे रुपये झाले आहेत. त्यावेळींच तुह्मी फारकती देत होते. परंतु उद्या देतो असें कबूल करून कोठें गेले त्याचा पत्ता नाहीं. वरून नोटिस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत फारकती द्यावी. तुमचेकडून जबाब आला नाहींतर मी रितीप्रमाणें दुसरा घरठाव करीन. पुढें तुमचा माझेवर जबाबदारी राहणार नाहीं. कळावें. ता. ११-११-१६ इ. दस्तुर व्यंकटराव मारोतीराव देशमूख रा. बार्शीटाकळी

सही

जनी मर्द वायलजी कडु जात कुणबी हल्लीं राहणार बार्शीटाकळी निशानी बांगडी

G/o भिवसन पातेने रा. बार्शीटाकळी

नो० नं० ४०२

---

## नोटीस

कृष्णा वा तुकाराम माळी राहणार कोरकुम नजीक पांढऱ्याचीवाडी पोष्ट सवनगांव तालुका कोमथडी जि. पुणें

यांसः—

मी खालीं सही करणार भिमा मर्द कृष्णा हल्लीं मुक्काम आकोला या जाहीर नोटिशीनें कळविते कीं, तुमच्या नोटिसा पावल्या. त्या नोटिसीवरून स्पष्ट दिसते कीं, तुमचें ह्मणणें खोटें आहे. पहिल्या नोटिशींत २५ रुपयाचा जीकर नसून दुसरे नोटिशींत २५ रुपये मी घेऊन गेली. ह्मणून दिल्या हें सर्व खोटें आहे व केवळ मला घाबरविण्या साठीं लिहीतां.

तुह्मी माझा फार छळ केला, मला भलभलत्या शिव्या दिल्या, मारले गांजले व अंगावर चटके दिले आहेत. त्याचे डागही माझे आंगावर आहेत व तुह्मी मला पाठविलेल्या पत्रांत हाणमार केल्याचे कबूल करतां. आजपर्यंत तुह्मी केलेल्या छळाच्या अनुभवावरून तुमचे स्वतःहाचे कबुलें वरून तुह्मी माझे जीवाचे केव्हां काय कराल याची मला फार सबळ शंका वाटत असल्यामुळें तुह्मी आपलें वर्तन सुधाराल व मला बिलकुल गांजणार नाहीं असें स्वतः लिहून कळवाल व या बद्दल चांगले इसमाकडून शिफारसपत्रें पाठऊन माझी खात्री कराल तरच मी तुमचेजवळ येऊन नांदण्यास तयार आहे.

तुमचे वर्तनाबद्दल तुमची स्वतःची लेखी कबूली व दोन २ संभावित लोकांची तुह्मी मला छळणार नाहीं अशाबद्दल जामीन असल्यावाचून तुमचेजवळ नांदणें मला फार धोक्याचे वाटते. व तुह्मी मला वाटेल त्यावेळीं जिवाचे वाईट कराल अशाबद्दल शंका वाटते.

वरील प्रकारचें आश्वासनही नोटिस तुह्माला मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत तुमचेकडून आल्यास मी तुमचेकडेस येऊन नांदण्यास तयार आहे. तसें जर तुमचेकडून घडून न आल्यास मला तुमचे विरुद्ध जे कांहीं कायदेशीर करतां येईल तें मी करीन. व तुमचेजवळून सर्व खाण्यापिण्याचा व या नोटिशीचा व इतर कायदेशीर सर्व खर्च पै पै वसूल करून घेईन. कळावें. ही नोटिस मु॥ आकोला तारीख १४-११-१९१६

सही

भिमा मर्द कृष्णा माळी निशानी डावेहातचा आंगठा मु. आकोला

नो० नं० ४०३

---

## नोटीस

नोटीस बेशामी सुरजमल टिकमदस मारवाडी साहू दुकान कजबे वानखेड ता॥ जळगांव.

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी सन १९०६ चे मे महिन्यांत हिरालाल टिकमदास यांचे दुकानावर रुपये ८०० चे गहाणखत मौजे दुर्गादैत्य ता॥ जळगांव येथील.

शेत सर्वे नंबर ९६व२५ ६७ ६० हीं
२ १२

जमीन गहाण दिली पुढें हिरलाल हा मारवाड देशांत मरण पावला व त्याचा वारस मी आहे असें तुह्मी मला सांगीतल्यावरून मजकडून सदरहू गहाणखत ता॥ २३-५-१० रोजीं तुह्मी आपल्या नांवें बदलून घेतले व त्यांत मौजे दुर्गादैत्य येथील सेत सरवे नबर २५,६७ ९६ व कजबे वानखेड येथील स. नं. ७७ पैकीं अशी जमीन गहाण घेतली . त्या गहाणाचे फेडींत शेवटचा नंबर आह्मी तुह्मास ९०० रुपयांत फरोक्त केला तो तुह्मी परभारें नथु वा॥ माधवराव देशमुख रा. वानखेड यांस देऊन त्याजपासून गहाण घेतला व परभारे आमचे कडून खरेदीखत नथु यांस देववीले व तुह्मी हवाला घेतला व बाकी राहिलेली रक्कम आह्मी तुह्मास देऊन सदरहू गहाणखत रद्द ठरविले . त्यास तुह्मी हक्क नोंदणीचे वेळीं आमचे पश्चात हिरालाल तीन महिन्यापुर्वी वेगळा राहिल्याचे व सदरहु गहाणखत त्याच वाटणीस गेल्याचे कळविलें व हल्लीं असे कळते कीं हिरालाल याची बायको जिवंत असून तुह्मी आपला मुलगा तिला दत्तक दिला आहे व तुमचा भाऊ जैनारायण टिकमदास यानें आपले हुकुमनाम्यांत आमची वरील जमीन जप्तकेली. त्यांत त्यानें तुमचे गहाणखताचा बोजा दर्शविला आहे. वरून हा काय घोटाळा आहे तो नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत न कळविल्यास पुढें लागणारा कोर्टखर्च व ह्या नोटीसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे ता. १०-११-१६

रघु वा गोपी पाटील रा. दुर्गादैत्य पो वानखेड Via शेगांव

नो. नं. ४०४ 21-11-16

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्मी संबंद मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी कांतील रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार कळातरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण** —कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची काळा, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ।। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आ यांशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, धोक रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

**पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.** } **कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**

ना० नं० २०

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख २७ माहे नोव्हेंबर सन १९१६ ई० [ अंक ४६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे

## नोटीशीचे दर

द ओळीस दीड आणा.
हेडिंगचर, दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचना:-** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ — Lyon Setot एजंट

नो. नं १

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ·।।।·, १, १।, १।।, २, २।।, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ·।।।· १, १।।, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ·।·, ·।।·, ·।।।·, १, १।।, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३४९

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३।। रु. शेर नं. २ रा २।। रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी
मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६
नो० नं०

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १।। २, २।।. पाटल्या जोडीची किं. रु. १।।, २, २।।. सरी किं. रु. ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १।।. २, ३. ४. अंगठी किं. रु. १, १।।, सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १।।. बांगड्या जोडीची किं. रु. १।।, २ २।। कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ता:—**मगनलाल के. आणि कंपनी**
गिरगांव मुंबई.

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेंसे वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांच विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 3 — Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साधीं व वागन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तांटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**
नो० नं० ३९४

### आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमार्शीयल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शीयल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ३६९

### नोटीस

आह्मी खालीं सह्या करणार गणू वा। चहादू माळी उमाळे राहणार चरणगांव पोष्ट आलेगांव तालुका बाळापूर

यांसः—

नोटिस देतो ती येणें प्रमाणें तुह्मी आमचे ताब्यांत असलेली आमचे मयत नवऱ्याची इस्टेट दाबण्याच्या हेतूनें आह्मास भूल थापा वगैरे देऊन आपला मुलगा नामें किसन वा। गणु यांस आह्मी दत्तक घ्यावा, ह्मणून आमचेकडून ता. ८-११-१६ ह्या रोजीं मौजे गोर्धन ता. वाशीम येथें दत्तकपत्र लिहून घेतलें. परंतु ते लिहिल्यावर

त्यांतले अखेर ३ पसंत झाले आणि त्यांत ही एकच प्रकारच्या लकडाचा पुरवठा चांगला होईल असें आढळून आलें. हें लांकूड १० आणे घनफूट या भावानें विकत घेण्यास परवडेल कीं नाहीं हा प्रश्नच आहे. पेनासिलीला लागणारें ग्राफाइट इकडे मिळवें. पण पेनासिलीला शुद्धतेचें प्रमाण कमींत कमी शें. ७५ लागेंत. तें इकडच्या ग्राफाइट मध्यें फक्त शें. ३० आढळतें. कॉपीइंग पेनासिलीला रंग इकडे मिळतच नाहीं. तांबड्या व निळ्या रंगाच्या पेनासिली मात्र इकडे निघू शकतील. पेनसिलीच्या कारखान्याला लागणारें भांडवल ही आतां मिळालें आहे तेव्हां लवकरच कारखाना सुरू होईल. कांचेच्या कारखान्याला निराळ्या अडचणी आल्या. कोळशापेक्षां तेल जाळणें प्रयोगा अंती फायदेशीर ठरलें, व त्यासाठीं नवीन तऱ्हेची भट्टीची रचना शोधून काढावी लागली. काच करण्यास लागणाऱ्या द्रव्यांचें प्रमाण हें व्यापारी रहस्य आहे. तें सांगणारा कोणी ला नाहीं. शेवटीं अनेक वेळां पृथक्करण करून तें स्वतःच ठरवावें लागलें. कांच फुंकणारा तज्ञ अद्याप ही मिळाला नाहीं. (बेल्ज्यमहून कां आणिला नाहीं तें रिपोर्टांत सांगितलेलें नाहीं.) शेवटीं कारखाना एकदाचा उभारून कांहीं बाटल्या तयार केल्या व त्या लोकांना प्रदर्शनांत पसंत पडल्या. कागदाच्या कारखान्याची ही कर्मकथा अशीच आहे. एक मोडकळीस आलेला कारखाना निळाविण्याच्या खटपटींत पुष्कळ काळ गेला. त्यापूर्वीं एक शास्त्रज्ञ टिटावरचा कारखाना पाहण्यासाठीं पाठविण्यांत आले होते. नंतर पुनालरचा कारखाना ताब्यांत घेतला. पण त्यांत यंत्रांचे कांहीं भागच नव्हते. तथापि कागदाचा लगदा तयार करण्याचें काम एकदाचें सुरू करण्यांत आलें आहे. या कामीं बंगलोरच्या टाटा रिसर्च इन्स्टिटयूटची व त्रावणकोर सरकारची चांगली मदत झाली. तेल काढण्याचा व तें शुद्ध करण्याचा कारखाना काढावयाचा आहे. पण त्याला लागणारी यंत्रसामुग्री विलायतेंत मिळत नाहीं. (अमेरिकेहून कां आणीत नाहीं याचा उल्लेख नाहीं.) कांहीं यंत्रें आलीं आहेत त्यांवरच कारखान्याची उभारणी करण्याचें काम सुरू आहे. तेलाच्या कारखान्यांतून निकामी निघणाऱ्या द्रव्यांवर साबणाचा कारखाना काढतां येतो. त्यासाठीं पाऊण लाख रुपये मद्राससरकारनें दिले आहेत व तें काम सर फ्रे. निकलसन यांचेकडे सोपविलें आहे. वनस्पतीपासून रंग काढण्याचे प्रयोग करून पाहिले. पण ते महाग पडतात. वनस्पती ही पुरेशा मिळत नाहींत व त्यांचे रंग भडक नसल्यामुळें लोकांना आवडत नाहींत अशीं अपेशाचीं तीन कारणें देण्यांत आलीं आहेत. एकंदरींत हा रिपोर्ट बहुतेक निराशाजनकच आहे. तथापि इतर प्रांतांतून कदाचित् अधिक यश होईल अशी उमेद बाळगण्यास अद्याप जागा आहे.

---

## धान्यांचे तुलनात्मक भाव.

ता. १७ नोव्हेंबरच्या सरकारी ट्रेड जर्नलच्या अंकांत १९१४, १९१५ व १९१६, या तीन वर्षांतले सप्टेंबर अखेरचे धान्यांचे निरनिराळ्या पेठांतले भाव दिले आहेत. त्यावरून असें दिसतें कीं कलकत्ता, मुंबई, कराची, मद्रास, रंगून, डाक्का, काशी, कानपूर, लाहोर, पुणें, नागपूर, जबलपूर, वगैरे सर्व ठिकाणीं (एकही अपवाद नसतां) १९१४ सालपेक्षां १९१५ सालीं गहूं, तांदूळ, ज्वार, बाजरी, व चणा यांचे भाव ज्यास्त कडकलेले होते, पण १९१६ सालीं ते पुनः उतरले आहेत ब्लॉकडेमुळें जर्मनी वगैरे शत्रूच्या राष्ट्रांत जें धान्य इकडून जाण्याचें बंद झालें त्याचा तर हा परिणाम नसेल? तसें असेल तर इकडून परदेशीं जाणाऱ्या धान्याचा व्यापार अजीबात बंद केल्यास हिंदुस्थानच्या लोकांची उपासमार पुष्कळ कमी होईल असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे त्याला पुष्टि मिळते असें ह्मटलें पाहिजे.

---

## यंदाची कांग्रेस.

यंदा नाताळच्या आठवड्यांत लखनौ येथें भरणारी कांग्रेस राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें आजपर्यंतच्या सर्व बैठकींना मागें टाकणारी होईल असें दिसतें. मवाळ आणि जहाल या पक्षांतली दुही मोडून एक संयुक्त कांग्रेस भरविण्याचा मान यंदा लखनौला मिळणार आहे. गतवर्षीच्या नागपूरच्या प्रांतिक परिषदेनें या दोन्ही पक्षाचा समेट करून राष्ट्रीय कार्यांत सर्व मतभेद विसरून जुटीनें काम करण्याचें जें उदाहरण घालून दिलें, त्याचें अनुकरण यंदाच्या अमदाबादच्या प्रांतिक परिषदेनें करून संयुक्त कांग्रेसचा मार्ग निष्कंटक करून ठेविला याबद्दल मध्यप्रांत वऱ्हाड, आणि मुंबई येथील पुढाऱ्यांच्या दूरदर्शित्वाची प्रशंसा केली पाहिजे. लखनौच्या कांग्रेसनें सर्व पक्षांची जूट करण्याचें जरी श्रेय घेतलें तरी तें एक महत्कार्य समजलें जाईल. पण याशिवाय दुसरें ही तितकेंच महत्कार्य करण्याचें श्रेय लखनौच्या वाट्याला यंदा येणार आहे. सर सय्यद अहमद यांच्या वेळीं राष्ट्रीय सभेचा जन्म नुकताच झाला होता व आमच्या मुसल्मान बंधुत शिक्षणाचा प्रसार ही विशेषसा झाला नसल्यानें कित्येक आंग्लो-इंडियन धूर्तांनीं राष्ट्रीय सभेस ह्मणून पाडण्यासाठीं मुसलमानांच्या कानांत विष ओतून राष्ट्रीय सभेच्या प्रयत्नांना त्यांचेकडून विरोध करविला होता. पण ते दिवस गेले. गेल्या वीस पंचवीस वर्षांत मुसल्मान बंधूंत शिक्षणचा प्रसार बराच होऊन त्या धूर्तांचें कपट ओळखण्याचें सामर्थ्य आमच्या मुसल्मान बंधूच्या ठायीं ज्ञानाच्या योगानें प्राप्त झालें, आणि राष्ट्रीय उन्नतीच्या कार्याचा भार हिंदूप्रमाणें आपल्यावर ही आहे ही जाणीव त्यांच्यामध्यें उत्पन्न होऊन राष्ट्रीय सभेविषयीं त्यांचीं मनें पूर्वीं कलुषित झालीं होतीं तीं साफ होऊन राजकीय बाबतींत हिंदु आणि आपण एकाच नावेंत बसलों आहों, त्यांचें हित तेंच आपलें हित आहे ही गोष्ट त्यांच्या पुढाऱ्यांना पूर्णपणें कळून चुकली. याचा परिणाम असा झाला कीं हळूहळू मुसल्मान पुढारी कांग्रेसमध्यें हिंदु पुढाऱ्यांच्या खुर्चीशीं बसून राष्ट्रहिताचा विचार करूं लागले, आणि गेल्यासालीं ना. मि. मझरूल हक यांनीं मुंबईच्या मुस्लीमलीगच्या अध्यक्षाच्या पदावरून राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षास उत्तम प्रकारें साजेल असें भाषण केलें. इतकेंच नाहीं, तर कांग्रेसमध्यें सामील होऊन सर्व राष्ट्राची एक संयुक्त राष्ट्रीय कांग्रेस भरविण्याच्या मार्गांत असलेली आजपर्यंतचीं मोठी अडचण दूर करून उघड रीतीनें ऑल इंडिया कांग्रेस कमिटीशीं सहकारित्व ठेवण्याची आपली इच्छा आमच्या मुसल्मान बंधूंनीं जाहिर केली. त्याप्रमाणें ता. १७ नोव्हेंबर रोजीं कलकत्ता येथें ऑल इंडिया कांग्रेस कमिटीचे सभासद व मुस्लीम लीगनें निवडून दिलेले ना. मि. मझरुल हक, मि. हसनइमाम, मी. वझीर हसन, मि. रसुलनबाब अली, मि. अली नबी वगैरे गृहस्थांची एक सभा होऊन उभयतांनीं राजकीय सुधारणे संबंधाच्या आपापल्या योजना या संयुक्त सभेपुढें विचारासाठीं मांडल्या व त्यांवर चर्चा करून यंदाच्या कांग्रेसपुढें मांडण्यासाठीं एकमतानें ठरविलेली अशी योजना तयार केल्याचें ही आनंददायक वर्तमान आलें आहे. सारांश, मवाळ व जहाल हे पक्षभेद व हिंदु व मुसलमान हे भेद एकाच वेळीं नाहींतसे होऊन सगळया हिंदुस्थानची, सगळ्या लोकांची खरी खरी राष्ट्रीय सभा भरविण्याचा अपूर्व हिंदुस्थानच्या इतिहासांत अश्रुतपूर्व योग यंदा प्राप्त होणार आहे. लखनौच्या कांग्रेसचें खरें महत्व किती वाढलें आहे त्याची खरी कल्पना वरील हकीकती वरून कोणालाही करतां येईल.

ऑल इंडिया कांग्रेस कमिटीतर्फें पुढें मांडण्यांत आलेली सुधारणेची योजना व मुसलमान बंधूंनीं ठरविलेली योजना या बहुतांशीं मिळाल्या आहेत. फरक असलाच तर तो निदान तत्त्वांत नाहीं, तपशिलांत आहे. स्टेट सेक्रेटरीचें कौंसिल काढून टाकण्यांत यावें, व्हाइसराय साहेबांचें कौंसिल आधिक विस्तृत व्हावें, व त्यांत लोक नियुक्त सभासदांचें संख्याधिक्य असावें, एक्झिक्युटिव्ह कौंसिलांत निमे सभासद देशी असावे वगैरे सगळया महत्वाच्या ठळक बाबतींत कांग्रेसचे पुढारी व मुस्लिम लीगचे पुढारी यांच्यांत मतैक्य आहे. फरक एवढाच आहे कीं या कौंसिलांत लोकनियुक्तांचें प्रमाण चार पंचमांश असावें असें कांग्रेस कमिटी म्हणते, आणि मुसलमान बंधु तीन पंचमांशाच्या संख्येंत तृप्त आहेत. प्रमाणाच्या आंकडयाबद्दलचा मतभेद शुष्क आहे. मुख्य तत्त्व ह्मणजे लोकप्रतिनिधींची संख्या येवढी मोठी असावी कीं तिच्या योगानें लोकमत कौंसिलला स्पष्टपणें कळावें हें आहे. मग तें कोणत्या ही संख्येनें साधो. कौंसिलांत मुसल्मानांनीं स्वतंत्र प्रतिनिधि निवडून देण्याच्या हक्कासंबंधानें मतभेद होणें अपरिहार्य होतें. तथापि आमच्या पुढाऱ्यांच्या व मुसल्मान पुढाऱ्यांच्या शहाणपणाच्या तडजोडीमुळें बहुतेक प्रांतांसंबंधानें याही प्रश्नाचा निकाल समाधानकारक रीतीनें लागला आहे. कांहीं भाग जो अवशिष्ट राहिला आहे त्याचा ही निकाल यंदाच्या कांग्रेसमध्यें तसाच समाधानकारक होईल व मग हिंदु व मुसलमान बंधु हातांत हात घालून 'प्रियकर हिंदुस्थाना' चें गीत गात गात आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ खांदाशीं खांदा लावन प्रयत्न करण्यास लागतील अशी आह्मांस खात्री आहे. जो दिवस उजाडावा ह्मणून मि. ह्यूम, सर हेनरी कॉटन, सर विल्यम वेडरबर्न, डा. दादाभाई नौरोजी, सर फेरोजशहा मेथा व ना. गोखले चातकाप्रमाणें वाट पहात होते त्याची प्रभात झालेली यंदाच्या कांग्रेसमध्यें दिसून येणार आहे. याहून अधिक आनंददायक व अधिक शुभदिन कोणता असणार?

---

## इंग्लंडचे इतिहासास खो मिळाला!

(लेखक – त्र्यंबक सिताराम दिघे वकील आकोला)

आपल्या प्रांतांतील हायस्कूलांतून अतीशय महत्त्वाच्या अशा इंग्लंडचे इतिहासास खो मिळाला ही माहिती हायस्कूलचे मास्तर किंवा हायस्कूलमधील मुलें यांच्या खेरीज फारच थोड्या लोकांना माहित असेल व ही बातमी ऐकून कित्येक आश्चर्य चकीत ही होतील ! ही गोष्ट आश्चर्य करण्याजोगी जितकी आहे तितकीच ती खेद करण्याजोगी ही आहे. मध्यप्रांत व वऱ्हाडला स्वतंत्र युनिव्हर्सिटी नसल्यामुळें शाळाखात्यामध्यें होणारे फेर बदल येथील लोकमतानुरोधानें होत नाहींत इतकेंच नव्हे तर जो विषय मुंबई युनिव्हर्सिटीच्या नुसत्या बी. ए. च्या अवश्यक विषयामधून काढण्याचे वेळीं युनिव्हर्सिटीमध्यें मोठीं रणें पडलीं व ना. गोखले व सर फेरोजशहा मेथा यांनीं आपल्या सिंहगर्जनेनें सबंध मुंबई इलाखा दणाणून टाकला त्याच अतीशय महत्त्वाचे विषयाची आपल्या प्रांतांच्या हायस्कूलमांधून हाकालपट्टी होण्याचे वेळीं एखाद्यानें उद्वेगाची किंकाळीही मारल्याचे आमच्या ऐकिवांत नाहीं. मागासलेले हे प्रांत आहेत हें सिद्ध करण्यास एवढाच पुरावा बस्स आहे. ज्या इंग्लंडच्या इतिहासाबद्दल आमच्या राजकर्त्यांना अभिमान आहे, ज्या इतिहासांतील पिम्, हम्पडन, मिल्टन, चॅथम, पिट, बर्क, ग्लॅडस्टन, एलिझाबेथ व व्हिक्टोरिया सारख्या थोर विभूतीबद्दल खुद्द इंग्लंडलाच नव्हे तर सबंध जगाला अभिमान वाटत आहे, ज्या इतिहासामध्यें स्वातंत्र्याचा इतिहास लिहिला आहे, ज्या इतिहासामध्यें अनियंत्रित राज्यसत्तेला प्रजा स्वातंत्र्यानें आळा घातल्याचा हृदयंगम इतिहास लिहिला आहे, ज्यामध्यें सनदशीर चळवळीचा सुंदर इतिहास आहे व जो इतिहास खुद्द ब्रिटिश साम्राज्यामध्यें सर्वत्रांना शिकविला जातो इतकेंच नव्हे तर जपान सारख्या स्वतंत्र अशा परराष्ट्रामध्यें सुद्धां ज्या इतिहासाची विद्यालयांतून योजना केली जाते, असला इंग्लंडाचा इतिहास हायस्कूलांतून काढून टाकण्याची एखाद्यानें नुसती सूचना जर मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें आणली असती तर मुंबई इलाख्यांतील लोकांनीं आकाश पाताळ एक करून अशली सूचना आणणाराला सळो कीं पळो केलें असतें. परंतु आमच्या प्रांतांत तसें होण्याची नुसती भीति सुद्धां नको.

चांगलें वाईट जें कांहीं शिक्षण मिळेल तें घ्यावें आणि बसावें स्वस्थ असली येथील लोकांची स्थिती आहे. या प्रांतांतील लोक आपल्या मुला बाळांच्या शिक्षणाकडे जितकें दुर्लक्ष्य करीत आहेत तितकें कोणत्याही इतर प्रांतांतील लोक करित असतील किंवा नाहीं याची शंकाच आहे.

मुंबई, मद्रास, कलकत्ता, व पंजाब या सर्व प्रांतांतून हायस्कुलांतून इंग्लंडचा इतिहास शिकविला जातो. इतकेंच नव्हे तर खुद्द आपल्या प्रांतांत सुद्धां दोन वर्षापुर्वी हा विषय शिकविला जात होता; तोच विषय इतका एकदम त्याज्य कां झाला हेंच समजत नाहीं. कदाचित विद्यार्थ्यांचें अभ्यासाचें ओझें कमी करण्याचे उद्देशानें हा विषय काढून टाकला असेल, परंतु तसें ही कांहीं दिसत नाहीं. कारण अगदीं निरुपयोगी निदान हिंदुस्थानच्या लोकांना तरी निरुपयोगी अशा भूगोलाच्या विषयाची मॅट्रिक्युलेशन पर्यंत निरनिराळीं पांच पुस्तकें घोकून घेतलीं जात आहेत!

जो मुलगा १९१८ च्या मॅट्रिक परिक्षेला बसावयास तयार होईल त्यानें इंग्रजी तिसरी मध्यें घोषचा भूगोल व चौथीमध्यें लॉंगमनच्या भूगोलाचा पाहिला पाठ केला आहे. पांचवीमध्यें लॉंगमनच्याच भूगोलाचा दुसरा भाग तो पाठ करीत आहे व सहावी यत्ता व मॅट्रिकमध्यें मॉरिसन व रेनाल्ड यांची भूगोलाचीं दोन पुस्तकें त्यास पाठ करावी लागणार आहेत! ही विद्यार्थ्यांचें ओझें कमी करण्याची कळकळ! ज्या विषयाची किंमत ओळखून मुंबई युनिव्हर्सिटीनें स्वतः परिक्षा घेण्याचे सुद्धां बंद करून शाळांकडे व्यवस्था केली, त्या भूगोलाला आमच्या प्रांताकरितां शेकडोशें मैल अंतरावर असणाऱ्या अलाहाबाद युनिव्हर्सिटीमध्यें इतकें जबरदस्त महत्त्व दिलें आहे कीं प्रत्येक विद्यार्थ्याला नुसत्या भूगोलांत शेंकडा ३३ गूण मिळविलेच पाहिजेत! व ते न मिळाल्यामुळें नापास होणारांची संख्या इतकी जबरदस्त आहे कीं नापास झालेल्या मुलांपैकीं शेंकडा ३० तरी नुसत्या भूगोलांत नापास झालेलीं असतात! शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं तुह्माला विद्यार्थ्यांचा इतका कळवळा येत असेल तर भूगोल हा निरुपयोगी विषय साफ काढून टाका. या विषयाची घोकंपट्टी मराठी शाळामधून होते तेवढी बस्स आहे. परंतु जो इतिहास मनुष्य प्राण्याच्या हक्काच्या, मानव जातीच्या उन्नतीच्या, मानव जातीच्या स्वातंत्र्याच्या कल्पना विद्यार्थ्यांचे मनांत बिंबवितो त्या इंग्लंडचे इतिहासाची हायस्कूलचे शिक्षणांतून हाकालपट्टी करूं नका. आमच्या प्रांतांतील सुशिक्षित लोकांनीं हा विषय हायस्कूलामध्यें शिकविलाच पाहिजे असा सरकारपाशीं हट्ट धरून बसलें पाहिजे. जर आमच्या प्रांतांतील नामदार लोक ही लोकमताची आरोळी काउन्सिलमध्यें सरकारचे कानावर घालणार नाहींत तर "हे आमचे प्रतिनिधीच नव्हत" असें ह्मणावे लागेल.

---

# पांढरा हत्ती.

ब्रह्म देशाकडील आख्याइका अशी आहे कीं एखाद्या सरदाराला पांढरा हत्ती बक्षीस दिला ह्मणजे त्याचा विनाशकाल सुरू झाला असें समजतात. अर्थ इतकाच कीं हत्तीला पोसण्या इतकी जहागीर मिळाल्याशिवाय बक्षीस हत्ती देखील खर्चाच्या चुराड्याखालीं रावाचा रंक करतो. ही गोष्ट आठवण्याला कारण गेल्या ९ व्या तारखेला बी. पी. वाडिया यांचें उमरावती येथील ब्रह्मविद्या मंदिराच्या पटांगणांत झालेलें जाहीर व्याख्यान होय. इंडियाला एकराष्ट्रीयपणा ब्रिटिश राज्यानेंच आला आहे, व त्याच साम्राज्यानें इंडियाला उत्कर्षाचा व उत्कृष्ट संस्कृतीचा लाभ करून दिला आहे. तथापि हें हिंदी राष्ट्र सुधारलेल्या राष्ट्राच्या दर्जाला बसूं शकत नाहीं. कां कीं त्याचें दौर्बल्य व भिकारदशा हीं सर्व बाजूनें देशाच्या अपकर्षाला कारणीभूत झालीं आहेत. ब्रिटिश राज्य कारभारांत जें व्यंग्य आहे तें हेंच. राज्यकारभार सुंदर खरा; तो सुराज्याच्या डंका वाजवितो आणि ब्रिटिश वैभवही बहुगुणित करतो. पण तो या देशाच्या स्थितीला पांढऱ्या हत्ती सारखा झालेला आहे. इंडियाचे महर्षि दादाभाई नौरोजी हे हीच गोष्ट सांगतां सांगतां अजरामर झाले आहेत. त्यांच्या त्या प्रासादिक ग्रंथामध्यें व वाणीमध्यें ब्रिटिश कारभाराला जो शाप मिळाला आहे तो देखील इंडियन राष्ट्राच्या ऱ्हासाची कहाणी पुनःपुन्हा राज्यकर्त्यास जाग्रत करीत आहे. हिंदुस्थानचा संपदासमुद्र देखील यामुळें कोरडा शुष्क झाला आहे. व सर्व आपदांचें पुलीन येथें सर्वत्र प्रसृत आहे. सृष्टीमध्यें भूकंप समुद्र तेथें डोंगर व डोंगर तेथें समुद्र असें करतो. तद्वत् ब्रिटिश राज्यानें या सुवर्णमय ह्मणून ह्मणवलेल्या देशाला जो कंप आणून सोडला आहे, त्याचीं मुळें ह्मणजे ब्रिटिश कारभाराचा अफाट खर्च होय. आणि त्या खर्चाच्या द्वारानें हिंदुस्थानच्या लक्ष्मीची सावली विलायतेवर पडली आहे. राजश्री वाडिया यांनीं निरनिराळया राष्ट्रांच्या कारभारांच्या खर्चाचे आंकडे एकत्रपणें सांगितले, आणि खर्चाच्या बाबतींत या राष्ट्राच्या बरोबरीला कोणताच देश येऊं शकला नाहीं. विलायतेहून येणारे अधिकारी व येथें सुखसाधनें उत्पन्न करून देणारें विलायतचें भांडवल यांमुळें या देशाचा सोनेरी मेरूपर्वत ही पोखरून पोखरून जमीनदोस्त झाला आहे. प्रजेच्या कल्याणाची कोणतीही गोष्ट घ्या. विद्यादानाची घ्या किंवा आरोग्याची घ्या, किंवा अशीच उन्नतीकारक कोणतीही बाब घ्या. सर्व गोष्टी पैशाच्या किंवा द्रव्यबलाच्या अभावीं लंगडया व लुल्या पडतात. पण राष्ट्राला सजीव ठेवणाऱ्या या गोष्टी करण्यासाठीं विलायती अधिकाऱ्यांचा पगार कमी होऊं शकत नाहीं. आणि एवढ्याच साठीं सर्व राष्ट्राची मागणी एकच आहे. आणि ती स्वराज्याची होय. ही स्वराज्याची कल्पना परवा दिल्लीं येथें भरलेल्या संस्थानिकांच्या परिषदेंत चांगली राजमान्य ठरली आहे. फक्त नामनिर्देश मात्र तसा नाहीं. श्रीमंत गायकवाड सरकार त्या परिषदेंत बोलले कीं संस्थानच्या कारभारात बाहेरचा हात नको. आणि बाह्य कारभारांत आम्ही संस्थानिक ही पडणार नाहीं. या स्वराज्याच्या कल्पनेच्या बुडाशीं देखील सर्व इंडियाचें संस्थान बनविण्याची कल्पना शिखरस्थानीं आहे. इंडियन लोकांच्या हातीं स्वराज्य आलें म्हणजे देशाच्या खजिन्याच्या किल्या त्या बरोबरच येतील. आणि मग आदा पाहून यर्थ करतांना आपोआप चालू राज्यकारभाराला चांगला आळा बसेल. आणि देशाच्या गरजा संपत्तीच्या अनुकूलते प्रमाणें सम किंवा व्यस्त प्रमाणांत बसविण्यांत येतील. अर्थशास्त्राचें हें पाहिलें तत्व अर्थशास्त्रवादी ब्रिटिश सरकारास कळत नाहीं असें नाहीं. पण परंपरागत चालत आलेली वैभवाची गोष्ट दूर फेकण्याला व्यक्ती व्यक्तींना कांहीं पिढ्या लागतात तेथें सरकार या अव्यक्त पुरुषाला हेंच तत्व स्वीकृत करण्याला ब्रिटिश राष्ट्राची आजपर्यंत लोटलेलीं शतकें पुरीं ओहत असा आजचा मनू सांगत आहे. जामदारखान्याच्या किल्या प्रजेनें आपल्या हातीं कशा घेतल्या हें इंग्लिश इतिहास सांगतो. आणि तोच इतिहास वर्तमानकाळीं आमचे राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यामध्यें पडलेल्या या कलहांत पुन्हा स्वराज्य या सुंदर नांवाखालीं घडून येत आहे. नाबालिक इस्टेटीचा हिशोब जसा पालनकर्त्याकडून दिवाणी न्यायाधीश घेतात तसा आह्मी मागत नाहीं. ब्रिटिश राष्ट्राच्या उदात्त व उदार बुद्धीनें आह्मीं जागृतपणें उपकृत आहों. आणि त्याच उपकारश्रेणीच्या भारामुळें आजपर्यंतचा राज्यकारभार संस्कृतीच्या शिखराकडे नेणाऱ्या सोपाना प्रमाणें आह्मांस उत्कर्षप्रद झालेला आहे. ह्मणून आह्मी मागील जमाखर्च जसाचा तसा स्वीकारून भावी कारभार आमच्या स्वाधीन करण्याविषयीं सरकारापाशीं विनंति करीत आहोंत. हा स्वराज्याचा न्याय आह्मांस राज्यकर्ते देतील असा भविष्यकालाचा ध्वनी आमच्या कानांत गुणगुणूं लागला आहे. आणि सभोंवार दृष्टी फेकली ह्मणजे लॉर्ड हार्डिंज सारख्या थोर थोर व्यक्ती आमचा हात धरून त्या इष्ट ध्येयाकडे आह्मांला बरबर नेत आहेत असाच अनुभव येतो. ईश्वर करो आणि तो सुमंगल दिवस लवकर येवो. ह्मणजे हल्लींचा पांढरा हत्तीही राष्ट्राच्या वर्धमान शक्तीपुढें फारसा जड वाटणार नाहीं व हल्का हल्का होत जाईल.

---

# ऑनररी मॅजिस्ट्रेट.

हा अधिकार पुष्कळशा सुखवस्तु लोकांस मोठ्या बहुमानाचा वाटत असतो. राजदरबारीं वळण लागते. आणि आपल्या भागांतील लोकांवर छाप चांगली राहाते. हा सन्मानाचा लाभ मिळावा ह्मणून मोठी स्पर्धा व चढाओढ चाललेली सरकारी अधिकाऱ्यांस दिसून येते. सरकारी रावसाहेब, रावबहादूर इत्यादि किताबापेक्षां ही आनररी माजिस्ट्रेटीची श्रीमंती मोठी आहे. आणि तिच्यासाठीं किती तरी लोक भगीरथ प्रयत्न करीत असतात हें पाहून आश्चर्यानें सर हेनरी ड्रेक ब्रॉकमन यांनीं गेल्या न्यायखात्याचे रिपोर्टांत आश्चर्याचे व समाधानाचे उद्गार काढले आहेत. मध्यप्रांतापेक्षां वऱ्हाडांत मॅजिस्ट्रेटीची लालसा विशेष प्रदीप्त दिसते. आणि ही महाजनांची तृष्णा तृप्त करण्याइतकी अधिकाराची गंगोत्री अधिकाऱ्यांपाशीं उपलब्ध नाहीं. ह्मणून एका श्रेष्ठ अधिकाऱ्यांना चांगली वर्णनीय युक्ती लढविली आहे. आमचे जिल्हासाहेब राजश्री जठार हे मोठे कल्पक आहेत. त्यांनीं एक नामी सूचना पुढें केली आहे. त्यांचा अभिप्राय असा कीं ऑनररी मॅजिस्ट्रेटी कांहीं वर्षांच्या मुदतीची असावी. आणि ती सत्पात्र असलेल्या गृहस्थास फेरपाळीनें देण्यांत यावी. म्हणजे जसे पाटील पटवारी यांच्या वतनामध्यें फेर पाळीचें चक्र फिरतें राहातें, तसें चक्र ऑनररी मॅजिस्ट्रेटी संबंधानें फिरतें ठेविलें म्हणजे पुष्कळशा लोकांची तहानभूक क्रमाक्रमानें भागेल असा आम्हांला ही पूर्ण विश्वास वाटतो. ही व्यवस्था अनुभवून पाहण्या इतकी उत्तम आहे. म्हणजे पुष्कळसे लोक या सार्वजनिक कार्याच्या उद्योगाला लागतील. सार्वजनिक दुसऱ्या पुष्कळशा गोष्टी माणसांच्या अभावामुळें ज्या तशाच पडून राहिलेल्या आहेत त्या या सुखवस्तू लोकांच्या गळयांत पडल्या तर त्यांचा विशेष उपयोग होण्यासारखा दिसतो. पण त्यांची जाणीव येण्या इतकी बुद्धी व मनाची गती अद्याप उदय पावलेली नाहीं. ही होतकरू महत्वाकांक्षी मंडळी या फेरपाळीच्या ऑनररी मॅजिस्ट्रेटी खालीं चांगली रुळून बाहेर निघेपर्यंत राजश्री जठार यांच्या सूचनेला अग्रस्थान द्यावें असें आम्हीं म्हणतों.

या फेरपाळीच्या मॅजिस्ट्रेटी पासून होणारे दुसरेही कांहीं फायदे लक्षांत घेण्या सारखे आहेत. हल्लीं ऑनररी मॅजिस्ट्रेट बनला कीं तो जन्मभर मॅजिस्ट्रेटच राहतो. या बिनपगारी जागेचा कोणी राजीनामाही देत नाहीं व सरकारी शिष्टाचाराप्रमाणें तो मॅजिस्ट्रेट पेनशनींत ही सहसा निघत नाहीं. सरकारी मॅजिस्ट्रेटांप्रमाणें त्यांचें स्थलांतरही होत नाहीं. स्थाणुप्रमाणें हे ऑनररी मॅजिस्ट्रेट त्या त्या भागाला ध्रुवासारखे निश्चल वाटतात. तेव्हां हल्लींच्या ऑनररी मॅजिस्ट्रेटांच्या कोर्टामध्यें हा मोठा दोष आहे, आणि लोकांना मनांतून फेरफार पाहिजे असून ही तो सरकारपाशीं मागण्याला संधी ही मिळत नाहीं. इतकी अप्रिय व व्यक्तिविशिष्ट फेरफाराची गोष्ट कोण करतो? हीं सर्व विघ्नें दूर होण्याला हा फेरपाळी मॅजिस्ट्रेटीचा उपाय विशेष सुंदर होय.

---

## मुदतबंदीचे करार.
### हिंदुस्थान सरकारचा खलिता.

कानडा, आस्ट्रेलिया, मॉरिशस, फिजी वगैरे वसाहतींतून मुदतबंदीच्या करारानें इकडून फुसलावून नेलेल्या मजूरांची जी अवर्णनीय दुर्दशा होते, तिच्यासंबंधानें हिंदुस्थानांतल्या देशी व इंग्रजी पत्रांनीं ही आजपर्यंत पुष्कळ कंठशोष केला व ना. मि. गोखले यांनीं वरिष्ठ कौंसिलांत ठराव आणून सदर कराराची पद्धति अजीबात

बंद करावी ह्मणून पुष्कळ खटपट केली, पण हिंदी लोकांची ग्रहदशा अद्याप संपली नसल्यानें ती पद्धत अद्याप सुरू आहे. तथापि हिंदुस्थानांतले लोकमताची क्षुब्धता ओळखून हिंदुस्थान सरकारानें या संबंधांत स्टेटसेक्रेटरी साहेबांस नुकताच एक खलिता पाठवून ही मुदतबंदी कराराची पद्धत अत्यंत अनिष्ट आहे इतकेंच नाहींतर अनीतिकारक ही आहे असें लोकांचें व संयुक्तप्रांत, मद्रास, व मध्यप्रांत येथील सरकारांचें ही मत आहे असें स्टेटसेक्रेटरी साहेबांस कळविलें असून ही पद्धत अजीबात बंद करतां आल्यास उत्तमच; पण युद्धामुळें या प्रश्नासंबंधानें वसाहत सरकारांशीं पत्रव्यवहार व चर्चा करण्यास सवड नसल्यामुळें अजीबात करतां न आली तर निदान तिच्यांत कांहीं सुधारणा तरी व्हावी असें स्पष्टपणें ह्मटलें आहे. या सुधारणांचा ही उल्लेख स्थूलमानानें खलित्यांत केला आहे. या सुधारणा जरी तूर्त ताबडतोब अंमलांत आल्या तरी गरीब मजुरांचे बरेचसे हाल कमी होतील. पण येवढ्या सुधारणा तूर्त केल्यानें कायमचा बंदोबस्त झाला असें मात्र समजतां कामा नये. ती पद्धति अजिबातच बंद करून घेण्याची खटपट चालू ठेविली पाहिजे. हिंदुस्थान सरकारनें मजुरांच्या वतीनें येवढी तरी वकीली केली येवढ्या बद्दलच त्यांचे उपकार तूर्त मानिले पाहिजेत

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत ब्रिटिश सैन्याला एक फार महत्त्वाचा असा विजय पश्चिम रणक्षेत्रांत मिळाला. ब्यूमोंट हेमेल हें नगर ही त्यांनीं घेतलें व शत्रूचे ४००० लोक त्यांचे हातीं लागले. या विजयाबद्दल सेनापति हेग यांचें चोहोंकडून अभिनंदन करण्यांत आलें. ब्रिटिश सैन्य जर्मन सैन्याला मागें हटवीत आपण पुढें चाललें आहे. ९६७० शत्रूचे लोक हातीं लागले आहेत. या विजयाबद्दल युद्ध विशारद इंग्रजांकडून व खुद्द श्रीमान् नार्ज बादशहाकडून अभिनंदन करण्यांत आलें आहे. ब्यूमोंट हेमेलच्या युद्धावरून एक गोष्ट सिद्ध झाली आहे. ती ही कीं खंदकांच्या ज्या रांगा जर्मन दुर्भेद्य मानीत आहेत त्यांत प्रवेश करणें संयुक्त सैन्यास अशक्य नाहीं. सॉमकडे जर्मन लोकांनीं जोरानें हल्ले चालविले आहेत. पण ब्रिटिश ही ते हल्ले तितक्याच आवेशानें परतवीत आहेत. या हल्ल्यांत जर्मनींचेंच नुकसान फार होत आहे. कांहीं कांहीं पलटणींतील शेंकडा ९० माणसें ठार झालीं आहेत. सारांश, पश्चिम रणांगणावर जनरल हेग याच्या सैन्यानें अद्वितीय पराक्रम गाजविल्यामुळें त्याच्या विषयीं कुजबुज करणारांचीं सद्धां मनें शुद्ध होऊन त्याना फील्ड मार्शल ही पदवी देण्याविषयींच्या सूचना होऊं लागल्या आहेत.

## पूर्व रणक्षेत्र.

या ठिकाणची स्थिति पूर्ववत् आहे. या बाजूच्या विशेषशा खबरा गेल्या आठवड्यांत आल्या नाहींत. कार्पेथियनमध्यें मौंट कापुल प्रदेशांत राशियानें शत्रूचे कांहीं हल्ले परतविले व कांहीं ठिकाणें काबीज केलीं या पलीकडे अधिक कांहीं बातमी आली नाहीं.

## रूमानिया.

येथें मात्र पुनः एकवार घनघोर युद्ध सुरू झालें आहे. शत्रु रूमानियावर चढाई करण्यासाठीं आपल्या फौजा गोळा करीत आहे हें आज कित्येक दिवसांपासून कळलें होतें. चालू वर्ष संपण्याचे पूर्वीं रूमानिया पादाक्रांत करावयाचा आपला विचार शत्रूकडून बाहेर ही पडला. तेव्हांपासून रूमानियाविषयीं वाटत असलेली भीती खरी होत चाललेली दिसते. तथापि विजयश्री मित्रपक्षाच्या बाजूला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. ता. २९ आक्टोबर पासून रूमानियावर चढाया होत आहेत. पण त्या बहुतेक रूमानियानें परतविल्या आहेत. शत्रूनें आपल्या तोफा पर्वतांतून काढून रूमानियाच्या मैदानांत आणून ठेविल्यापासून रूमानियावरचें संकट वाढलें आहे. शत्रूनें दोन दिवसांत ६ कोस जागा आक्रमण केली. त्यावरून बरीच भीती उत्पन्न झाली होती. पण हळूं हळूं ती निवळत चालली आहे.

## मोनास्टिर पडलें.

गेल्या आठवड्यांत ज्याच्या त्याच्या तोंडीं मोनास्टिर पडलें, बल्गेरियनांच्या छातींत हा एक मोठा घाव झाला, मासिडोनिया आपल्या ताब्यांत ठेवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा पार नाहींशी झाली, जर्मनीच्या मततीची आशा जागचे जागीं राहिली, असे उद्गार होते. या ठिकाणीं सर्वियन लोकांनीं जें अप्रतिम शौर्य दाखविलें तें इतिहासांत नमूद होऊन राहील. मोनास्टिर पडल्याचे दुसरे राजकीय परिणाव फार महत्त्वाचे होतील. आतां ग्रीस मित्रपक्षाच्या वाटेला जाणार नाहीं. बल्गेरिया दुर्बळ होईल. रुमानियाला हुरूप येईल, व त्या मुलखांतल्या मित्रपक्षांच्या आशा अधिक उज्वलित होतील.

## असत्य विधान.

राशियन आणि रूमानिया यांनीं डोब्रुजा येथें बल्गेरियन लोकांची कत्तल केली असें असत्य विधान बल्गेरियनांनीं सर्वत्र पसरविलें होतें. ही गोष्ट साफ खोटी आहे, राशियन लोक निराश्रित शत्रूवर तुटून पडण्याइतका हलकटपणा कधीं करणारे नाहींत, ते शिक्षा करतील ती निराश्रित बल्गेरियनांना नाहीं, तर त्यांच्या दगलबाज मुत्सद्यांना त्यांच्या घोर अपराधाबद्दल करतील असें पेट्रोग्राड येथें सरकारी रीतीनें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

## बेलज्यममध्यें अत्याचार.

शिकागो न्यूज वर्तमानपत्राच्या एका बातमीदारानें एका अमेरिकन गृहस्थाची मुलाखत घेतली, तेव्हां त्या गृहस्थाकडून बेलज्यम लोकांवर वडलेल्या भयंकर अत्याचाराची हकीकत कळली. जर्मन लोक गाड्यांच्या गाड्या भरून बेलजियन लोकांना हद्दपार करीत आहेत. जे कोणी बेलजियन त्या गोष्टीला हरकत घेत होते त्यांना जर्मन बागनेटच्या तीक्ष्णतेचा अनुभव घ्यावा लागला. पुरुषांवर घडणारा हा अत्याचार टळावा ह्मणून बेलजियन स्त्रिया जिवावर उदार होऊन लढत होत्या. हद्दपार लोकांना भरून घेऊन चाललेल्या आगगाड्यांच्या रूळावर स्त्रिया व मुलें जाऊन पडलीं. त्यांना जर्मनांनीं बागनेटांच्या तीक्ष्ण टोकांनीं दूर सारिलें. हा एकंदर देखावा पाषाणहृदयी माणसाच्या अंतःकरणाला सुद्धां द्रव आणणारा होता असें अमेरिकन गृहस्थ ह्मणतो.

## सुभविष्य.

सांप्रतच्या महायुद्धाचा शेवट केव्हां होईल अशा विषयीं कांहीं ज्योतिर्विदांनीं व राजकीय तज्ञांनीं असें भविष्य वर्तविलें आहे कीं इंडियाला स्वराज्य मिळेल तेव्हां या लढाईचा गोड शेवट होईल. नीतिदृष्ट्या तरी या भविष्यांत पूर्ण सत्य भरलेलें आहे.

## अत्यंत शोचनीय मृत्यु.

राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांपैकीं एक सन्मान्य प्रमुख पुढारी व १९११ सालीं कलकत्त्यास भरलेल्या कांग्रेसचे अध्यक्ष पंडित बिशन नारायण धर यांस ता. १९ रोजीं लखनौ येथें देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे. हे जातीनें काश्मीरी ब्राह्मण असून यांचें शिक्षण लखनौ येथें क्यानिंग कॉलेजमध्यें होऊन नंतर ते विलायतेस ब्यारिस्टर होण्यासाठीं गेले, व इष्ट हेतु सिद्ध करून आल्यावर केवळ पैसा मिळविण्याकडे ध्यान न ठेवतां सार्वजनिक हिताच्या चळवळींत पडूं लागले. यांची शरिरप्रकृति सदृढ नव्हती तरी अध्ययन, लेखन व भाषण हे त्यांचे व्यवसाय ते अखंड रीतीनें चालवीत असत. १८८७ पासून हे कांग्रेसला मिळाले व १९११ सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेच्यावेळीं ते अध्यक्ष नेमिले गेले. यंदाच्या लखनौच्या कांग्रेस स्वागतकमेटीचे ते चेअरमन निवडले गेले होते. ते जगले असते तर एक अप्रतिम भाषण ऐकण्याची राष्ट्रभक्तांना संधी मिळाली असती. कारण राजकीय विषयावर भारदस्त, सयुक्तिक टीकायुक्त पण जोरदार भाषण करण्याची व लेख लिहिण्याची कला त्यांना उत्कृष्ट साधली होती. इंग्रजी भाषेवर तर त्यांचें प्रभुत्व उत्तम प्रकारचें होतेंच हें हिंदुस्थान रिव्हू व लीडर मधले त्यांचे लेख चांगलें दाखवितात. पण उर्दू भाषेचे ही ते चांगले निष्णात लेखक व कवि होते. मोफत व सक्तीचे शिक्षणाचे ते मोठे पुरस्कर्ते होते. हे संयुक्त प्रांततर्फे व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलांत सभासद निवडून गेले होते, पण त्यांना जडलेल्या भयंकर शारीरिक व्याधीमुळें ते ह्मणण्यासारखी कांहीं कामगिरी करूं शकले नाहींत, मरण समयीं त्यांचें वय ५२ वर्षांचें होतें. त्यांच्या मरणामुळें संयुक्त प्रांताचा एक मोठा राजकीय तत्त्वज्ञ, व पुढारी व भारतमातेचा एक सन्मान्य आणि खऱ्या कळकळीचा बाणेदार पुत्र नाहींसा झाला आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—हल्लींच्या वातावरणांत मेघांचा क्षोभ विशेष आहे. पूर्वसमुद्राच्या बाजूचीं तुफानें अरबी समुद्रास मिळेपर्यंत सर्व देशभर पर्जन्यच पर्जन्य झाला. ही पावसाची लाट गेले दोन तीन दिवस आमच्या प्रांतांतही धुमाकूळ करीत गेली. अकालीं कोणतीही गोष्ट सुखकारक होत नसते. आणि त्या मानानें ही पिकांची दुर्दशाच होय. प्लेगाचा ही प्रसार खामगांवच्या भागाला होत आहे. आणि उंदीरही आकोल्याच्या कांहीं भागांत या ईतीचा ध्वनी करितात.

**स्वागतम्**—नामदार रा. रा. श्रीनिवास शास्त्री सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीचे प्रेसिडेंट यांची स्वारी आज आकोल्यास येणार असून सायंकाळीं त्यांचें व्याख्यान ही होणार आहे. आकोल्यास त्यांच्या या भेटीचा लाभ बहुमोलाचा वाटतो. पण कार्यबाहुल्यामुळें त्यांस आजच्याच मेलनें मुंबईकडे जावे लागत आहे.

**आनंदाची एकी**—रावसाहेब रामभाऊ हे ऑल इंडिया कांग्रेस कमिटीला कलकत्त्यास वऱ्हाडतर्फे हजर होते. हिंदु मुसलमानांचें ऐक्य दुणावलें असून येत्या राष्ट्रीय सभेंत भावी स्वराज्याच्या मांडणीचा मसुदा तयार होण्याचा उत्तम रंग दिसतो.

येत्या गुरुवारीं रावबहादूर केळकर हे राजश्री ढोबळे यांस डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जजाचा चार्ज देऊन सरकारी नोकरीची रजा घेतील. त्यांच्या विजयी कारकिर्दीची इतिश्री या सप्तकांत मोठ्या आनंदोत्सवांत व आदर सत्कारांत होत आहे.

**वृथावाद**—गेल्या ९ व्या प्रांतिक परिषदेच्या हितेच्छुंपैकीं ज्यांनीं विदुषी आनी बिझांट यांस मनाई करण्याचा सल्ला स्थानिक सरकारास सुचविला ते कोण धन्य पुरुष आहेत अशा विषयीं मोठा वाद पडला आहे. ते कोणीही असोत पण एकंदर परिषदेच्या सुवर्णमय इतिहासानें त्यांची प्रामाणिक अटकळ व दूरदृष्टी चुकली असेंच त्यांच्या ध्यानांत येऊन गेलें असेल. तेव्हां तो वृथावाद कशाला ? का कीं या चुकलेल्या सेवेबद्दल त्यांस सरकारांतून ही येत्या वर्षं प्रतिपदेला कांहीं नवीन सन्मान मिळण्याचा संभव नाहीं.

**पुरवणी**—बेळगांवच्या श्रीराम तत्वप्रकाश प्रेसच्या पुस्तकांची जाहिरात सोबत वाटली जात आहे तिच्याकडे दृष्टी दिल्यास ग्रंथ संग्रहाची हौस बरीचशी तृप्त होईल.

## आकोला बाजार भाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें | २६॥। |
| चांदी | ९४ ते ९६ |
| जवस | १५० |
| तुरी | ४ ते ५ |
| मुग | ५ ते ६॥। |
| उळीद | ६ ते ४॥ |
| तांदूळ | ९ ते १० |
| मठ | ३ ते ४ |
| तेल | ७ ते ८ |
| तुप | १२॥ |
| जवारी | ६० ते ६२ |
| गहू काठे | ५॥ ते ६ |
| गहूं खांडवा पीवडा | ६ ते ७ |
| सरकी | १० ते १०॥ |
| कापूस | ८५ ते ९० |
| रुई आकोला जीन | १०० ते १२५ |

### नोटीस

नोटीस रा. जैराम वाा परशराम निमकाळे रा. आसोल पोष्ट आलेगांव ता० बाळापूर.

यांसः—

खालीं सही करणारे इसमाकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी मौजे आसोल ता० बाळापूर येथील

शेत सर्वे नं. ए. गुं. आ. रु.
२८ ३३८२५ ३३

एक त्रितीयांश हिस्सा पश्चिमेकडील हें शेत रा. संभाजी वाा नारायण रा. आसोल यांज कडून ता० १७।४।१६ चे पट्टेखताचे आधारें शेतांतील निम्मे पिक देण्याचे करारानें सन १९१५ ते १९२० पावेतों पांच वर्षाचे करारानें बटाईनें वहितीस केलें आहे. सदर्हू शेत संभाजी कडून भगवान वाा जगदेव यानें खरेदी घेतलें असून तेंच शेत मी भगवान पाटलाकडून ता० ९।५।१६ चें आधारें खरेदी घेतलें आहे, करितां त्या खरेदीखता अन्वये सदर्हू शेताचा मी मालक झालो आहे. करितां सदर्हू शेतांतील निम्मे पिक चालू सालापासून पांच वर्षे पूरी होईपावेतों आह्मांस देत जावे व पांच वर्षे पुरीं होतांच शेत आमचे हवाली करावें. चालूं सालचे स्वामित्वाचें निम्मे पिके नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत मजला देऊन माझी पावती घ्यावी. तसे न केल्यास मजला रीतीप्रमाणें तुमचेवर नोटिशीचे खर्चासुद्धां दिवाणींत दावा करावा लागेल कळावें ता. २२।११।१६

सही

मारुती वाा नारायण पाटील
रा. आसोल द० खु०

नो. नं. ४१०

### जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार पुंजी मर्द नारायणसा तेली रा० दर्यापुर ताा मजकूर जि० उमरावती इजकडून सर्वत्र. लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं, माझा गंधर्वाचा नवरा नामे नारायणसा वल्द श्रावणसा रा० दर्यापूर हा लोकांचें कर्ज काढितो असें माझे ऐकण्यांत आलें आहे. त्याजजवळ स्थावर जंगम मिळकत कांहीं नाहीं तरी त्याजबद्दलचे कर्जाबद्दल माझे स्वतःचे मिळकतीवर कोणी त्याचा सावकार अंमलबारी करूं इच्छील तर मजला मी अबला असल्या संबंधानें सरकार दरबारीं काम चालविण्यास जो खर्च लागेल तो व मजला सदरहू संबंधानें जो त्रास पडेल त्याज बद्दल नुकसानी अशी एकंदर रकम मी सदरहू सावकारा कडून कायदेशीर रितीनें वसुल करीन. माझे नवऱ्यास त्याचे सावकारांनी कैदेची दरखास्त वगैरे दिल्यास माझी कोणतेच प्रकारची हरकत नाहीं. ही नोटीस दिली सही तारीख२२माहे आक्टोबर सन१९१६ इसवी दस्तुर पांडुरंग विठ्ठल पातुरकर उमेदवार दर्यापूर

सही

नि. पुंजी मर्द नारायणसा आंबलकार
तेली रा०दर्यापूर इचा आंगठा

नो० नं० ४११

## कापुस तक्ता—साप्ताहिक १८ नोवेंबर सन १९१६

| जिल्हा. | वर्ष. | काटन मार्केट. आयात. कापसाच्या गाड्यांची संख्या. ता. १८-११-१६ पर्यंतचा आठवडा | कापसाच्या गाड्यांची संख्या. १-९-१६ पासून. | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. ता. १८-११-१६ पर्यंतचा आठवडा | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. १-९-१६ पासून |
|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | ९,९२३ | १७,१७६ | ८६ | ९९ |
| | गुदस्त | ८,१०९ | १४,१६३ | २४३ | ३१५ |
| | तिगस्त | ३,२८१ | ५,१४६ | ५२ | ९० |
| यवतमाळ | चालूं साल | ३,०८२ | ६,२४३ | १३३ | १५२ |
| | गुदस्त | २,२६७ | ५,१९७ | १८८ | २१३ |
| | तिगस्त | १,४५८ | २,०८० | २४ | ३४ |
| आकोला | चालूं साल | १७,२६३ | ३२,७७३ | २२ | २४ |
| | गुदस्त | ११,१२० | २४,२५४ | २७ | ३१ |
| | तिगस्त | ३,९६५ | ६,२६० | ७८ | ७९ |
| बुलडाणा | चालूं साल | १५,२४४ | ३०,२५१ | १० | १५ |
| | गुदस्त | ९,६८६ | २४,७३७ | ४ | ११ |
| | तिगस्त | ३,४७७ | ६,०८३ | १० | २३ |
| एकुण वऱ्हाड | चालूं साल | ४५,५१२ | ८६,४४३ | २५१ | २९० |
| | गुदस्त | ३१,१८२ | ६८,३५१ | ४६२ | ५७० |
| | तिगस्त | १२,१८१ | १९,५६९ | १६४ | २२६ |

टीप—चालूं सालच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे २० नोव्हेंबर १९१५ २१ नोव्हेंबर १९१४ पावेतों होते.

सी० बी० लेक्टवीच
डायरेक्टर ऑफ अग्रिकलचर अँड इंडस्ट्रीज मध्यप्रांत

ॐ नमः श्रीगणेशाय.

### आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भ.संज्ञ मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुकांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाला, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें अ याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० हो० ट० ख० वें० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.